जून २०२१/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



# समृद्ध शेती

## नव्या हरितक्रांतीच्या दिशेने


# बी.बी.एफ.(रुंद वरंबा सरी) लागवड तंत्रज्ञान

## पर्जन्य आधारित शेतीस वरदान

महाराष्ट्र शासन
**कृषी विभाग**

### वैशिष्ट्ये

- सोयाबीन, तूर, मुग, उडीद, कापूस,मका व हरभरा पिकास उपयुक्त .
- अवर्षणप्रवण क्षेत्रात तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी जास्त उपयुक्त.
- बी.बी.एफ.पद्धतीने निविष्ठा खर्चात (बियाणे, खते इ.) २० त २५ % बचत.
- उत्पन्नामध्ये २५ ते ३० % वाढ .
- बी.बी.एफ.पेरणी यंत्राच्या साहाय्याने उतारास आडवी पेरणी केल्याने मूलस्थानी जलसंधारण साधले जाते.
- पर्जन्यमान खंडाच्या कालावधीत पाण्याच्या ताणाची तीव्रता कमी होते.
- जास्त पर्जन्यमान झाल्यास अतिरिक्त पाणी वाहून जाण्यास मदत होते.
- पिकास मुबलक हवा, सूर्यप्रकाश मिळाल्याने पिकाची जोमदार वाढ होते.
- पिकामध्ये आंतरमशागत करणे, उभ्या पिकात सरीमधून ट्रॅक्टर/मनुष्यचलित फवारणी यंत्राद्वारे कीटकनाशक फवारणी करणे सोईचे होते.
- जमिनीची धूप होण्यास प्रतिबंध.
- जमिनीची सच्छिद्रता वाढून जमीन भुसभुशीत होते.



अधिक माहितीसाठी QR कोड स्कॅन करा

**कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

# अंतरंग

## ६ समृद्ध शेती, समृद्ध महाराष्ट्र

कृषी क्षेत्रात खरीप हंगामाला असलेले महत्त्व लक्षात घेता त्यासाठी कृषी विभागाने केलेल्या नियोजनाविषयी आणि एकंदरीतच राज्यातील हवामान, पाऊस, खते, बियाण्यांची उपलब्धता, पिकांचे नियोजन यासाठी राज्य शासनाने विविध उपाययोजना केल्या आहेत.



## शेतकरी, मच्छीमारांना पाठबळ १०



राज्यातील शेतकरी व मच्छीमारांसाठी राज्य आणि केंद्र शासन विविध योजना राबवत आहेत. शेतकरी, मच्छीमारांचे उत्पादन वाढून त्यांची उन्नती व्हावी, याबरोबरच त्यांना सामाजिक सुरक्षा देण्यासाठीही शासन विविध योजना राबवत आहे.

## १५ कृषीला जोड सौर ऊर्जेची

शेतकऱ्यांच्या कृषिपंप वीज जोडण्यांचे विद्युतीकरण सौर ऊर्जेद्वारे करण्यासाठी राज्य शासन गेल्या काही वर्षांपासून स्वयंअर्थसाहाय्यित तसेच केंद्र शासनाच्या अर्थसाहाय्यातून विविध योजना राबवत आहे. त्याअंतर्गत केंद्र शासनाकडून देशभरात राबवण्यात येत असलेल्या 'प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवंम उत्थान महाभियानाला (कुसुम)' राज्यात गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



## २८ संधी कृषी पर्यटनाची

कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास, शेती उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करणे, कृषिपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देणे, गावातील महिला तरुणांना रोजगाराची संधी देणे, लोककला आणि परंपरांचे दर्शन घडवणे, पर्यटकांना प्रत्यक्ष शेतीतील कामाचा अनुभव देणे, प्रदूषणमुक्त व निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याचा अनुभव देणे असा या धोरणाचा उद्देश आहे.



## समाधानाचे शिवभोजन ३८




राज्य शासनाची महत्त्वपूर्ण योजना शिवभोजन थाळीच्या माध्यमातून कोरोना काळात राज्यातील कष्टकरी, शेतकरी, कामगार व गोरगरिबांना पोटभर अन्न मिळत आहे. अनेकांना रोजगार नसला तरी पोटभर अन्न मिळत असल्याने ते समाधान व्यक्त करत आहेत.

## ४५ साथ आटोक्यात, तरी काळजी हवीच

कोरोनातून रुग्ण बरे होत असतानाच म्युकरमायकोसिस (काळी बुरशी) या आजाराचे संकट राज्यासमोर उभे राहिले आहे. त्याला रोखण्यासाठी राज्य शासनामार्फत प्रयत्न केले जात आहेत.




| | |
|---|---|
| समृद्ध शेती, समृद्ध महाराष्ट्र | ६ |
| शेतकरी, मच्छीमारांना पाठबळ | १० |
| कृषीला जोड सौर ऊर्जेची | १५ |
| पाठबळ योजनांचे | १८ |
| पतपुरवठा, बाजारपेठांचे सक्षमीकरण | २४ |
| जलसंधारणासाठी कृषी अवजार | २६ |
| संधी कृषी पर्यटनाची | २८ |
| शेतीचा महाराष्ट्र ब्रॅण्ड | ३० |
| समाधानाचे शिवभोजन | ३८ |
| कृषिरत्न | ४० |
| वाण काळा, पण लाख गुणी! | ४३ |
| साथ आटोक्यात, तरी काळजी हवीच | ४५ |
| पाऊल पडते पुढे | ४७ |
| मंत्रिमंडळात ठरले ! | ५५ |

वर्ष ७२ वे | अंक १० | जून २०२१

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — डॉ. दिलीप पांढरपट्टे
- प्रबंध संपादक — गणेश रामदासी, गोविंद अहंकारी
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- साहाय्य — भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. प्रिंट प्लस प्रा.लि., पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# शिवभोजन थाळी

**राज्यात** सुरू असलेल्या 'ब्रेक दि चेन' या प्रक्रियेंतर्गत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील विविध समाजघटकांसाठी मदतीचे जे पॅकेज घोषित केले होते, त्यामध्ये राज्यातील गरीब आणि गरजू लोकांना १५ एप्रिलपासून पुढे एक महिन्यासाठी शिवभोजन थाळीअंतर्गत मोफत जेवणाची व्यवस्था उपलब्ध करून दिली होती. ही मुदत आता आणखी एक महिन्यासाठी वाढवण्यात आली असून, राज्यातील गरीब जनतेला १४ जून २०२१ पर्यंत या योजनेंतर्गत मोफत जेवणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी पुढाकार घेऊन सादर केलेल्या या प्रस्तावास मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली असून विभागाने यासंबंधीचा शासननिर्णय १४ मे २०२१ रोजी निर्गमित केला आहे. 'ब्रेक दि चेन' प्रक्रियेंतर्गत राज्यात कडक निर्बंध लागू करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर शिवभोजन थाळीच्या राज्याच्या प्रतिदिन इष्टांकामध्येही दीडपट वाढ करण्यात आली आहे.




## नि:शुल्क भोजनाचा लाभ

राज्यातील कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी 'ब्रेक दि चेन' प्रक्रिया संपूर्ण राज्यभर राबवली जात आहे. या काळात राज्यातील गोरगरीब जनतेचे हाल होऊ नयेत, याची काळजी शासनाने घेतली आहे. राज्यात १५ एप्रिल २०२१ पासून शिवभोजन थाळी योजनेंतर्गत नि:शुल्क थाळी उपलब्ध करून दिली जात आहे.

## चार कोटींहून अधिक थाळ्यांचे वितरण

१५ एप्रिल २०२१ ते ३१ मे २०२१ पर्यंत ६४ लाख ७१ हजार ७९७ नागरिकांनी मोफत शिवभोजन थाळीचा लाभ घेतला आहे. या अडचणीच्या काळात मोफत शिवभोजन थाळीने राज्यातील गरीब जनतेला मोठा दिलासा दिला आहे. योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत ४ कोटी ४४ लाख ८ हजार ३६४ थाळ्यांचे वितरण राज्यभरात झाले आहे. संपूर्ण राज्यात शिवभोजन योजनेंतर्गत एकूण ९५० केंद्रे सुरू आहेत.

# समृद्ध शेती

आपला भारत देश कृषिप्रधान देश आहे. येथील लोकसंख्येच्या एक तृतीयांश लोक ग्रामीण भागात राहतात आणि त्यांचा मूळ व्यवसाय शेती आहे. आपल्या देशातील शेतकरी ही एक महत्त्वपूर्ण व्यक्ती आहे, म्हणून प्रत्येकाने त्याच्या कार्याला त्रिवार सलाम केला पाहिजे. त्याला समाजात सन्मान मिळायलाच हवा, म्हणून देशाचे दुसरे प्रधानमंत्री स्व. लालबहादूर शास्त्री यांनी नारा दिला होता, 'जय जवान, जय किसान' कारण जवान म्हणजे सैनिक हा देशाचे संरक्षण करतो, तर किसान हा देशातील लोकांचे पोषण करतो. म्हणजेच शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. म्हणून हे दोन्ही देशाचे अत्यंत महत्त्वपूर्ण घटक आहेत.

शेती व शेतीपूरक व्यवसाय हे नेहमीच अर्थव्यवस्थेच्या आणि सामाजिक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी राहिलेले आहेत. शेतकरी हा कायम आनंदी राहावा, त्याची शेती समृद्ध व्हावी यासाठी राज्य शासन अनेक योजना राबवत आहे. गेल्या काही दशकांमध्ये राज्यातील ५० टक्क्यांहून जास्त लोकसंख्या उपजीविकेसाठी या क्षेत्रावर अवलंबून आहे. राज्य शासनाने कोविड-१९ च्या लॉकडाऊनमधून कृषी क्षेत्राला सूट दिली. कृषी निविष्ठांची वाहतूक व वितरण, कृषी उत्पादनांची वाहतूक व विक्री आदी कामांबाबत राज्य शासनाने केलेल्या विविध उपाययोजना कृषी क्षेत्राला आधार देण्यास साहाय्यभूत ठरल्या आहेत.



सध्या खरीप हंगामाच्या कामांना सुरुवात झाली आहे. संपूर्ण देश गेल्या खरीप हंगामापासून कोरोना साथीशी लढा देतोय. या लढाईत बळीराजाने जराही उसंत न घेता भरघोस कृषी उत्पन्न घेऊन अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे काम केले आहे. राज्याचे सरासरी पर्जन्यमान १०७५ मिलीमीटर एवढे आहे. हवामान विभागाच्या सध्याच्या अंदाजानुसार यंदा पाऊस सरासरी इतका किंवा सरासरीपेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे.

राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७ लाख हेक्टर आहे. त्यापैकी निव्वळ पेरणी क्षेत्र १६८ लाख हेक्टर आहे. त्यातील खरिपाचे क्षेत्र १५१.३३ लाख हेक्टर आहे. राज्यात १ कोटी ५२ लाख शेतकरी असून खरिपात भात, ज्वारी, मका, तूर, कापूस, सोयाबीन, ऊस ही पिके घेतली जातात. त्यानुसार कृषी विभागाच्या माध्यमातून खते, बियाण्यांच्या उपलब्धतेचे नियोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेतून राज्यात 'विकेल ते पिकेल' अभियान सुरू आहे. या अभियानांतर्गत शेतकरी ते ग्राहक थेट विक्रीअंतर्गत ९७०२ ठिकाणी विक्री केंद्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. राज्यात 'अर्ज एक योजना अनेक' याप्रमाणे महाडीबीटी पोर्टलवरून कृषी विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणी सुरू आहे.

राज्यात ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्या कार्यरत आहेत. या समित्यांमध्ये शेतमालाची दरवर्षी सुमारे ४० हजार कोटी रुपयांची उलाढाल होते. कृषी खात्याच्या अंदाजानुसार अपेक्षित उत्पादन याचा विचार करून भारतीय कापूस महामंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ यांनी सुरुवातीपासूनच कापूस खरेदीचे नियोजन केले आहे. राज्यातील २४ उत्पादनांना भौगोलिक चिन्हांकन व मानांकन प्राप्त झाले आहेत. कृषिमाल उत्पादकांच्या संस्थांकडे शेतकऱ्यांची, निर्यातदारांची, प्रक्रियादारांची नोंदणी करून कृषिमालाची बाजारसाखळी विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना शेती उत्पादनासाठी लागणारे शेती कर्ज विविध बँकामार्फत उपलब्ध करण्याचे नियोजन सहकार विभागामार्फत करण्यात आले आहे.

राज्यात कोरोना प्रतिबंधासाठी 'माझे कुटुंब माझी जबाबदारी', 'मी जबाबदार' असे वेगवेगळे अभियान यशस्वीरीत्या राबवले जात आहेत. कोरोनाच्या संकटाबरोबर राज्याने चक्रीवादळासारख्या नैसर्गिक आपत्तींचाही सामना केला आहे. निसर्ग चक्रीवादळग्रस्तांना केलेल्या वाढीव मदतीप्रमाणे तोक्ते चक्रीवादळग्रस्तांना नुकसानभरपाई देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

कृषी विशेषांक असलेल्या 'लोकराज्य'च्या या अंकात खरीप हंगामासाठी संपूर्ण राज्यात कृषी विभागाने केलेल्या नियोजनाची माहिती, तसेच कृषी क्षेत्रासाठी राज्य शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय, ऊर्जा, फलोत्पादन, रोजगार हमी योजना आणि मृद् व जलसंधारण विभागाच्या वतीने राज्यात राबवण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या योजनांच्या माहितीचा समावेश करण्यात आला आहे. याचबरोबर राज्यातील 'विकेल ते पिकेल', 'शिवभोजन थाळी' आदी योजनांच्या यशकथा आणि शेती क्षेत्रातील सर्वोच्च अशा डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कारार्थी शेतकऱ्यांच्या कार्याची ओळख व महत्त्वाच्या घडामोडी अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

**डॉ. दिलीप पांढरपट्टे**
(मुख्य संपादक)

**कृषी क्षेत्रात खरीप हंगामाला असलेले महत्त्व लक्षात घेता त्यासाठी कृषी विभागाने केलेल्या नियोजनाविषयी आणि एकंदरीतच राज्यातील हवामान, पाऊस, खते, बियाण्यांची उपलब्धता, पिकांचे नियोजन यासाठी राज्य शासनाने विविध उपाययोजना केल्या आहेत.**

**अजय जाधव**

शेतकरी बांधव आपल्या काळ्या आईची सेवा करून शेतातून धनधान्याच्या राशी पिकवत, त्यातून संपूर्ण राज्यात आणि देशात नागरिकांना अन्न पुरवतात. संपूर्ण देश गेल्या खरीप हंगामापासून कोरोना साथीच्या आजाराशी लढा देत आहे. या लढाईत बळीराजाने जराही उसंत न घेता भरघोस कृषी उत्पन्न घेऊन अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे काम केले आहे. या वर्षीच्याही खरीप हंगामावर कोरोनाचे सावट आहे. मात्र राज्य शासनाने केलेल्या उपाययोजनांमुळे बळीराजाला दिलासा देतानाच खरीप हंगामासाठी बियाणे, खते यांचा वेळेवर पुरवठा होण्यासाठी नियोजन केले आहे.

### खरिपाचे क्षेत्र व हवामान

राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७ लाख हेक्टर आहे. त्यापैकी निव्वळ पेरणी क्षेत्र १६८ लाख हेक्टर आहे. त्यातील खरिपाचे क्षेत्र १५१. ३३ लाख हेक्टर असून ५१. २० लाख हेक्टर क्षेत्र रब्बी पिकाखाली आहे. राज्यात १ कोटी ५२ लाख शेतकरी असून, खरिपात भात, ज्वारी, मका, तूर, कापूस, सोयाबीन, ऊस ही पिके घेतात तर रब्बीत गहू आणि हरभऱ्याचे पीक घेतले जाते.

राज्याचे सरासरी पर्जन्यमान १०७५ मिलीमीटर एवढे आहे. यंदा ९६ ते १०४ टक्के इतक्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. हवामान विभागाच्या सध्याच्या अंदाजानुसार (प्रोबॅबिलिटी फोरकास्ट) महाराष्ट्रासाठी २०२१ चा पाऊस सरासरीइतका किंवा सरासरीपेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे. पाऊस आगमन आणि परतीच्या सुधारित वेळापत्रकानुसार महाराष्ट्रात जूनच्या पाहिल्या आठवड्यात पावसाला सुरुवात होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. तर साधारणतः ऑक्टोबरमध्ये पावसाच्या परतीचे वेळापत्रकदेखील हवामान खात्याने जाहीर केले आहे.

यंदा खरिपाचे क्षेत्र वाढणार असून अपेक्षित क्षेत्र १५७ लाख हेक्टर आहे. त्यानुसार कृषी विभागाच्या माध्यमातून खते, बियाण्यांच्या उपलब्धतेचे नियोजन केले आहे. विशेष म्हणजे गेल्या वर्षीचा अनुभव पाहता या वर्षी राज्यात सुमारे दीड लाख युरियाचा

# समृद्ध शेती, समृद्ध महाराष्ट्र



## दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण



“ कृषी मालासाठी बाजारपेठेचे संशोधन करणे गरजेचे असून केवळ पीक उत्पादनात वाढ महत्त्वाची नाही, तर राज्याने आधुनिक तंत्रज्ञान व उत्तम संशोधन यांच्या माध्यमातून दर्जेदार पीक उत्पादन करावे व आपला ब्रँड निर्माण करावा. या वर्षी पावसाळा सरासरीपेक्षा अधिक असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. शेतकरी बांधव अहोरात्र मेहनत करून शेतीत राबत असतो. त्याला कधी निसर्गाची साथ मिळते कधी नाही. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभावापेक्षा हमखास भाव मिळण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. राज्यात जे पिकेल ते दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण असले पाहिजे. विभागवार पिकांचे वर्गीकरण करून महाराष्ट्र हा शेतीतील ब्रॅण्ड झाला पाहिजे.

**- उद्धव ठाकरे,** मुख्यमंत्री ”

अतिरिक्त साठा केला जात आहे. जेणेकरून ऐन हंगामात शेतकऱ्यांकडून एकदम मागणी वाढली, तर युरियाचा तुटवडा जाणवणार नाही. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात युरियाचा बफर स्टॉक केला जात आहे.

### खरिपाचे नियोजन

खरिपाच्या नियोजनासाठी कृषी विभाग साधारणत: जानेवारीपासून तयारीला लागतो. खरिपाच्या हंगामपूर्व बैठका जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर घेतल्या जातात. गेल्या वर्षापासून कोरोनामुळे प्रत्यक्ष बैठकांना मर्यादा असल्याने ऑनलाइन आणि कोरोनाचे नियम पाळून प्रत्यक्ष बैठका झाल्या. कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी राज्यातील बहुतांश विभागातील जिल्ह्यांच्या आढावा बैठका घेतल्या. खरीप हंगामाची राज्यस्तरीय बैठक मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषिमंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम आणि सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत झाली.

### कृषी निविष्ठांची उपलब्धता

राज्यात कापूस पिकाखालील क्षेत्र ४२.८६ लाख हेक्टर असून ९८ टक्के क्षेत्रावर बीटी कापसाची लागवड होते. त्यासाठी १ कोटी ७१ लाख बियाणे पाकिटांची आवश्यकता आहे. यंदा २ कोटी ७२ लाख पाकिटांचा पुरवठा करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे राज्यात कापूस बियाणे पाकिटांचा तुटवडा भासणार नाही. गुलाबी बोंडअळी नियंत्रणाकरिता १ जून २०२१ पासून शेतकऱ्यांना बियाण्यांची विक्री करण्याचे नियोजन आहे. शासकीय संकरित व सरळ वाणामध्ये बी.टी.तंत्रज्ञान असलेले बियाणे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

कृषी निविष्ठांच्या उपलब्धतेसाठी कृषी सेवा केंद्र सकाळी ७ ते सायंकाळी ७ पर्यंत सुरू ठेवण्यासाठी सर्व जिल्ह्यांना निर्देश देण्यात आले आहे. गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांना हंगामी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या आहेत. शेतकऱ्यांसाठी आवश्यक खतमात्रा काढण्यासाठी फार्म फर्टिलायझर कॅल्क्युलेटर ॲप्लिकेशन विकसित करण्यात आले आहे. संतुलित खत वापर व खत बचत मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्याचबरोबर कृषी सेवा केंद्रांच्या ठिकाणी जमीन सुपीकता निर्देशांकाचे फलक लावण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या गावातील जमीन सुपीकतेची माहिती मिळेल आणि त्यामुळे नेमके कुठल्या प्रकारचे खत द्यायला पाहिजे याचे मार्गदर्शनही मिळेल.

### मुदत कर्ज व पायाभूत सुविधा

नाबार्डच्या पत आराखड्यानुसार ७९ हजार १९० कोटी रुपये इतके पीक कर्ज व ४८ हजार १४८ कोटी इतके मुदत कर्ज व पायाभूत सुविधांकरिता कर्ज देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना पीक कर्ज पुरवठा वेळेवर व्हावा यासाठी जिल्ह्यातील बँकांचा नियमित आढावा घेणे, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेची, प्रधानमंत्री पिक विमा योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कृषी निविष्ठा वाहतूक सुरळीत होण्याबाबत नियोजन करणे, रेल्वे रेक पॉइंटवर मजूर व वाहन उपलब्धता असावी, यासाठी जिल्हा यंत्रणेने प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### ‘विकेल ते पिकेल’ अभियान

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेतून ‘विकेल ते पिकेल’ अभियान राज्यात सुरू झाले आहे. या अभियानांतर्गत आतापर्यंत शेतकरी ते ग्राहक थेट विक्री (संत शिरोमणी सावता माळी रयत बाजार अभियान) अंतर्गत ९७०२ ठिकाणी विक्री केंद्रे उपलब्ध करून देण्यात आली. तसेच ८१८९ शेतकरी गट/शेतकरी उत्पादक कंपन्यांना थेट खरेदीदारांशी जोडण्यात आले आहे. बाजारात मागणी असलेले तथा नावीन्यपूर्ण पिकाखाली १ लाख ६० हजार हेक्टर क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले आहे. यामध्ये जिरेनियम, सिट्रोनेला, किन्होव्हा, ओवा, ॲव्होकॅडो, ड्रॅगनफ्रुट, विदेशी भाजीपाला,



## अर्थव्यवस्थेला बळ देण्याचे काम



कोरोना काळातील बिकट परिस्थितीत अर्थव्यवस्थेला बळ देण्याचे काम कृषी क्षेत्राने केले आहे. कृषी विभागाने बियाण्यांच्या उगवण क्षमतेसाठी शेतकऱ्यांना सोबत घेऊन प्रशिक्षित केले त्यांना विश्वास दिला. शेतकऱ्यांनी माती परीक्षण करून त्यात कुठल्या खतांची कमतरता आहे, याची माहिती घेऊन त्याप्रमाणे खतांचा वापर केल्यास त्याचा फायदा होईल, शिवाय खतांच्या वापरात बचतही होईल. राज्यात पीक विम्यासाठी बीड मॉडेल राबवण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. कोरोनाच्या निर्बंध काळात खते, बियाणे, कृषी अवजारे, यंत्रे यांची दुकाने सुरू राहतील, यासाठी नियोजन करण्यात आले आहे.

**- अजित पवार,** उपमुख्यमंत्री

करटोली, एरंडी, तुती, ब्राऊन राइस, काळी मिरी, करडई, जवस, तीळ इत्यादी पिकांचा समावेश आहे.

### भौगोलिक मानांकन प्राप्त पिकांचे नियोजन

राज्यात भौगोलिक मानांकन (जीआय) प्राप्त पिकांचे नियोजन करण्यात आले असून, औरंगाबाद जिल्ह्यातील केसर आंबा यंदा ३४०० हेक्टर क्षेत्रावर लागवड प्रस्तावित करण्यात आली आहे. जळगाव जिल्ह्यात केळी १६२५ हेक्टर, तर वांगी ३६३ हेक्टर, नंदूरबार जिल्ह्यात नवापूर देशी तूर ४२६० हेक्टर, नाशिक जिल्ह्यात द्राक्ष ११ हजार ७०० हेक्टर, तर लासलगाव कांदा ८६५ हेक्टरवर लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. पालघर जिल्ह्यात चिकू ४४७३ हेक्टर, पुणे जिल्ह्यात सासवड अंजीर ४७२ हेक्टर आणि आंबेमोहोर तांदूळ, मुळशी ३२ हेक्टर, रत्नागिरी जिल्ह्यात ६७ हजार हेक्टर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात हापूस आंबा ३० हजार २६६ हेक्टरवर लागवडीचे नियोजन आहे.

### अर्ज एक योजना अनेक

राज्यात 'अर्ज एक योजना अनेक' याप्रमाणे महाडीबीटी पोर्टलवरून कृषी विभागाच्या योजनांची अंमलबजावणी प्रथमच सुरू करण्यात आली आहे. १८ मे २०२१ पर्यंत १३ लाख १९ हजार ३१४ शेतकऱ्यांनी २७ लाख २८ हजार ८७ घटकांसाठी अर्ज केले आहेत. त्यातून लॉटरी प्रक्रियेतून २ लाख ४९ हजार ८६८ इतक्या अर्जांची निवड झाली आहे. शेतकऱ्यांना पारदर्शकपणे व कमी त्रासात लाभ मिळण्याची सोय झाली आहे.

### कृषी तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी...

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष सभा, बैठकांवरील प्रतिबंध विचारात घेऊन आधुनिक कृषी तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी २०२०-२१ मध्ये एकूण २० हजार शेतीशाळा घेण्यात आल्या आहेत. त्यापैकी ११३६ महिला शेतीशाळा घेण्यात आल्या. कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी बीजप्रक्रिया मोहिमा, बीज उगवण क्षमता तपासणी मोहीम, बीबीएफ वर लागवड, १० टक्के रासायनिक खत बचत मोहीम इत्यादी तंत्रज्ञान प्रसार मोहिम हाती घेण्यात आल्या आहेत. राज्यातील शेतकऱ्यांमध्ये तालुकास्तरावर पीकस्पर्धा घेऊन त्याद्वारे उत्पादनात वाढ व तंत्रज्ञान प्रसारास चालना देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विशेषतः उपग्रहाद्वारे छायाचित्रण व ड्रोन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने राज्यातील पीकनिहाय क्षेत्राची अचूकपणे गणना करणे, लागवड केलेल्या पिकांचे आरोग्य सर्वेक्षण करणे व पिकांचे काढणी पश्चात येणाऱ्या उत्पादनाचे अनुमान काढण्यासाठी कृषी विभाग व एमआरएसएसी, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाॲग्रिटेक प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.

लहान आणि सीमान्त शेतकरी तसेच कृषी नवउद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून शेतमालाच्या सर्वसमावेशक आणि स्पर्धात्मक मूल्यसाखळ्यांच्या विकासासाठी मदत करण्यासाठी २१०० कोटी रुपयांचा मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. यामध्ये ५४ शेतकऱ्यांच्या समुदाय आधारित संस्थांच्या ६८.१४ कोटी रुपये इतक्या किमतीच्या २९ पथदर्शी उपप्रकल्पांची अंमलबजावणी सुरू असून, यामधून ६५ हजार शेतकऱ्यांना लाभ अपेक्षित आहे.

## शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण निविष्ठा



खरिपाच्या १५७ लाख हेक्टर क्षेत्रामध्ये कापूस ४३ लाख, सोयाबीन ४३.५० लाख हेक्टर, भात १५.५० लाख हेक्टर, मका ८.८४ हेक्टर, कडधान्याचे क्षेत्र २३ लाख हेक्टर आणि ऊस ९.५० लाख हेक्टर आहे. खरीप हंगामासाठी सर्व प्रकारची मिळून ६३.६४ लाख मे.टन रासायनिक खते व १८.२६ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध आहेत. राज्यात कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना स्वतःचे बियाणे स्वतः तयार करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. कापूस पिकाकरिता १ कोटी ७१ लाख बियाणे पाकिटांची आवश्यकता असून कापूस पिकाकरिता २ कोटी २२ लाख पाकिटांचा पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण निविष्ठा मिळण्यासाठी ३९५ भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे.

**- दादाजी भुसे,** कृषिमंत्री

# खरीप हंगामासाठी सज्ज

**यंदाच्या खरीप हंगामासाठी कृषी विभागाने केलेले नियोजन आणि राबवण्यात येणाऱ्या उपाययोजनांविषयी सांगताहेत कृषिमंत्री दादाजी भुसे..**

**खरीप** हंगामासाठी 'विकेल ते पिकेल' या योजनेच्या उद्दिष्टानुसार कृषी विभागाने पूर्णपणे तयारी केली आहे. शेतकऱ्यांना खते आणि बियाणे यांचा तुटवडा जाणवणार नाही, याचेही नियोजन करण्यात आले आहे. मी राज्यातील सर्वच विभागांच्या जिल्ह्यांचे दौरे करून तेथील खरिपाच्या आढावा बैठका घेतल्या आहेत. जिल्हास्तरावरील पालकमंत्र्यांच्या खरीप आढावा बैठकीमध्ये बियाणे, खते, पीक कर्ज, पीक विमा, वीजजोडणी, नैसर्गिक आपत्ती व नुकसानभरपाई, फळबाग लागवड आदी विषयांवर उपस्थित झालेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने कृषी विभागातर्फे कार्यवाही करण्यात येत आहे.



## ग्राम कृषी विकास समिती

राज्यात प्रथमच ग्रामपंचायतस्तरावर ग्राम कृषी विकास समिती स्थापन करण्यात आली असून, त्या माध्यमातून गावांच्या कृषी विकासाचे नियोजन करण्यात आले आहे. त्याचे राज्यव्यापी संकलन करण्यात येणार आहे. सद्य:स्थितीत १३ हजार ८१९ गावांमध्ये ग्राम कृषी विकास समिती स्थापन झालेल्या आहेत. त्यांच्या मदतीने प्रथमच ग्रामस्तरावर कृषी विस्तार आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे.

## रासायनिक खतांची बचत

राज्यातील बियाणे क्षेत्राला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात येत येत असून रासायनिक खतांचा वापर कमी व्हावा, यासाठी मोहीम हाती घेण्यात येत आहे. त्याद्वारे १० टक्के रासायनिक खतांची बचत झाल्याचे निदर्शनास आले आहे. शेतीच्या योजनांमध्ये महिलांना सन्मान मिळावा, यासाठी विभागाच्या पोर्टलवरील योजनांमध्ये ३० टक्के लाभ महिलांना मिळावा यासाठी धोरण आखण्यात आले आहे.

## शेतमजुरांना प्रशिक्षण

कौशल्यावर आधारित काम करणाऱ्या शेतमजुरांसाठी महत्त्वाकांक्षी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत १ लाख शेतमजुरांना प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावित असून २०२०-२१ मध्ये ५८७ प्रशिक्षण वर्ग आयोजित करून २५ हजार ६८८ शेतकरी/मजूर यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. राज्यात प्रयोगशील आणि पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांची रिसोर्स बँक तयार करण्यात आली आहे. त्यामध्ये ५००९ विजेत्या शेतकऱ्यांचा समावेश आहे. रिसोर्स बँकेच्या माध्यमातून त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा वापर करून इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

## कृषी यांत्रिकीकरण

कृषी विद्यापीठांनी विकसित केलेले कृषी यंत्र व अवजारांचे उत्पादन करण्यासाठी खासगी उत्पादकांची नियुक्ती करणे त्याचबरोबर खासगी उत्पादकांनी विकसित केलेल्या नावीन्यपूर्ण यंत्र व औजारांचा राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेमध्ये समावेश करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. चारही कृषी विद्यापीठांमार्फत विविध स्वरूपाची व नावीन्यपूर्ण यंत्रे व अवजारे विकसित केली आहेत. मात्र त्यांचे विद्यापीठांमार्फत मोठ्या प्रमाणात व्यावसायिक उत्पादन करण्यावर मर्यादा येतात. त्या लक्षात घेता त्याचा लाभ शेतकऱ्यांना देता येत नाही. त्याचप्रमाणे, खासगी उत्पादकांनीदेखील अनेक नावीन्यपूर्ण यंत्रे व अवजारे विकसित केलेली आहेत परंतु, त्यांचा योजनेत समावेश नसल्यामुळे ती शेतकऱ्यांना अनुदानावर उपलब्ध होत नाहीत यासाठी राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेत त्याचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मान्यताप्राप्त अवजारे शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून दिली जाणार आहेत.

## सर्वोत्तम कामगिरी

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत राज्याने सर्वोत्तम कामगिरी केली आहे. त्याची दखल घेऊन केंद्र शासनाने महाराष्ट्राला प्रथम क्रमांकाचे तीन पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करतानाच कृषी क्षेत्राच्या विकासासाठी विभागामार्फत अभिनव योजना राबवल्या जात आहेत. त्याअंतर्गत कापूस पिकासाठी 'एक गाव एक वाण' मोहीम राबवण्यात येणार आहे. यामुळे एकाच गुणवत्तेचा कापूस तयार होऊन शेतकऱ्यांना चांगला दर मिळण्यास मदत होईल. अशा योजनांच्या माध्यमातून बळीराजाला दिलासा देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

आंतरपिकाचे महत्त्व विचारात घेऊन कडधान्याचे १ लाख ९० हजार हेक्टर व गळितधान्याचे ५० हजार हेक्टर इतक्या क्षेत्रावर कडधान्य व गळितधान्य पिकाचे आंतरपिकास प्रोत्साहन देण्यात येत आहे. याकरिता बियाणे मिनीकिटचे मोफत वाटप करण्यात येणार आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**राज्यातील शेतकरी व मच्छीमारांसाठी राज्य आणि केंद्र शासन विविध योजना राबवत आहेत. शेतकरी, मच्छीमारांचे उत्पादन वाढून त्यांची उन्नती व्हावी, याबरोबरच त्यांना सामाजिक सुरक्षा देण्यासाठीही शासन विविध योजना राबवत आहे.**

# शेतकरी, मच्छीमारांना पाठबळ

**नंदकुमार वाघमारे**

## शेतकऱ्यांसाठी विविध योजना

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना (१०० टक्के राज्य पुरस्कृत)

- अनुसूचित जाती, नवबौद्ध प्रवर्गातील शेतकऱ्यांना शाश्वत सिंचन सुविधा निर्माण करण्यासाठी मुंबई वगळता सर्व ३४ जिल्ह्यांमध्ये योजना राबवण्यात येत आहे.
- नवीन विहीर दोन लाख पन्नास हजार, जुनी विहीर दुरुस्ती पन्नास हजार, इनवेल बोअरिंग वीस हजार.
- पंप संच (डीझेल/विद्युत) वीस हजार, वीज जोडणी दहा हजार, शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण एक लाख, सूक्ष्म, ठिबक सिंचन संच ५० हजार, तर तुषार सिंचन संचासाठी २५ हजार रुपये अनुदान देण्यात येते. या योजनेंतर्गत वरील ७ बाबींचा समावेश असून लाभ पॅकेज स्वरूपात देण्यात येतो. खालील तीन पैकी कोणत्याही एकाच पॅकेजचा लाभ देय आहे.



- **नवीन विहीर पॅकेज** : नवीन विहीर, वीज जोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच, पंप संच व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरिंग.
- **जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज** : जुनी विहीर दुरुस्ती, वीज जोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच, पंप संच व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरिंग.
- **शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण पॅकेज** : शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण, वीज जोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच व पंप संच.
- ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वीच विहीर घेतली असेल त्यांना वीज जोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच, पंप संच यासाठी अनुदान मिळते. पूर्वसंमती मिळाल्यानंतरच शेतकऱ्यांना वरील बाबींची अंमलबजावणी करावयाची आहे.

### बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (१००% राज्य पुरस्कृत)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेप्रमाणे राज्यातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना सिंचनाची शाश्वत सुविधेसाठी ही योजना मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सांगली, सातारा व कोल्हापूर हे जिल्हे वगळता इतर सर्व जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येत आहे. या योजनेमध्ये परसबागेसाठी ५०० रुपयांचे तसेच पीव्हीसी पाईप/एचडीपीई पाईपसाठी ३०००० चे अनुदान देय आहे. या योजनेंतर्गत वरील ९ बाबींचा समावेश असून लाभ पॅकेज स्वरूपात देण्यात येईल.

**अर्ज कोठे करावा -** अर्ज www.agriwell.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन करावा. ही सुविधा साधारणपणे प्रत्येक वर्षी ऑगस्ट/सप्टेंबरमध्ये एक महिन्याच्या कालावधीसाठी उपलब्ध करून देण्यात येते.

**राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना नवीन विहिरीचा लाभ** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना या योजनांकरिता ऑनलाइन पद्धतीने मागवण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या अर्जामधूनच पात्र लाभार्थ्यांची निवड अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीमार्फत करण्यात येते.

**अधिक माहितीसाठी संपर्क -** कृषी अधिकारी पंचायत समिती, गट विकास अधिकारी, पंचायत समिती व कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद.

### गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना

शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचू दंश, विजेचा धक्का बसणे आदी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात, तसेच अन्य कोणत्याही कारणामुळे होणारे अपघात, यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना मृत्यू किंवा अपंगत्व येते. अशा अपघातग्रस्त शेतकरी/त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. योजनेस नियम व अटी लागू आहेत.

**पात्रता -** राज्यातील १० ते ७५ वयोगटातील महसूल नोंदीनुसार विमा पॉलिसी लागू झालेल्या तारखेस खातेदार असलेला शेतकरी व त्यांच्या कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेला कोणताही एक सदस्य (आई, वडिल, शेतकऱ्यांची पती/पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी, सून, अन्य कायदेशीर वारसदार यापैकी कोणतीही एक व्यक्ती) असे १० ते ७५ वर्षे वयोगटातील एकूण दोन जण.

अपघाती मृत्यू किंवा अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय तसेच एक डोळा व एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास २ लाख रुपये, तर अपघातामुळे एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास १ लाख रुपये विमा मिळतो. सर्व शेतकऱ्यांची विमा हप्त्याची रक्कम (प्रतिशेतकरी ३२.२३ रुपये) शासन विमा कंपनीस भरते. त्यामुळे शेतकऱ्याला विमा हप्ता भरण्याची गरज नाही. या योजनेंतर्गत लाभास पात्र शेतकऱ्याने/शेतकऱ्याच्या

कुटुंबातील कोणत्याही सदस्याने अथवा वारसदाराने शासनाच्या अन्य विभागांकडून अपघातग्रस्तांसाठी कार्यान्वित योजनेचा लाभ घेतला असल्यास या योजनेचा लाभ मिळत नाही.

**अर्ज कोठे करावा -** विमा दाव्याच्या अनुषंगाने पूर्व सूचना अर्ज विहित कागद पत्रांसह ज्या दिनांकास तालुका कृषी अधिकारी कार्यालयात दाखल/प्राप्त होईल व संगणक प्रणालीमध्ये अपलोड होईल, त्या दिनांकासच तो विमा कंपनीस प्राप्त झाला आहे असे समजण्यात येईल.

## प्रधानमंत्री पीक विमा योजना

नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगासारख्या अकल्पित प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे, शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामग्री वापरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना राबवण्यात येत आहे.

**योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये :** अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील केवळ अधिसूचित पिकांसाठी योजना असेल, प्रधानमंत्री पीक विमा योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी खातेदारांव्यतिरिक्त कूळ अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत, ज्या पिकांसाठी विमा कंपनीने वास्तवदर्शी विमा हप्ता दर ३० टक्क्यांपेक्षा जास्त नमुद केला आहे, त्या पिकांसाठी वाढीव विमा हप्ता अनुदान भार राज्य शासनावर आहे. शेतकऱ्यांवरील विमा हप्त्याचा भार कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता खरीप हंगामासाठी २ टक्के, रबी हंगामासाठी १.५ टक्के तसेच खरीप व रब्बी हंगामातील नगदी पिकांसाठी ५ टक्के असा मर्यादित ठेवला आहे. खरीप हंगाम व रब्बी हंगाम २०२०-२१, खरीप हंगाम व रब्बी हंगाम २०२१-२२, खरीप हंगाम व रब्बी हंगाम २०२२-२३ या तीन वर्षांकरिता जोखीमस्तर सर्व अधिसूचित पिकांसाठी ७० टक्के असा निश्चित केला आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पन्न हे मागील ७ वर्षापैकी सर्वाधिक उत्पन्नाच्या पाच वर्षांचे सरासरी उत्पन्न गुणले, त्या पिकाचा जोखीमस्तर विचारात घेऊन निश्चित केले जाईल. उंबरठा उत्पन्न हे संपूर्ण ३ वर्ष कालावधीकरिता स्थिर असेल. तसेच विमा कंपनीने सादर केलेला विमा हफ्ता दरही हा संपूर्ण ३ वर्ष कालावधीकरिता स्थिर असेल.



**आवश्यक कागदपत्रे :** ७/१२, आधार कार्ड, बँक पासबुक प्रत, पिकाची पेरणीबाबत स्वयं घोषणापत्र, भाडेपट्टा करारनामा/सहमती पत्र.

**योजनेचा हप्ता कोठे भरावा :** आपले सरकार सेवा केंद्र (सीएससी), बँक, प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था, तसेच www.pmfby.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने.

## भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना

वैयक्तिक शेतकऱ्यांनाच लाभ घेता येईल. शेतकऱ्याच्या स्वत:च्या नावे ७/१२ असणे आवश्यक असून जर ७/१२ उताऱ्यावर लाभार्थी संयुक्त खातेदार असेल तर सर्व खातेदारांचे किंवा जमीन कूळकायद्याखाली येत असल्यास कुळाचे संमतिपत्र आवश्यक आहे. परंपरागत वननिवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम २००६ नुसार वनपट्टेधारक शेतकरी योजनेत लाभ घेण्यासाठी पात्र आहेत.

**क्षेत्र मर्यादा :** योजनेचा लाभ कोकण विभागासाठी ०.१० हे. ते कमाल १० हेक्टर, तर उर्वरीत महाराष्ट्रासाठी किमान ०.२० हेक्टर ते कमाल ६ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत अनुज्ञेय आहे.

**अनुदान मर्यादा :** लाभार्थीस १०० टक्के अनुदान देय आहे. अनुदान तीन वर्षाच्या कालावधीत प्रथम वर्ष ५० टक्के, दुसरे वर्ष ३० टक्के, तिसरे वर्ष २० टक्के.

**लागवड कालावधी :** जून ते मार्च अखेर

**अर्ज कुठे करावा :** संबंधित तालुका कृषी अधिकारी

**समाविष्ट फळपिके :** योजनेंतर्गत आंबा, काजू, पेरू, चिक्कू, डाळिंब, सिताफळ, कागदी लिंबू, नारळ, चिंच, अंजिर, आवळा, कोकम, फणस, जांभूळ, संत्रा, मोसंबी या १६ बहुवार्षिक फळपिकांची आवश्यकतेनुसार कलमे/रोपांद्वारे लागवड करण्यास मान्यता आहे.

### युवा शेतकरी व कृषी संशोधकांना पुरस्कार



कोरोना काळातील बिकट परिस्थितीत अर्थव्यवस्थेला बळ देण्याचे काम कृषी क्षेत्राने केले आहे. कोरोना काळात राज्यातील शेतकऱ्यांनी विक्रमी उत्पादन केले आहे. त्यामुळे कृषी क्षेत्राकडे एक उद्योग म्हणून बघण्याची वेळ आली आहे. शेतकरी कर्जमाफीनंतर आता राज्य शासनाने कृषिपंप वीजजोडणी धोरणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना तातडीने वीजजोडणी देणे, वीजबिलातील थकबाकीवरील व्याज व विलंब शुल्कात सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. 'विकेल ते पिकेल' अभियानांतर्गत शेतकऱ्यांनी बाजारात मागणी असलेल्या कृषी मालाचे दर्जेदार उत्पादन घ्यावे. शेतकऱ्यांनी केलेल्या एकाच अर्जावर कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ देणाऱ्या महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून नुकतीच प्रथमच ऑनलाइन सोडत काढण्यात आली. त्याद्वारे राज्यातील २ लाख शेतकऱ्यांची पारदर्शकपणे निवड केली आहे. यांत्रिकीकरण, सूक्ष्मसिंचन, विशेष घटक योजना, नवीन विहिरी आणि फलोत्पादनाच्या विविध बाबींसाठी लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. राज्यातील युवा शेतकरी आणि विद्यापीठातील कृषी संशोधकांचा समावेश कृषी पुरस्कारांमध्ये व्हायला हवा, यासाठी या वर्षापासून त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

**- डॉ. विश्वजीत कदम,** सहकार, कृषी राज्यमंत्री

## फलोत्पादन यांत्रिकीकरण

या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी हॉर्टनेट या ऑनलाइन संकेतस्थळावर नोंदणी करावी. संकेतस्थळावर नोंदणी करताना शेतकऱ्यांनी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-१), ७/१२ उतारा, फोटो, आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक पासबूकच्या प्रथम पानाची छायाप्रत (फोटोसहित), आधार कार्ड, जातीचा दाखला (अनु.जाती/अनु.जमाती शेतकऱ्यांसाठी) आदी कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करावीत. तालुका कृषी अधिकाऱ्यांकडून पात्र प्रस्तावांना लक्ष्यांकाच्या अधीन राहून पूर्वसंमती मिळते. अधिक माहितीसाठी www.mahanhm.gov.in या संकेतस्थळावर मार्गदर्शक सूचना किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.



## एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान क्षेत्र विस्तार

विविध फळपिकांच्या अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांचा वापर करून उत्पादकतेमध्ये वाढ करण्यासाठी ही योजना राबवण्यात येत असून त्यातून शेतकरी आणि शेतकऱ्यांचा गट यांचा सामूहिक विकास करण्यावर भर दिला जात आहे.

**अर्ज करण्याची पद्धती -** https//hortnet.gov.in/mahaDBT या संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी व अर्ज करावा.

**आवश्यक कागदपत्रे -** ७/१२, ८-‘अ’चा नमुना, आधार कार्ड, आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँकखाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत, विहित नमुन्यातील (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती शेतकऱ्यासाठी), ऑनलाइन नोंदणी करतानाच ही कागदपत्रे अपलोड करावीत.

## कृषी पायाभूत सुविधा योजना

कृषी सहकार व शेतकरी कल्याण विभाग, नवी दिल्ली यांच्यामार्फत २०२०-२१ ते २०२९-३० या कालावधीत कृषी पायाभूत सुविधा योजना (ॲग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर स्किम) राबवण्यात येत असून केंद्र शासनातर्फे योजनेंतर्गत कृषी पायाभूत सुविधा प्रकल्पांना वित्तपुरवठा करण्याकरिता १ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत प्रामुख्याने प्राथमिक प्रक्रिया उद्योगांना लाभ देण्यात येणार आहे.

**पात्रता -** योजनेंतर्गत प्राथमिक कृषी पतसंस्था, विपणन सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक संस्था, स्वयंसाहाय्यता गट , शेतकरी, संयुक्त उत्तरदायित्व गट, बहुउद्देशीय सहकारी संस्था, कृषी उद्योजक, स्टार्टअप आणि केंद्र/राज्य संस्था किंवा स्थानिक संस्था पुरस्कृत सार्वजनिक खासगी भागीदारी प्रकल्प यांना लाभ घेता येईल.

**योजनेचे स्वरूप -** या योजनेंतर्गत दोन कोटी मर्यादेपर्यंतच्या कर्जावर वार्षिक ३ टक्के व्याज सवलत असेल ही सवलत जास्तीत जास्त ७ वर्षांपर्यंत उपलब्ध आहे. तसेच पात्र कर्जधारकांसाठी पत हमी संरक्षण उपलब्ध असेल. त्यासाठी शुल्क शासनामार्फत भरण्यात येईल.

शेतकरी उत्पादक संस्थेकरिता कृषी सहकार आणि शेतकरी कल्याण विभागाच्या अधीनस्थ असलेल्या लघु कृषक कृषी व्यापार संघामार्फत राबवण्यात येणाऱ्या पतहमी योजनेचा लाभ घेता येईल.

केंद्र/राज्य शासनाच्या सध्याच्या अथवा भविष्यातील कोणत्याही योजनेंतर्गत मिळणारे कोणतेही अनुदान या वित्त सुविधा प्रकल्पांतर्गत मिळू शकते.

**सहभागासाठी प्रक्रिया -** प्रथम अर्जदारास ऑनलाइन पद्धतीने योजनेच्या पोर्टलवर नोंदणी करून अधिकारपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. त्यानंतर लाभार्थी कर्जासाठी ऑनलाइन पोर्टलवर उपलब्ध असलेल्या फॉर्ममध्ये ऑनलाइन पद्धतीने अर्ज करून शकतात. कर्ज मंजूर झाल्यानंतर निधी लाभार्थीच्या बँक खात्यात परस्पर जमा करण्यात येईल. सविस्तर माहितीसाठी केंद्र शासनाच्या कृषी मंत्रालयाच्या pmkisan.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

## डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन

पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन प्रथम टप्प्यात अकोला, अमरावती, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ व वर्धा या सहा जिल्ह्यांत राबवण्यात येत आहे. या जिल्ह्यांमध्ये एकूण ५०० उत्पादक गट स्थापित करावयाचे आहेत.

**योजनेचा मुख्य उद्देश :** जैविक/सेंद्रिय शेतीचा प्रचार व प्रसार करताना शेतकरी समूहगट स्थापित करून स्वनिर्मित निविष्ठांचा उपयोग करून उत्पादित शेतमालाचे सेंद्रिय प्रमाणीकरण, प्राथमिक प्रक्रिया, बाजारपेठ शृंखला इत्यादीतून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून तीन वर्षात उत्पन्नात वाढ करणे.

**योजनेचे स्वरूप :** योजना ५० एकर क्षेत्राचा २०-२५ शेतकऱ्यांचा लाभार्थी गट तयार करून राबवण्यात येत आहे. प्रतिशेतकरी १ हेक्टर कमाल लाभ मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. असे १५ ते २० किलोमीटर परिघात १० गट स्थापन करून त्यांचा एक क्लस्टर तयार होतो. यासाठी समूह संकलन केंद्र (क्लस्टर ॲग्रीगेशन सेंटर) स्थापन करण्यात येईल. हे केंद्र गटांसाठी मार्गदर्शन केंद्र व उत्पादित मालाचे खरेदी-विक्री केंद्र म्हणून कार्य करेल. या केंद्रावर शेतमालाची प्राथमिक प्रक्रिया व साठवणूक करण्यात येईल.

सीएसीस्तरावर एक शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ) स्थापन करून गटातील सर्व शेतकरी एफपीओचे भागधारक सभासद असतील. शेतकऱ्यांकडील क्षेत्रानुसार भागभांडवल जमा करण्यात येईल. जमा झालेल्या एकूण भागभांडवलापैकी किमान ५ लाख एफपीओचे भागभांडवल असेल व त्यास मिशनच्या माध्यमातून १३ लाख रुपये अनुदान दिले जाईल. ५० स्थानिक किरकोळ विक्री केंद्र मिशनच्या माध्यमातून स्थापित करण्यात येतील. त्यासाठी ५ लाख रुपये प्रतिविक्री केंद्रासाठी अनुदान देय राहील. याप्रमाणे मिशनमध्ये ५० क्लस्टर तयार होणार आहेत. या ५० क्लस्टरचा एक जैविक महासंघ स्थापन करण्यात आला आहे. यामध्ये अंदाजे १० ते १२ हजार शेतकरी कुटुंबांचा समावेश करण्यात येणार आहे. मिशनमधील जैविक सेंद्रिय प्रमाणित मालासाठी एकच ब्रँड तयार करण्यात येत आहे.

## केंद्र शासनाच्या योजना

### प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना – प्रति थेंब अधिक पीक

http://1.6.125.78/mahdrip/ethibak/index.php या संकेतस्थळावर अर्ज करता येईल.

शेतकऱ्याच्या नावे मालकीहक्काचा ८-अ आणि ७/१२ असावा. सिंचनाची सुविधा असावी व त्याची नोंद ७/१२ उताऱ्यावर असावी. नोंद नसल्यास विहीर किंवा शेततळ्याबाबत लाभार्थ्यांनी स्वयं घोषणापत्र द्यावे. इतर साधनांद्वारे सिंचनाची व्यवस्था असल्यास संबंधित विभागाच्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक. सामूहिक सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास इतर संबंधितांचे करारपत्र द्यावे. विद्युत पंपाकरिता कायमस्वरूपी विद्युत जोडणी असावी. सोलरपंपाची व्यवस्था असल्यास सोलरपंप बसवून घेतल्याबाबतचे पत्र व सोलरपंपाबाबतची कागदपत्रे शेतकऱ्यांनी प्रस्तावासोबत द्यावे. शेतकऱ्याचे आधारकार्ड आवश्यक. आधार क्रमांक नाही अशांनी आधार नोंदणी पावती/मतदार ओळखपत्र/रेशनकार्ड/पासपोर्ट/पॅनकार्ड/किसान फोटोकार्ड/मनरेगा कार्ड/बँक पोस्ट ऑफिस पासबुक/शासकीय कर्मचारी असल्यास ओळखपत्र यापैकी पुरावा सादर केल्यास योजनेचा लाभ घेता येईल. योजनेसाठी पूर्वसंमती आवश्यक आहे. अल्प व अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के आणि इतरांना ४५ टक्के अनुदान प्राप्त होते.

## मत्स्यव्यवसाय विभागाच्या योजना

मत्स्यव्यवसाय विभागाने राज्यातील मच्छीमार बांधवांसाठी विविध योजना सुरू केल्या आहेत. या योजनांची माहिती पुढीलप्रमाणे:-

### प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना

मत्स्यव्यवसायाशी निगडित सर्व योजना एकाच छत्राखाली आणण्यासाठी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना केंद्र शासनाने सुरू केली आहे. यामध्ये राज्य शासनाचाही सहभाग असून राज्यस्तरावरून त्याची अंमलबजावणी सर्व जिल्ह्यांमध्ये करण्यात येत आहे.

**अधिक माहिती** : प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेचा तपशील https://fisheries.maharashtra.gov.in व http://nfdb.gov.in/guidelines या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज जिल्ह्याच्या साहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय कार्यालयात करावा.

### नौकांना डिझेलवरील मूल्यवर्धित कराची प्रतिपूर्ती

राज्यातील सागरी क्षेत्रातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना त्यांच्या यांत्रिक नौकेसाठी (१-६ सिलेंडर) लागणाऱ्या हायस्पीड डिझेल तेलावर १०० टक्के विक्रीकर सवलतीची योजना वित्त विभागामार्फत राबवण्यात येत होती. शासन निर्णय ३ सप्टेंबर २००५ अन्वये राज्यातील मच्छीमार सहकारी संस्थांच्या यांत्रिक नौकांना (१-६ सिलेंडर) लागणाऱ्या हायस्पीड डिझेल तेलावर मूल्यवर्धित कराची (व्हीएटी) १०० टक्के प्रतिपूर्ती देण्याची योजना कार्यान्वित केली आहे.



### उपाययोजनांवर भर



“महाराष्ट्राला समृद्ध असा सागरी किनारा लाभला आहे. या किनाऱ्यामुळे मत्स्य संपदेची वाढ, उत्पादन व निर्यातीला मोठा वाव आहे. हे लक्षात घेऊनच राज्य शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागामार्फत अनेक योजना राबवण्यात येत आहेत. केंद्र शासनाने आता प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत एका छताखाली सर्व योजना एकत्र केल्या आहेत. निसर्ग चक्रीवादळ, महा चक्रीवादळ तसेच तोक्ते चक्रीवादळ अशा नैसर्गिक संकटाच्या वेळी राज्य शासन मच्छीमारांना दिलासा देण्यासाठी कार्यरत आहे. चक्रीवादळग्रस्तांना मदत मिळावी, यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जात आहे. तसेच अनेक काळापासून प्रलंबित असलेली डिझेल परताव्याची रक्कम देण्यात येत आहे. राज्यातील मत्स्य उत्पादनात वाढ करणे, मालाची निर्यात वाढवणे, मत्स्यव्यवसाय क्षेत्रात रोजगार निर्मिती वाढवणे व मच्छीमारांचा आर्थिकस्तर उंचावण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. यामध्ये पायाभूत सुविधांसह इतर विकासकामांवर भर देण्यात येत आहे.”

**- अस्लम शेख,**
वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे विकास मंत्री

### जलाशय/तलाव मासेमारीकरिता ठेक्याने देणे

भूजलाशयीन क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक व्हावी, व मत्स्योत्पादनात वाढ व्हावी, तसेच केंद्र शासनामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांचा फायदा हा स्थानिक मच्छिमारांना होण्याच्या दृष्टीने जलक्षेत्रानुसार म्हणजेच ५०० हे. पर्यंत ५००.०१ ते १००० हे. पर्यंत व १०००.०१ हे. वरील याप्रमाणे तीन गट केले असून, तलाव/जलाशयामध्ये मत्स्यव्यवसायाकरिता राबवण्यात येणाऱ्या तलाव ठेका धोरणामध्ये जलक्षेत्र विकास व पारंपरिक मच्छीमारांचे हित लक्षात घेऊन सुधारीत तलाव धोरण तयार केले आहे.

राज्यामध्ये मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत येणाऱ्या २५७९ पैकी २३७७ तलाव/जलाशय हे २०० हे. पर्यंत, २००.०१ ते १००० हे. पर्यंत १५६ तलाव असून त्याचे मासेमारी हक्क स्थानिक मच्छीमार संस्थांना देण्यात येतात तसेच १०००.०१ हे. वरील ४६ जलाशय असून, या जलाशयांचा विकास होण्यासाठी, मत्स्योत्पादनात वाढ होण्याकरिता मत्स्यव्यवसाय स्पर्धात्मक होण्याच्या दृष्टीने, जलाशय राज्यातील सहकारी संस्था/खासगी उद्योजकांना/खासगी व्यक्तींना ई-निविदा पद्धतीने देण्यात येतात. या योजनेसाठी संबंधित जिल्ह्यातील साहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्याकडे संपर्क साधावा.

**मासेमारी साधनांच्या खरेदीवर अर्थसाहाय्य** : मच्छीमार सहकारी संस्थांच्या सभासदांना महत्त्वाच्या मासेमारी साधनांच्या खरेदीवर

अनुदान देण्यात येते.

**सागरी मत्स्योद्योग :** नायलॉन सूत/तयार जाळी जाळ्यांच्या किंमतीच्या १५ टक्के परंतु तेवढ्याच वजनांच्या मर्यादेत, मोनोफिलामेंट सूत/जाळी ३ टनावरील प्रत्येक बोटीस प्रत्येक वर्षी १०० कि.ग्रॅम) व सुताच्या किंमतीच्या १५ टक्के मर्यादेपर्यंत, तर ३ टनाखालील प्रत्येक बोटीस प्रत्येक वर्षी ५० कि.ग्रॅम) १५ टक्के मर्यादेपर्यंत.

**भूजल मत्स्योद्योग :** नायलॉन सूत/जाळी सूताच्या किंमतीच्या ५० टक्के, मोनोफिलामेंट सूत/जाळी, प्रत्येक मच्छीमाराला प्रतिवर्षी ५ किलो सूताच्या किंमतीच्या ५० टक्के मर्यादेपर्यंत.

**बिगर यांत्रिक नौका :** भूजल क्षेत्रात लहान आकाराच्या होड्या/नौका बांधणीसाठी प्रत्यक्ष किंमतीच्या ५० टक्के किंवा ३००० रुपयांपर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम अनुदान रूपाने देण्यात येते. लहान मच्छीमारांनाही आवश्यक त्या साधनांच्या खरेदीवर अर्थसाहाय्य देण्याची तरतूद या योजनेत आहे. रापणकारांना रापणीच्या सुतावर सागरी क्षेत्रातील परंपरागत पद्धतीने मासेमारी करणाऱ्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लहान मच्छीमारांना तसेच रापणकारांना मासेमारीसाठी साहाय्य व्हावे, या दृष्टिने १० टनापर्यंत बिगर यांत्रिक नौका बांधण्यास किंवा तयार नौका खरेदी करण्याकरिता प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के किंवा १,००,००० रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान दिले जाते.



## मासेमार संकटनिवारण निधी योजना

मच्छीमारास मासेमारी करताना अपघाती मृत्यू झाल्यास/बेपत्ता झाल्यास त्यांच्या वारसांना नियम व अटींच्या आधारे मासेमार संकट निवारण निधीतून. १,००,००० रुपये इतके अर्थसाहाय्य देण्यात येते. या योजनेसाठी अर्ज वारसाने संबंधित जिल्ह्यातील साहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांच्याकडे सादर करावा.

## राष्ट्रीय सहकार विकास निगम योजना

राज्याच्या सागरी किनाऱ्यावर खोल समुद्रातील मासेमारी करण्यासाठी १४.५ मीटर ते १६ मीटर लांबीच्या नौका (ऑफशोर वेसल्स) बांधण्यासाठी आणि १५० ते २०० अश्वशक्तीचे इंजिन असलेले व इतर अत्याधुनिक यंत्रसामग्री खरेदीसाठी मच्छीमार सहकारी संस्थेस/गटास राष्ट्रीय सहकार विकास निगम योजनेखालील अर्थसाहाय्य मंजूर करण्यात येते. या योजनेत राज्य शासनाकडून मच्छीमार संस्थेस/गटास ५५ टक्के कर्ज, ५ टक्के भागभांडवल, ३० टक्के खास विमोचक भागभांडवल, १० टक्के रक्कम गटाने/संस्थेने भरणे आवश्यक आहे. या योजनासाठी अर्ज संबंधित जिल्ह्यातील साहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचेकडे सादर करावा.

**ब) मच्छीमार सहकारी संस्थांना (१००% रासविनि अर्थसाहाय्य) :** मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना विक्री, वितरण व पुरवठा व्यवस्थेसाठी (मत्स्यबीज, बोटुकली, खते, खाद्ये इत्यादीसमवेत) भागभांडवल अर्थसाहाय्य देऊन सहकारी संस्था बळकट करणे व सहकारी संस्थेच्या सभासदांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंचावणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

## योजनेचे स्वरूप

सागरी क्षेत्रातील मच्छीमार सहकारी संस्थांना नियमांना अनुसरून ओली व सुकी मासळी खरेदी विक्री व मासेमारी साधने खरेदी विक्री व्यवहारासाठी भागभांडवल दिले जाते. तसेच भूजल क्षेत्रातील संस्थांना तलाव ठेका रक्कम, मत्स्यबीज, कोळंबी बीज, खते, प्रथिने इ. खरेदीसाठी तसेच वाहतूक व्यवस्था, संचयन, हार्वेस्टिंग, विक्री व्यवस्थेसाठी मजुरी इत्यादीसाठी भागभांडवल अर्थसाहाय्य दिले जाते. या योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या भागभांडवल अर्थसाहाय्याची परतफेड, अर्थसाहाय्य वाटप झाल्यानंतर एक वर्षानंतर ८ वार्षिक समान हप्त्यात संस्थेकडून शासनास परत केली जाते. यासाठी व्याज अनुज्ञेय नाही तथापि लाभार्थी संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर दराने लाभांश शासनास दिला पाहिजे. या योजनेसाठी अर्ज संबंधित जिल्ह्यातील साहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) यांच्याकडे सादर करावा.

## डिझेल तेलावर सवलत (१०० टक्के केंद्र पुरस्कृत)

मासेमारी नौकांसाठी वापरल्या जाणाऱ्या डिझेलकरिता मच्छीमारांना डिझेल वापराच्या मर्यादेत १.५० रुपये प्रतिलीटर सवलत केंद्र शासनामार्फत दिली जाते. त्यासाठी लाभधारक दारिद्र्यरेषेखालील असावा. सागरी मासेमारी कायद्याचे पालन करणाऱ्या मासेमारी नौका सदर लाभ मिळण्यास पात्र असतील. मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करणाऱ्या मासेमारी नौका सदर लाभ मिळण्यास अपात्र असतील. नवव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत बांधलेल्या व २० मीटरपेक्षा कमी लांब असलेल्या मासेमारी नौका लाभास पात्र असतील. या नौकेची मासेमारी नौका म्हणून नोंदणी झालेली असावी.

**निमखारे पाण्यातील कोळंबी बीज उत्पादन केंद्राची उभारणी :** लाभार्थीला कोळंबी बीज उत्पादन केंद्राचा अनुभव असणे आवश्यक आहे. लाभार्थी ज्या जागेत संवर्धन करणार आहे. ती जागा अतिक्रमण बाधित नसावी तसेच प्रकल्प उभारण्यासाठी लाभार्थीने स्वत:ला करावयाच्या खर्चासंबंधी वित्तीय कागदपत्रे सादर करणे व तसा उल्लेख डी.पी.आर.मध्ये नमूद करणे आवश्यक आहे. लाभार्थीने त्याच्या कोळंबी बीज उत्पादन केंद्रात हे स्थानिक संवर्धकांना घाऊक बाजारभावाने पुरवठा करणे आवश्यक आहे.

**अर्थसाहाय्याचे स्वरूप :** प्रतिकोळंबी बीज केंद्रासाठी वार्षिक ५ दशलक्ष पोस्ट लार्वा आकाराचे कोळंबी बीज तयार करण्यासाठी प्रकल्प किंमती एवढे अर्थसाहाय्य परंतू ५० लक्ष रुपयांच्या मर्यादेपैकी सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी अनुदानाची रक्कम ४० टक्के इतकी राहील.

या योजनेसाठी अर्ज संबंधित जिल्ह्यातील साहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) यांच्याकडे सादर करावा.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**सौर ऊर्जा हा अपारंपरिक ऊर्जा स्रोतांपैकी शाश्वत व निरंतर स्वरूपाचा एक महत्त्वाचा ऊर्जा स्रोत आहे. राज्य शासनाने अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा विकास घडवून आणण्यासाठी वेळोवेळी प्रोत्साहनात्मक धोरणे जाहीर केली आहेत. त्यानुसार शेतकऱ्यांच्या कृषिपंप वीजजोडण्यांचे विद्युतीकरण सौर ऊर्जेद्वारे करण्यासाठी, राज्य शासन गेल्या काही वर्षांपासून स्वयंअर्थसाहाय्यित तसेच केंद्र शासनाच्या अर्थसाहाय्यातून विविध योजना राबवत आहे. त्याअंतर्गत केंद्र शासनाकडून देशभरात राबवण्यात येत असलेल्या 'प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवंम उत्थान महाभियानाला (कुसुम)' राज्यात गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

# कृषीला जोड सौर ऊर्जेची

**सचिन गाढवे**

राज्य शासनाने राज्यातील कृषिपंप वीज जोडण्यांचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे अभियान नुकतेच जाहीर केले आहे. १८ डिसेंबर, २०२० रोजी शासन निर्णयाद्वारे मंजूर केलेल्या कृषिपंप वीज जोडणी धोरण-२०२० नुसार सर्व शेतकऱ्यांना विश्वासार्ह, किफायतशीर आणि दिवसा सुनिश्चित वीज पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे.

'किसान ऊर्जा सुरक्षा एवंम उत्थान महाभियान (कुसुम) हे वर्ष २०१९-२० ते २०२२-२३ या कालावधीसाठी राबवण्यात येणार आहे. यामध्ये तीन घटक राबवण्यात येणार आहेत.

१) **घटक अ :** विकेंद्रित पारेषण संलग्न जमिनीवरील वा स्टिल्ट माऊंटेड सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे.

२) **घटक ब :** पारेषण विरहित सौर कृषिपंप आस्थापित करणे.

३) **घटक क :** पारेषण संलग्न सौर कृषिपंप संयंत्र आस्थापित करणे, तसेच खासगी सहभागाने पारेषण संलग्न सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे.



## अभियानांतर्गत घटक 'अ'

**विकेंद्रित पारेषण संलग्न जमिनीवरील वा स्टिल्ट माऊंटेड सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे :** याअंतर्गत उपकेंद्र पातळीवर विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्यात येतील. केंद्र शासनाने राज्यासाठी या अंतर्गत एकूण ३०० मेगावॅट क्षमतेचे कृषी वापरासाठी सौर प्रकल्प मंजूर केले आहेत. तथापि, राज्य शासनाने उद्दिष्टापेक्षा अधिक काम या घटकांतर्गत करण्याचे ठरवले आहे. याची अंमलबजावणी महावितरण कंपनीद्वारे करण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी उपकेंद्र पातळीवर ०.५ ते २ मेगावॅट क्षमतेपर्यंत सौर ऊर्जेच्या प्रकल्पांद्वारे विद्युतीकरण करण्यात येईल. ५ वर्षांत एकूण ५००० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे नियोजित आहे.

### अभियानाची महत्त्वाची वैशिष्ट्ये

- या अभियानामध्ये शेतकरी / सहकारी संस्था / ग्रामपंचायत / शेतकरी उत्पादक संघटना / जल उपभोक्ता संघटना / सौर ऊर्जा विकासक सहभागी होऊ शकतात तसेच त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या जमिनीवर हे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येतील.
- वरील घटकांकडे जमीन उपलब्ध नसल्यास महावितरण त्यांच्या स्वतःच्या आर्थिक स्रोतातून अथवा कुसुम योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अर्थसाहाय्यातून मालकी हक्काने अथवा भाडेपट्ट्याने सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी जमीन उपलब्ध करून देईल.
- असे प्रकल्प उभारण्यासाठी शेतकऱ्यांच्या पडीक वा अनुत्पादित शेतजमिनींचा वापर करण्यात यावा. तथापि, शेतकऱ्यांच्या उत्पादित शेतजमिनीवरही उभारता येऊ शकतील. स्टिल्ट्स खाली शेतकऱ्यांना अनुकूल शेती व शेतिपुरक व्यवसाय करता येईल.
- अशा प्रकल्पातून निर्माण होणारी वीज महावितरण कंपनीद्वारे खरेदी करण्यात येईल.
- असे प्रकल्प ऑनलाइनद्वारे स्टेट नोडल एजन्सीकडे (महाऊर्जा) नोंदणी करणे बंधनकारक राहील.

### केंद्र शासनाचे अनुदान

केंद्र शासन या अभियानांतर्गत उभारण्यात येणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान भाग भांडवलासाठी ६ लाख ६० हजार रुपये प्रतिमेगावॅट प्रतिवर्ष अथवा ४० पैसे प्रतियुनिट दरानुसार पहिल्या ५ वर्षाकरिता आर्थिक साहाय्य करेल.

### प्रकल्पाची देखभाल व दुरुस्ती

अभियान 'अ'अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी संबंधित उत्पादक अथवा विकासकाची राहील.

## अभियानांतर्गत घटक 'ब'

**पारेषण विरहित सौर कृषिपंप आस्थापित करणे:** राज्य मंत्रिमंडळाने ९ डिसेंबर, २०२० रोजी मंजुरी दिलेल्या अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० अंतर्गत प्रतिवर्षी १ लाख याप्रमाणे पुढील ५ वर्षात ५ लाख पारेषण विरहीत सौर कृषिपंप आस्थापित करण्यास मान्यता दिली आहे. त्याअंतर्गत पहिल्या वर्षी १ लाख पंपांसाठी १ हजार ९६९ कोटी ५० लाख रुपयांच्या तरतुदीस सहमती दिली आहे. शेतकऱ्यांना

### ‘कुसुम’ अभियानाला गती देणार



पैसे भरूनही प्रलंबित राहिलेल्या कृषिपंप वीज जोडण्या देण्याचे आव्हान राज्य शासनापुढे होते. त्यावर मात करण्यासाठी आम्ही महत्त्वपूर्ण असे ‘कृषिपंप वीज जोडणी धोरण-२०२०’ जाहीर केले. यामध्ये अपारंपरिक ऊर्जा स्रोतांतर्गत सौर ऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणात करण्याचे आम्ही ठरवले आहे. यासाठी आता ‘कुसुम’ अभियानाला राज्यात गती देणार आहोत. दरवर्षी १ लाख सौर कृषिपंप देण्याचे निश्चित करण्यात आले असून त्यामुळे शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज मिळणे शक्य होणार आहे. याशिवाय विकेंद्रित पारेषण संलग्न जमिनीवरील वा स्टिल्ट माऊंटेड सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यामध्ये शेतकरी, शेतकरी उत्पादक संघटना, सहकारी संस्था, ग्रामपंचायती आदींना शाश्वत उत्पन्नाचे एक महत्त्वाचे साधन उपलब्ध होऊ शकेल.

**- डॉ. नितीन राऊत,** ऊर्जा, मंत्री

दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे व पारंपरिक पद्धतीने कृषिपंप वीज जोडणीसाठी लागणाऱ्या राज्य शासनाच्या खर्चात व अनुदानात बचत व्हावी, या उद्देशाने पारेषण विरहित सौर कृषिपंप उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासन अनुदान साहाय्यित ‘अटल सौर कृषिपंप योजना’ तसेच राज्य शासनाची ‘मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजना’ राबवण्यात आल्या आहेत वा येत आहेत.

‘अटल सौर कृषिपंप योजना’ अंतर्गत टप्पा-१ मध्ये ५ हजार ६५० व टप्पा-२ मध्ये ७ हजार सौर कृषिपंप बसवण्यात आले आहेत. ‘मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजना’ अंतर्गत टप्पा १ मध्ये २५ हजार सौर कृषिपंप बसवण्यात आले असून टप्पा २ व ३ मधील ७५ हजार पैकी ३२ हजार सौर कृषिपंप नोव्हेंबर २०२० अखेर बसवण्यात आले आहेत.

केंद्र शासनाच्या ‘कुसुम’ महाभियानातील ‘घटक ब’ अंतर्गत पारेषण विरहित सौर कृषिपंप आस्थापित करावयाचे आहेत. या अंतर्गत केंद्र शासनाने राज्यासाठी एकूण पहिल्या वर्षी १ लाख सौर कृषीपंप मंजूर केले आहेत. राज्यात हे अभियान स्टेट नोडल एजन्सी (महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण- महाऊर्जा) मार्फत राबवण्यात येणार आहे.

### उद्दिष्टाचे अश्वशक्ती, प्रकार निहाय निश्चिती व वर्गवारी निहाय वाटप

सर्वसाधारणपणे मागील पुर्वानुभव, अपेक्षित मागणी व किंमतीचा विचार करून पुढील ५ वर्षासाठी ३ अश्वशक्ती (एचपी) क्षमतेचे ३ लाख (६० टक्के) सौर कृषिपंप, ५ अश्वशक्ती क्षमतेचे १ लाख ५० हजार (३० टक्के) तर ७.५ अश्वशक्ती क्षमतेचे ५० हजार (१० टक्के) पंप असतील. सर्व वर्गवारीतील सौर कृषिपंप हे डीसी पंप राहतील. सौर कृषिपंप वितरणाची ही योजना राज्यातील ३४ ग्रामीण जिल्ह्यात लोकसंख्येच्या प्रमाणात ‘प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य’ या तत्त्वावर राबवण्यात येणार आहे.

अश्वशक्तीनिहाय एकूण उद्दिष्टाच्या २२.५ टक्के इतके पंप अनुसूचित जाती (१३.५ टक्के पंप) व अनुसूचित जमाती (९ टक्के पंप) करिता राखीव राहतील. उर्वरित ७७.५ टक्के पंप इतके उद्दिष्ट सर्वसाधारण वर्गाच्या लाभार्थ्यांना वाटप करण्याचे नियोजित आहे.

या उद्दिष्टानुसार पहिल्या वर्षासाठी ३ एचपी क्षमतेचे सर्वसाधारण वर्गासाठी ४६ हजार ५००, अनुसूचित जाती वर्गासाठी ८ हजार १०० आणि अनुसूचित जमातींसाठी ५ हजार ४०० पंप वितरणाचे उद्दिष्ट आहे. ५ एचपी क्षमतेचे सर्वसाधारण वर्गासाठी २३ हजार २५०, अनुसूचित जाती वर्गासाठी ४ हजार ५० आणि अनुसूचित जमातींसाठी २ हजार ७०० पंप वितरणाचे आणि ७.५ एचपी क्षमतेचे सर्वसाधारण वर्गासाठी ७ हजार ७५०, अनुसूचित जाती वर्गासाठी १ हजार ३५० आणि अनुसूचित जमातींसाठी ९०० पंप वितरणाचे उद्दिष्ट आहे.

या योजनेसाठी केंद्र शासनाचे ३० टक्के अर्थसाहाय्य उपलब्ध होणार आहे. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्याचा हिस्सा १० टक्के आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्याचा हिस्सा ५ टक्के असणार असून उर्वरित ६० टक्के/ ६५ टक्के हिस्सा राज्य शासनाचा असेल.

### लाभ कोणाला आणि कसा

- शाश्वत जलस्रोत उपलब्ध आहे; तथापि, पारंपरिक पद्धतीने विद्युत जोडणी झाली नाही असे सर्व शेतकरी पात्र.
- २.५ एकरापर्यंत शेतजमीन धारक शेतकऱ्यास ३ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतचा, २.५१ ते ५ एकरापर्यंत शेतजमीन असल्यास ५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंत, तर ५ एकरावर शेतजमीन असल्यास ७.५ अश्वशक्ती क्षमतेचा सौर कृषिपंप देय.
- पात्र क्षमतेपेक्षा कमी क्षमतेच्या सौर कृषिपंपाची मागणी केल्यास ती अनुज्ञेय राहील.
- वैयक्तिक किंवा सामुदायिक शेततळे, विहीर, बोअरवेल यांचे मालक तसेच बारमाही वाहणारी नदी/नाले यांच्या शेजारील शेतजमीनधारक शेतकरीसुद्धा या योजनेसाठी पात्र राहतील.
- जलसंधारण कामाच्या पाणी जिरवण्याच्या पाणीसाठ्यामधून पाणी उपसण्यासाठी हे पंप वापरता येणार नाहीत.
- मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजना या योजनेंतर्गत महावितरण कंपनीकडे अर्ज केलेले पात्र परंतु सौर कृषिपंप वाटप न झालेले लाभार्थी या अभियानांतर्गत पात्र राहतील.
- ७.५ अश्वशक्तीपेक्षा जास्त क्षमतेचे सौर कृषिपंप बसवू इच्छिणारे शेतकरी ७.५ अश्वशक्ती क्षमतेच्या सौर कृषिपंपासाठी देय असलेल्या अनुदानास पात्र असतील. उर्वरित अधिकची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी भरणे आवश्यक राहील.

### कशी होईल योजनेची अंमलबजावणी

स्टेट नोडल एजन्सीद्वारे तयार करण्यात आलेल्या ऑनलाइन पोर्टलवर अर्जदाराला विहित नमुन्यातील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा असेल. सौर कृषिपंपासाठी

पुरवठादाराकडून ५ वर्षांसाठीचा सर्वंकष देखभाल व दुरुस्ती करार स्टेट नोडल एजन्सीद्वारे करण्यात येईल. तक्रार नोंदणीसाठी टोल-फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. सौर कृषिपंप आस्थापित झाल्यानंतर तो संबंधित लाभार्थ्यांस हस्तांतरित करण्यात येईल. त्यानंतर त्याची दैनंदिन सुरक्षितता करण्याची जबाबदारी संबंधित लाभार्थीची राहील.

## अभियानांतर्गत घटक 'क'

**पारेषण संलग्न सौर कृषिपंप आस्थापित करणे** : केंद्र शासनाच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेल्या अभियानाच्या घटक 'क'अंतर्गत शेतकऱ्यांना त्यांचे उत्पन्न वाढवण्याची चांगली संधी मिळणार आहे. या योजनेंतर्गत सौर ऊर्जेद्वारे निर्माण होणारी आणि स्वत:च्या सौर कृषिपंपासाठी वापर होऊन अतिरिक्त झालेली वीज नेट मीटरिंगद्वारे महावितरण कंपनीच्या ग्रीडमध्ये टाकण्यात येणार आहे. या अतिरिक्त विजेपोटी निश्चित केलेल्या दराने महावितरण कंपनीद्वारे मोबदला देण्याचे नियोजन आहे. या अभियानांतर्गत एकूण ५० हजार कृषिपंपाचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारून सौर ऊर्जीकरण करण्याचे नियोजित आहे.

### निकष व उद्दिष्टे

- या अभियानांतर्गत शेतकऱ्याकडे सद्य:स्थितीत असणाऱ्या पारंपरिक पद्धतीच्या कृषिपंपाच्या क्षमतेच्या दुप्पट क्षमतेपर्यंतच सौर ऊर्जा निर्मिती सयंत्र आस्थापित करता येईल.
- हे अभियान महावितरण कंपनीमार्फत राबवण्यात येईल. यात अभियानाच्या अंमलबजावणीच्या टप्प्यामध्ये त्या त्या आवश्यकतेनुसार महाऊर्जाचाही सहभाग असेल.
- या अभियानांतर्गत निर्मित सौर ऊर्जा वीज कृषी ग्राहक कृषी पंपासाठी वापरू शकेल व अतिरिक्त वीज ग्रीडमधून ज्या वेळी सौर ऊर्जा उपलब्ध नसेल त्या वेळी वापरू शकेल.
- शेतकऱ्याने ग्रीडला केलेल्या अतिरिक्त वीज पुरवठ्याची आकारणी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या फिड इन टेरिफप्रमाणे करण्यात येईल.
- शेतकऱ्यामार्फत ग्रीडला निर्यात करण्यात येणारी वीज सौर ऊर्जा पॅनलद्वारे निर्मिती झालेल्या वीजेच्या ५० टक्केपर्यंतच मर्यादित असेल.
- शेतकऱ्यामार्फत निर्यात होणारी वीज रोहित्र क्षमतेपेक्षा जास्त होऊ नये, याकरिता रोहित्र क्षमतेच्या ७० टक्के एवढी सौर क्षमता मंजूर करण्यात येईल. यात प्रथम येणाऱ्या शेतकऱ्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
- या अभियानांतर्गत असे प्रकल्प ऑनलाइन पोर्टलद्वारे स्टेट नोडल एजन्सीकडे नोंदणी करणे बंधनकारक राहील.
- या अभियानांतर्गत घटक क ची अंमलबजावणी केवळ संमिश्र वाहिनीवर (अनसॅग्रिगेटेड फिडर) राबवण्यात येईल.
- या अभियानांतर्गत उभारण्यात येणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी संबंधित उत्पादक अथवा विकासकाची राहील.

### सौर ऊर्जेद्वारे वीज पुरवठा



" नवीन ऊर्जा धोरणामुळे शेतकऱ्यांना वीज देणे शक्य होणार आहे. तसेच मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजनेंतर्गत दरवर्षी एक लाख सौर कृषिपंप देण्यात येणार आहेत. कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास वीज पुरवठा करण्याकरिता वितरण उपकेंद्र स्तरावर विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प उभारून वीज निर्मिती करून वीज पुरवठा करण्याची दीर्घकालीन योजना राबवण्यात येणार आहे. राज्यातील सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेचा जास्तीत जास्त वापर करण्याचा आमचा प्रयत्न आहे. राज्यातील एकही कुटुंब विजेपासून वंचित राहता कामा नये, हे आमचे ध्येय असून दुर्गम भागात जेथे वीज वाहिन्या पोहोचणे कठीण आहे अशा प्रत्येक ठिकाणी सौरऊर्जेद्वारे वीज पुरवठा करण्याचा मानस आहे. "

- **प्राजक्त तनपुरे,** ऊर्जा, राज्यमंत्री

### अनुदान आणि निधी

या अभियानांतर्गत पारेषण संलग्न सौर कृषिपंप आस्थापित करण्यास प्रत्यक्षात आलेल्या खर्चाच्या रकमेच्या ३० टक्के रक्कम केंद्र शासनामार्फत संबंधित शेतकऱ्यास देण्यात येईल. तसेच ३० टक्के रक्कम राज्य शासनामार्फत संबंधित शेतकऱ्यास देण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत लाभार्थी हिस्सा ४० टक्के राहील.

राज्यस्तरीय सुकाणू समिती - या अभियानाची अंमलबजावणी योग्यरीत्या होण्यासाठी ऊर्जामंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू समिती गठीत करण्यात येत आहे.

सौर ऊर्जा हा नित्यनूतनक्षम, पूर्यावरणपूरक, प्रदुषणविरहित ऊर्जेचा शाश्वत स्रोत आहे. दगडी कोळसा, वायू, पेट्रोल आणि इतर इंधनाचे स्रोत यांचा तुटवडा मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता असून भविष्यात केव्हा ना केव्हा ते संपुष्टात येऊ शकतात. त्यामुळे सौर ऊर्जे कडे वळणे ही काळाची गरज आहे. शेतीची विजेची मागणी आहे. हे लक्षात घेता कृषिपंपांसाठी सौर ऊर्जेचा वापर हरित ऊर्जेला चालना देणारा आणि पर्यावरणाचे रक्षण करणारा आहे. कुसुम महाभियानाच्या माध्यमातून केंद्र शासन आणि राज्य शासन पर्यावरण रक्षणाच्या चळवळ प्रत्यक्ष कृतीत आणत आहे असे निश्चितच म्हणता येईल.

अधिक माहितीसाठी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पुढील शासन निर्णय पाहावेत (शासन निर्णय राज्य शासनाच्या https:// maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत).

- कृषिपंप वीज जोडणी धोरण २०२० बाबतचा १८ डिसेंबर, २०२० रोजीचा शासन निर्णय.
- राज्यातील कृषिपंप वीज जोडण्यांचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे अभियानबाबतचा १२ मे २०२१ रोजीचा शासन निर्णय.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**शेतीबरोबरच पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे अविभाज्य भाग आहेत. यातून रोजगार निर्मितीला चालना मिळते. पशुधन हे लाखो ग्रामीण कुटुंबांचे महत्त्वाचे उत्पन्नाचे स्रोत आहेत. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभाग, रोजगार हमी योजना, मृद् व जलसंधारण विभागाच्या वतीने राज्यातील शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी विविध योजना राबवण्यात येतात. त्यातील निवडक योजनांची थोडक्यात माहिती..**

# पाठबळ योजनांचे

## पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभाग

**पशुसंवर्धन** व्यवसायाच्या माध्यमातून अनेक शेतकरी युवकांना स्वयंरोजगाराची व आर्थिक उन्नतीची संधी मिळावी, यासाठी अनेक योजना पशुसंवर्धन विभागाने हाती घेतल्या आहेत. यामध्ये राज्य योजना, जिल्हा योजना, केंद्र पुरस्कृत योजनांचा अंतर्भाव आहे. समाजातील दुर्बल व मागास प्रवर्गासाठी अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना यांसारख्या योजना राबवण्यात येत आहेत. या योजनांद्वारे दुभत्या गायी/म्हशी, शेळ्या, मेंढ्या व कुक्कुट गट वाटप करण्यात येत आहे. केंद्र पुरस्कृत योजनांद्वारे जनावरांना लसीकरण करण्यात येत आहे. लस उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे या संस्थेचे बळकटीकरण करण्यात येत आहे. तसेच, अचूक व जलद पशुरोगनिदानासाठी आधुनिक रोग निदान प्रयोगशाळांची स्थापना करण्यात येत आहे. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती खालीलप्रमाणे:-

### मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना

राज्यातील दुर्गम, डोंगराळ, आदिवासीबहुल भागामध्ये तसेच ज्या भागामध्ये पशुधनाच्या तुलनेत पशुवैद्यकीय दवाखान्यांची संख्या कमी आहे. त्याप्रमाणे ज्या भागामध्ये दळणवळणाच्या अपुऱ्या सुविधा आहेत. अशा तालुक्यांमधील पशुरुग्णांना पशुवैद्यकीय सेवा पशुपालकांच्या शेतकऱ्यांच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी, मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेंतर्गत राज्यातील ३४९ ग्रामीण तालुक्यांमध्ये फिरती पशुचिकित्सा पथके स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ही योजना कार्यान्वित करण्यासाठी १९६२ या टोल-फ्री क्रमांकासह कॉल सेंटर उभारणीसाठी इंडसइंड बँकेची उपकंपनी भारत फायनान्स इन्क्लुजन लिमिटेड या कंपनीबरोबर सामंजस्य करार करण्यात आलेला असून कॉल सेंटर कार्यान्वित झाले आहेत.



### पशुपालनातून आर्थिक उन्नतीला प्राधान्य



“ पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभागाद्वारे दुग्धव्यवसाय, कुक्कुट पालन, शेळी/मेंढी पालन, वराह पालन व्यवसाय अधिक सक्षम व उत्पादन वाढीसाठी देशी व संकरित गायीची पैदास करून उच्च आनुवंशिक गो-म्हैस वर्गीय कालवडी/पारड्यांची निर्मिती तसेच स्थानिक जातीच्या गोवंशामध्ये सुधारणा कार्यक्रम नियोजनबद्धरीतीने राबवले जात आहे. त्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळीमेंढी महामंडळाद्वारे दर्जेदार मांस उत्पादन करणाऱ्या शेळ्यांची निर्मितीसाठी तसेच सानेन या विदेशी जातीच्या दुधाळ शेळीचे संगोपन, प्रक्षेत्रावर करून नंतर क्षेत्रीयस्तरावर त्यांची संगोपनाद्वारे व्यापकता वाढवण्यात येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेळीमेंढी व्यवसायातून अधिक उत्पन्न मिळणार आहे.

**- सुनील केदार,**
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास, मंत्री ”

### कृत्रिम रेतनाद्वारे कालवडी/पारड्यांची निर्मिती

राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या गाई-म्हशींमध्ये लिंगवर्गीकृत वीर्यमात्रांचा वापर करून कृत्रिम रेतनाद्वारे उच्च उत्पादन आनुवंशिक क्षमता असलेल्या कालवडी/पारड्यांची निर्मिती करणे शक्य होऊन त्यांच्या दूध उत्पादनामध्ये वाढ होणार आहे. याद्वारे केवळ कालवडींचीच निर्मिती होणार असल्याने नर वासरे सांभाळण्याचा शेतकऱ्यांचा अतिरिक्त भार कमी होणार असून वैरण व इतर बाबींचीदेखील बचत होईल. या अंतर्गत देशी व संकरित गायी तसेच म्हशींमध्ये मुऱ्हा, पंढरपुरी, नागपुरी इत्यादी जातीच्या लिंगवर्गीकृत वीर्यमात्रांचा वापर केला जाणार आहे.

लिंगनिदान केलेल्या वीर्यमात्रांपासून

कृत्रिम रेतन करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळण्याकरिता प्रति वीर्यमात्राच्या किमतीवर शासनाने अर्थसाहाय्याद्वारे अनुदान दिले असून, सहकारी दूध संस्था / दूध संघ तसेच महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर यांच्याकडून प्रतिरेतमात्रा १०० रुपये इतके अनुदान दिले जाणार आहे. शेतकऱ्यांना या उच्च आनुवंशिक क्षमतेच्या वीर्यमात्राचा वापर करून कृत्रिम रेतनाची सुविधा मात्र ८१ रुपये अत्यल्प दरात मिळून त्यांच्या दूध उत्पादनामध्ये व आर्थिक उन्नतीमध्ये निश्चित वाढ होईल.

## जैव सुरक्षास्तर–३ प्रयोगशाळेची उभारणी

रोग अन्वेषण विभाग, पुणे ही राज्यस्तरीय संस्था पशुरोग निदानासाठी कार्यरत असून, या संस्थेला राष्ट्रीय पातळीवरील संदर्भ प्रयोगशाळेचा दर्जा प्राप्त आहे. त्यायोगे ही संस्था पश्चिम भारतातील महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, गोवा व छत्तीसगड ही राज्ये तसेच दादरा व नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशासाठी कार्य करते. बर्ड फ्ल्यूसारख्या पक्ष्यांमध्ये घातक असणाऱ्या रोगाच्या निदानाची सुविधा केंद्र शासनाच्या उच्च सुरक्षा पशुरोग निदान प्रयोगशाळा, भोपाळ या प्रयोगशाळेत उपलब्ध आहे. त्यामुळे राज्यातील रोगनिदानास होणारा विलंब टाळण्यासाठी तसेच, राज्यातील पशुधनाला प्रभावी रोगनिदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत रोग अन्वेषण विभाग, पुणे या संस्थेमध्ये एव्हीएन इन्फ्लुएंजा (बर्ड फ्ल्यू) आणि इतर प्राण्यापासून मानवास होणाऱ्या पशुरोगाच्या निदानासाठी जैव सुरक्षास्तर-३ प्रयोगशाळा उभारण्यास शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असून, त्यासाठी ७५.६१५ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत.

“

### पशुपालन व्यवसायाला चालना



पशुपालन आणि दुग्धव्यवसाय हा राज्यातील शेतकरी, शेतमजूर आणि अन्य घटकांचा महत्त्वपूर्ण शेतीपूरक व्यवसाय आहे. राज्यात व्यावसायिक कुक्कुटपालन, घरगुती कोंबडीपालन, शेळ्या, मेंढ्या पालन मोठ्या प्रमाणात होत असून, यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना ही राज्यातील दुर्गम, डोंगराळ, आदिवासी क्षेत्रातील पशुसंवर्धनास जिथे पशुवैद्यकीय सेवांची कमतरता आहे अशा भागासाठी नवसंजीवनी ठरणारी आहे. गाई, म्हैस गट वाटप, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी मेंढी महामंडळाच्या माध्यमातून सुधारित शेळी, मेंढीवाटप अशा बाबीतून कमी उत्पन्न असणाऱ्या गटांचा विकास साधण्यासाठी प्रयत्न होत आहे.

- **दत्तात्रय भरणे,** पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय, मृद् व जलसंधारण राज्यमंत्री

”

## राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रम

केंद्र शासनाने राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रम ही महत्त्वाकांक्षी योजना संपूर्ण देशात मिशन तत्त्वावर राबवण्यासाठी मंजुरी प्रदान केली आहे. ही योजना वर्ष २०१९-२० पासून पुढील १० वर्षांच्या कालावधीकरिता राबवण्याचे लक्ष्यांकित असून २०२४-२५ पर्यंत लाळखुरकूत आणि ब्रुसेल्ला (सांसर्गिक गर्भपात) या दोन्ही रोगांच्या प्रादुर्भावांवर प्रभावी नियंत्रण साध्य करणे आणि २०२९-३० पर्यंत या दोन्ही रोगांचे उच्चाटन साध्य करणे असे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले आहे.

## विदर्भ व मराठवाडा विभागासाठी विशेष प्रकल्प

विदर्भ व मराठवाडा विभागातील ११ जिल्ह्यातील ४२६३ गावांमध्ये दुधाचे उत्पादन वाढवण्यासाठी एक विशेष प्रकल्प राबवण्यात येत आहे. हा प्रकल्प राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत पशुसंवर्धन विभाग व राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ, आणंद (एनडीडीबी) यांच्या संयुक्त सहभागाने राबवण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांमधून राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाच्या मदर डेअरी मार्फत २२७०० दूध उत्पादकांकडून दररोज २०७६२५ लीटर दूध संकलन करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत वैरण विकास कार्यक्रम (ठोंबे लागवड, कडबा कुट्टी मशीन, सायलेज बॅग), गोचीड गोमाश्या निर्मूलन, वांझ निवारण शिबिरे, राशन बॅलेन्सिंग प्रशिक्षण कार्यक्रम, कृत्रिम रेतन, औषधोपचार, लसीकरण इत्यादी सुविधा पुरवण्यात येतात.

## दुधाळ गायी/म्हशींचे गट वाटप

राज्याच्या दूध उत्पादनामध्ये वाढ करण्याबरोबरच ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालकांना अर्थाजनाचे व स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी लाभार्थींना ६/४/२ गायी ६/४/२ दुधाळ म्हशींचे गट वाटप करण्यात येतात. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थींना गटाच्या किंमतीच्या ५० टक्के आणि अनुसूचित जाती व जमातींच्या लाभार्थींना गटाच्या किंमतीच्या ७५ टक्के अनुदान देण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गातील व अनुसूचित जाती/जमातींच्या लाभार्थींना अनुक्रमे १० टक्के व ५ टक्के एवढा निधी स्वत: उभारणे व उर्वरित रक्कम अनुक्रमे ४० टक्के व २० टक्के बँकेकडून कर्जरूपाने/ स्वत: उपलब्ध करून घ्यावयाची आहे.



### अंशत: ठाणबद्ध पद्धतीने शेळीपालन

या योजनेंतर्गत १० शेळ्या व १ बोकड यांचे गट वाटप करण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थींना गट किंमतीच्या ५० टक्के आणि अनुसूचित जाती व जमातींच्या लाभार्थींना प्रकल्प किंमतीच्या ७५ टक्के अनुदान देण्यात येते.

सर्वसाधारण प्रवर्गातील व अनुसूचित जाती/जमातींच्या लाभार्थींना अनुक्रमे १० टक्के व ५ टक्के एवढा निधी स्वत: उभारणे व उर्वरित रक्कम अनुक्रमे ४० टक्के व २० टक्के बँकेकडून कर्जरूपाने/ स्वत: उपलब्ध करून घ्यावयाची आहे. या योजनेंतर्गत पश्चिम महाराष्ट्र, खानदेश आणि मराठवाडा विभागातील जिल्ह्यांमध्ये उस्मानाबादी आणि संगमनेरी या जातीच्या, तर कोकण व विदर्भ विभागातील जिल्ह्यामध्ये स्थानिक हवामानामध्ये तग धरणाऱ्या शेळ्या व बोकड यांचे गटांचे वाटप करण्यात येते.

### शेतकरी आणि शेतीचा विकास साधण्याचा प्रयत्न



अकुशल रोजगारांची पूर्तता, दीर्घकालीन टिकणारी कामे व त्याद्वारे सामाजिक पायाभूत सोयी उपलब्ध करून देऊन ग्रामीण जनतेचे व शेतमजुरांचे राहणीमान उंचावेल व कायमस्वरूपी मालमत्ता तयार होईल, अशा प्रकारे योजनेची अंमलबजावणी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न होत आहेत. भविष्यातही नवनवीन उपक्रम राबवण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, पीक रचनेत बदल घडवून आणणे, फळबागांचे रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग योजनेंतर्गत पुनर्लागवड व पुनरुज्जीवन लागवड कार्यक्रम घेणे अशा विविध उपक्रमातून शेतकरी आणि शेती यांचा विकास साधण्याचा राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे.

**- संदिपानराव भुमरे,**
रोहयो व फलोत्पादन मंत्री

### कुक्कुटपालन व्यवसाय

राज्यात कुक्कुट मांस उत्पादनास मोठा वाव आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये सध्या कुक्कुट पालन/ कुक्कुट १००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुटपालन व्यवसाय करण्यासाठी लाभार्थींना कुक्कुट पक्षी गृह, विद्युतीकरण, खाद्य व पाण्याची भांडी या मूलभूत सुविधा उभारण्याकरिता सर्वसाधारण संवर्गातील लाभार्थींना ५० टक्के व अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या लाभार्थींना ७५ टक्के अर्थसाहाय्य करण्यात येते.



## फलोत्पादन विभाग

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि फलोत्पादन अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या योजनांची माहिती शेतमजूरांच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे काम जिल्हा ते गावस्तरापर्यंत रोहयोंतर्गत कार्यरत सर्व यंत्रणा करत आहेत.

### रोपवाटिका योजना



महाराष्ट्र राज्य हे फलोत्पादनामध्ये अग्रेसर आहे. तसेच मोठ्या प्रमाणात भाजीपाला पिकांचे व्यावसायिक पद्धतीने लागवड करून उत्पादन घेतले जाते. त्याची निर्यातही मोठ्या प्रमाणात करण्यात येते. मागील दोन-तीन वर्षांपासून भाजीपाला पिकांचे निर्यातक्षम व विषमुक्त उत्पादन करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. त्यामुळे भाजीपाला अभियानाच्या चांगल्या जाती व चांगली रोपे यांची मागणी वाढत आहे. त्या दृष्टीने भाजीपाला रोपांची नियंत्रित वातावरणामध्ये तयार झालेली कीड व रोगमुक्त भाजीपाला रोपांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरणार आहे.

पहिल्या टप्प्यात ५०० लाभधारकांची प्रायोगिक तत्त्वावर निवड करण्यात आली आहे. नियमाप्रमाणे अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहे.

### फळबाग पुनर्लागवड व पुनरुज्जीवन लागवड कार्यक्रम



निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण विभागात नुकसानग्रस्त फळबागांचे रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग योजनेंतर्गत पुनर्लागवड व पुनरुज्जीवन लागवड कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात

आला. राज्य रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग योजना पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. २०२०-२०२१ करिता ५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

### शासकीय रोपवाटिका

फळांच्या उत्कृष्ट बागा स्थापन करण्यासाठी जातिवंत व गुणवंत कलमा/रोपांचा पुरवठा होण्यासाठी विविध जातिवंत मातृवृक्ष लागवड करणे. मातृवृक्षापासून तयार केलेली कलमे/रोपे फलोत्पादन विकास कामासाठी विविध योजानांद्वारे गरजू शेतकऱ्यांना शासनमान्य दराने उपलब्ध करून देणे. भाजीपाला, फुलपिके, औषधी व सुगंधी वनस्पती यांच्या लागवड साहित्याचा पुरवठा करण्यासाठी शासकीय रोपवाटिकेवर विविध कार्यक्रम घेणे. याकरिता ही योजना सुरू करण्यात आली आहे.

### फलोत्पादन पिकावरील कीडरोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप)

आंबा, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, चिक्कू, टोमॅटो, भेंडी व काजू या पिकांवरील कीड, रोगांचे सर्वेक्षण करून त्याबाबत उपाय योजनेसाठी सल्ला देण्यात येतो.



या प्रकल्पात पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, बीड, जालना, लातूर, उस्मानाबाद, हिंगोली, नांदेड, बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, नागपूर, भंडारा व वर्धा अशा २८ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे.

२०२१-२२ मध्ये कृषी माल निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी फलोत्पादन विभागाचे खालील उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

- २०२०-२१ मध्ये हॉर्टीनेट प्रणालीअंतर्गत ग्रेपनेट, अनारनेट, मॅंगोनेट, व्हेजनेट व सिट्रसनेटमध्ये एकूण ६३५०२ निर्यातक्षम विक्रमी बागांची नोंदणी करण्यात आली.
- २०२१-२२ करिता एक लाख निर्यातक्षम बागा नोंदणी लक्ष्यांक.
- २०२१-२२ मध्ये द्राक्ष फ़ळाच्या निर्यातीसाठी-फळमाशी कीडमुक्त क्षेत्र घोषित करण्याकरिता सर्वेक्षण समिती गठन.



### शेतकरी हिताचे निर्णय

फलोत्पादनाच्या बाबतीत राज्याने देशपातळीवर इतर राज्याच्या तुलनेत अधिक प्रगती केली आहे. राज्याच्या सकल उत्पन्नामध्ये फलोत्पादनाचा वाटा महत्त्वाचा राहिलेला आहे. राज्यातील आंबा, द्राक्षे आदी फळे ही जगातील विविध देशात निर्यात केली जात आहेत. फलोत्पादन विभागामार्फत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना, लाभदायक फळबाग योजनेंतर्गत पुनर्लागवड व पुनरुज्जीवन लागवड कार्यक्रम आदी योजना राबवून फलोत्पादनाला चालना देण्यात येत आहे. राज्यातील कृषी उत्पादन, फलोत्पादन क्षेत्राला सक्षम करणाऱ्या सर्व घटकांवर लक्ष्य केंद्रित करून शेतकरी हिताचे निर्णय घेतले आहेत.

- **कुमारी आदिती तटकरे,**
उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन,
क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार,
माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री

- राज्यात एकूण २० प्रकारच्या फळे व भाजीपाला पिकांना भौगोलिक चिन्हांकनाचा दर्जा व भौगोलिक चिन्हांकन प्राप्त उत्पादनाचा वापर करण्यासाठी एकूण १८०० नोंदणीकृत वापरकर्त्यांना मान्यता, नोंदणीकृत वापरकर्ते वाढवण्यासाठी विशेष मोहीम.
- निर्यातवृद्धीसाठी राज्यस्तरावर कृषी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली निर्यातीशी संबंधित सर्व सहभागी संस्थांच्या मासिक आढावा सभेचे आयोजन.
- २०२१-२२ हंगामाकरिता कृषी निर्यातधोरणांतर्गत द्राक्षे, डाळिंब, आंबा, संत्रा, केळी आणि भाजीपाला क्लस्टर बेस डेव्हलपमेंट कार्यक्रम. जिल्ह्याचे निवडपूर्व, अपेडाद्वारे प्रशिक्षण कार्यक्रम सुरू आहेत.

## रोजगार हमी योजना विभाग

### महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

शेतकऱ्यांनी त्यांच्या स्वत:च्या शेतावर फळबाग लागवड करून रोजगार निर्मिती करणे व त्यांचा आर्थिक स्तर उंचावणे. फळबाग लागवड करून फळपिकांचे क्षेत्र वाढवून शेतीपूरक व्यवसायात वाढ करणे व उत्पादन वाढवणे. या योजनेंतर्गत समाविष्ट वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक शेतजमिनीवर फळबाग लागवड करून जमिनीवर आच्छादन निर्माण करणे, जमिनीची धूप कमी करणे व पर्यावरण समतोल राखणे. या उद्देशाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू करण्यात आली आहे.

## पीक सूक्ष्म सिंचन कार्यक्रम

प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना प्रतिथेंब अधिक पीक सूक्ष्म सिंचन कार्यक्रम (६०:४०) योजना राज्यातील सर्व जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. अनुदान मर्यादा अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकऱ्यांना ५५ टक्के, तर इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान, ५ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत लाभ दिला जातो. २०२०-२१ साठी मंजूर ५०० कोटी रुपयांपैकी ३६१.८५ कोटी रुपये निधी प्राप्त करून दिला आहे.

## शरद पवार ग्रामसमृद्धी योजना

ग्रामीण भागातील कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येक पात्र लाभार्थ्याला शरद पवार ग्रामसमृद्धी योजनेंतर्गत गाय व म्हैस यांच्याकरिता पक्का गोठा बांधणे, शेळीपालन शेड बांधणे, कुक्कुटपालन शेड बांधणे, भू-संजीवनी नाडेप कंपोस्टिंग ही कामे सर्वोत्तम प्राधान्यक्रमाने सर्व ग्रामपंचायत क्षेत्रात राबवण्यात येणार आहेत.

## गाय व म्हैस यांच्याकरिता पक्का गोठा बांधणे

गोठ्यातील ओबडधोबड जमिनीमुळे जनावरांपासून मिळणारे मौल्यवान मूत्र व शेण यांचा संचय करता न आल्यामुळे ते मोठ्या प्रमाणावर वाया जाते. जनावरांचे मूत्र व शेण हे एक उत्कृष्ट प्रकारचे सेंद्रिय खत असल्याने जनावरांच्या गोठ्यातील जागा ही सिमेंट काँक्रिटचा वापर करून पक्क्या स्वरूपात सपाटीकरण केल्यास जनावरांपासून मिळणारे मूत्र व शेण गोठ्याशेजारील खड्ड्यामध्ये एकत्र जमा करून त्याचा शेतजमिनीची सुपीकता व उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी उपयोग करून घेता येणार आहे.

## शेळीपालन शेड बांधणे

ग्रामीण भागामध्ये शेळ्या-मेंढ्यांपासून मिळणाऱ्या लेंड्या व मूत्र यापासून तयार होणाऱ्या उत्कृष्ट दर्जाच्या सेंद्रीय खतांचा पक्क्या स्वरूपाच्या व चांगल्या मोठ्या शेड नसल्याने नाश होतो. शेळ्या, मेंढ्याकरिता चांगल्या प्रतीच्या शेड बांधून दिल्यास या जनावरांचे आरोग्यदेखील चांगले राहणार असून वाया जाणारे मल, मूत्र एकत्र करून शेतीमध्ये उत्कृष्ट प्रकारचे सेंद्रीय खत म्हणून वापर करता येईल. यामुळे शेतीच्या सुपीकतेबरोबरच शेती उत्पादन वाढीसाठी चांगला परिणाम होऊन उदरनिर्वाहासाठी मदत होऊ शकेल.



## कुक्कुटपालन शेड बांधणे

परसातील कुक्कुट पालनामुळे ग्रामीण भागातील कुटुंबांना पूरक उत्पादनाबरोबरच आवश्यक पोषक प्राणिजन्य प्रथिनांचा पुरवठा होतो. खेड्यामध्ये कुक्कुटपक्षांना चांगल्या प्रतिचा निवारा उपलब्ध नसतो. त्यामुळे त्यांचे आरोग्य नेहमीच खालावलेले असते. कुक्कुटपक्ष्यांचे ऊन, पाऊस, परभक्षी जनावरे व वारंवार येणाऱ्या आजारांपासून संरक्षण करण्यासाठी चांगल्या प्रतिचा निवारा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. चांगल्या निवाऱ्यामुळे रात्रीच्या वेळी त्यांचे, पिल्लांचे व अंड्याचे परभक्षी प्राण्यांपासून संरक्षण होण्यास मदत होणार आहे.

## भू–संजीवनी नाडेप कंपोस्टिंग

जमिनीच्या आरोग्यात सुधारणा केल्यास कृषी उत्पादनात मोठ्या प्रमाणावर भर पडू शकते. शेतातील कचऱ्यावर कंपोस्टिंगद्वारे प्रक्रिया केल्यास त्यातील सेंद्रीय पदार्थ जैविक पद्धतीने, सूक्ष्मजीव तसेच गांडुळाद्वारे कुजून त्यापासून उत्तम प्रकारचे ह्यूमससारखे सेंद्रिय कंपोस्ट खत तयार होते. या खतांचा वापर शेतात मोठ्या प्रमाणावर केल्यास जमिनीच्या आरोग्यात सुधारणा होऊन, कृषी उत्पादनात मोठी भर पडू शकते. अशा सेंद्रिय पदार्थात सर्वच प्रकारचे सूक्ष्मजीव मोठ्या प्रमाणावर असतात. योग्य परिस्थितीत, या सूक्ष्मजीवांची संख्या वाढते आणि हे मोठ्या संख्येने असलेले सूक्ष्मजीव, सेंद्रिय पदार्थाचे विघटन झपाट्याने करतात.

## नवीन सिंचन विहिरी



महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन सिंचन विहिरींची कामे सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या सिंचन विहिरींची मर्यादा ५ वरून २० पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामपंचायत लोकसंख्या १५०० असेल तर ५ नवीन सिंचन विहिरी, १५०० ते ३००० पर्यंत १०, ३००० ते ५००० पर्यंत १५ तर ५००० च्या पुढे २० नवीन सिंचन विहिरींची कामे मंजूर करण्यात येणार आहे.

याच पद्धतीने पावसाचे पाणी अडवणे व जिरवणे, पाण्याचा उपसा करून सिंचन करणे, यासाठी अधिकाधिक जमीन लागवडीखाली आणणे हे उद्दिष्ट ठेवून अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात विहिरी घेण्यासाठी रोहयोंतर्गत जवाहर विहीर कार्यक्रम, विविध जिल्ह्यात धडक सिंचन विहिरी कार्यक्रम तसेच 'मागेल त्याला शेततळे' ही अनुदान पद्धतीची योजना सुरू करण्यात आली आहे. तसेच दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर विविध योजनांच्या अभिसरणामधून पालकमंत्री शेत, पाणंद रस्ते योजना राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मृद् व जलसंधारण विभाग

लोकसहभागावर तसेच नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारित राज्यातील ग्रामीण भागातील सर्व कार्यामध्ये मृद् व जलसंधारणाच्या प्रथा खोलवर रुजवून हरित ग्रामीण महाराष्ट्राची उभारणी करण्यास व गतीने कामे करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. पूर्वीच्या योजनांतर्गत झालेल्या कामांचा अभ्यास करून योग्य कामांना गती देण्याचाही प्रयत्न करण्यात येत आहे. मृद् व जलसंधारण कार्यक्रमामध्ये लोक सहभागास प्रोत्साहन देण्यासाठी नियोजनात्मक कार्यक्रम आखण्यात येत आहे.

### मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना

राज्यातील विविध योजनांमधून जलसंधारणाची कामे करण्यात आली आहेत. त्यांची देखभाल व दुरुस्तीअभावी आवश्यक तेवढा जलसंचय होत नसल्याने मुख्यमंत्री जलसंवर्धन ही नवीन महत्त्वपूर्ण योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेमुळे राज्यातील जलसाठ्यात मोठी वाढ होणार आहे.

राज्यात सुमारे ८ हजार जलसंधारण योजनांचे पुनरुज्जीवन केल्याने विकेंद्रित जलसाठे निर्माण होतील. भूजल पातळीत वाढ होईल तसेच संरक्षित सिंचन क्षमता निर्माण होईल. त्यासाठी मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना महत्त्वाची आहे. याकरिता १३४१ कोटींचा आराखडा प्रस्तावित आहे. राज्यात ० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमता असणारे सुमारे ९७ हजार प्रकल्प बांधले आहेत. यामध्ये सिमेंट नाला बांध, माती नाला बांध, कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे, गावतळे, पाझर तलाव, साठवण तलाव, लघुसिंचन योजना यांचा समावेश आहे. परंतु या कामांची बांधकामानंतर किरकोळ दुरुस्ती न झाल्याने अनेक प्रकल्पांची साठवण व सिंचन क्षमता कमी झाली असल्याचे आढळून आल्याने ही योजना संजीवनी ठरणार आहे.

जलसंधारण विभाग, जलसंपदा, पाणी पुरवठा, कृषी विभाग व सर्व जिल्हा परिषद यांच्याकडील १६ हजार नादुरुस्त प्रकल्पांची दुरुस्ती करण्यासाठी मृद् व जलसंधारण विभागाकडून विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. या दुरुस्तीमुळे ८ लक्ष ३१ हजार टी.सी.एम. पाणीसाठा पुनर्स्थापित होणार आहे. तसेच १ लक्ष ९० हजार सिंचन क्षमताही पुनर्स्थापित होणार आहे. यासाठी २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात ७२० कोटी रुपये तरतूद करण्यात आलेली आहे. ही सर्व कामे येत्या ३ वर्षात पूर्ण करण्यात येणार आहेत.

महाराष्ट्रातील ३०७.५८ लक्ष हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी ७५ टक्के क्षेत्र वहितीखाली आहे. यातील बरेच क्षेत्र पावसावर आधारित कोरडवाहू क्षेत्रात मोडत असल्यामुळे राज्याचे बहुतांश कृषी व्यवस्थापन हे कोरडवाहू शेती व्यवसायावर अवलंबून आहे. राज्यात प्रवाही सिंचनाद्वारे मोठ्या प्रमाणातील क्षेत्र सिंचनाखाली आणण्यास वाव आहे. राज्यामध्ये पाणलोट क्षेत्र आधारित मृद् व जलसंधारणाची कामे माथ्यापासून पायथ्यापर्यंत जमिनीच्या उपयोगितेनुसार करण्यात येणार आहेत.



पावसाच्या पाण्याच्या माराने, पाण्याच्या वेगवान प्रवाहाने तसेच वाऱ्याच्या झोताने जमिनीतील क्रियाशील सूक्ष्म कण, तसेच माती वाहून नेली जाते. या शेतजमिनीच्या धुपीमुळे होणारी मातीची घट थांबवणे अत्यंत जरुरीचे आहे. यासाठी ढाळीचे बांध करून पावसाचे पाणी अडवले जाऊन जमिनीतील वाहून जाणारे मातीचे कण, अन्नांश, तसेच ओलावा जमिनीतच साठवण्याचे काम करण्यास भविष्यात प्राधान्य देण्यात येणार आहे.

पाणलोट क्षेत्रातील डोंगराच्या उताराहून खालील भागात वेगात वाहत येणारे पाणी समपातळी चरामध्ये अडवल्याने पाण्याचा वेग कमी होतो. तसेच पाण्याबरोबर वाहत आलेली माती चरामध्ये साठून राहिल्यामुळे झाडांची वाढ जोमाने होते. समपातळी चरामध्ये साठलेली माती ही दर तीन वर्षांनी काढून टाकून चर पुन्हा पूर्वीप्रमाणे होतील. याप्रमाणे व्यवस्थापन ठेवण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत.

**– राजू धोत्रे,** विभागीय संपर्क अधिकारी

### जलसंधारणातून कृषीसमृद्धी



पाणी तर जीवन आहे हे फक्त उन्हाळा आला की, आपल्या लक्षात येते आणि पावसाळा सुरू झाला की, पावसाच्या पाण्याचे नियोजन न करता आपण त्याला नाल्याचा रस्ता दाखवतो. तसे न करता पावसाच्या पाण्याचे जमिनीत पुनर्भरण करणे अत्यंत आवश्यक आहे. पावसाळ्यात पुराचे जे पाणी नद्यांतून वाहत जाऊन समुद्रास मिळते ते पूर्णपणे वाया जाते. हे पुराचे पाणी थोपविणारे प्रकल्प किंवा पुराचे पाणी प्रथम जमिनीत जिरवणे गरजेचे आहे. यामुळे शेतीचा विकास होवून शेतकरी संपन्न होण्यास मदत होणार आहे. जलसंधारण प्रकल्पांच्या माध्यमातून शासन शेतकऱ्यांना प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे.

**- शंकरराव गडाख,**
मृद् व जलसंधारण मंत्री

राज्यातील शेतकरी समृद्ध व्हावा, त्याच्या उत्पादनाला योग्य भाव मिळावा, बाजारपेठ प्राप्त व्हावी याबरोबरच नव्या तंत्रज्ञानाचा वापर जास्तीत जास्त व्हावा, यासाठी राज्य शासन विविध उपक्रम राबवत आहे. त्यातून राज्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून येत आहे.

# पतपुरवठा, बाजारपेठांचे सक्षमीकरण

**काशीबाई थोरात**

सततची दुष्काळी परिस्थिती, अतिवृष्टी व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे राज्यातील शेतकरी गेल्या काही वर्षांपासून अडचणीत आला होता. अन्नदाता शेतकरी समृद्ध व्हावा म्हणून राज्य शासनाने शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कर्जमुक्त करणारी सहज, सोपी आणि पारदर्शक अशी 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना' २०१९ जाहीर केली. राष्ट्रीयीकृत बँका, व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, ग्रामीण बँका, विविध कार्यकारी सहकारी संस्थांकडून शेतकऱ्यांनी घेतलेल्या पीक कर्जाच्या थकबाकीची ३० सप्टेंबर २०१९ रोजी प्रतिशेतकरी २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आली. या योजनेंतर्गत ३१.५१ लाख खातेदारांना २० हजार १०९ कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला. उर्वरित लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरू आहे.



## पीक कर्ज वाटप

शेती उत्पादनासाठी शेती कर्ज विविध बँकामार्फत उपलब्ध करण्याचे नियोजन सहकार विभागातर्फे करण्यात येते. २०२०-२१ या वर्षातील खरीप हंगामासाठी राज्याचा ४५,७८५ कोटी रुपयांएवढा लक्ष्यांक निश्चित करण्यात आला होतो. त्यापैकी १ एप्रिल २०२० ते ३० सप्टेंबर २०२० या कालावधीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व व्यापारी बँकांनी सुमारे ४१.३० लाख शेतकऱ्यांना ३१,५६३ कोटी एवढा पीक कर्ज पुरवठा केला आहे. विशेषत: जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी त्यापैकी २५.७३ लाख शेतकऱ्यांना १३,७३८ कोटी रुपये एवढा पीक कर्ज पुरवठा केला आहे. खरीप २०२० मधील पीक कर्ज वाटपाचे प्रमाण ६८.४९ टक्के असून, मागील वर्षाच्या तुलनेत ते २८ टक्के जास्त आहे.

## खतांचा पुरवठा

राज्यातील सुमारे २१,३५० प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांपैकी सुमारे ४५० संस्था सभासदांना खतपुरवठा करत आहे. अशा संस्थांना दर्जेदार खतांचा माफक दरात पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने प्रथमच पुढाकार घेऊन इफ्को, कृभको, आरसीएफ आदी कंपन्यांनी उत्पादीत खतांचा ३० सप्टेंबर २०२० अखेर ५० विविध कार्यकारी सहकारी संस्था व २२ शेतकरी उत्पादक कंपन्यांना २५०४ टन खताचा पुरवठा केला आहे.

## सहकारी कर्जाचे पुनर्गठन

२०२० च्या खरीप हंगाममध्ये मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये सहकारी कर्जाचे पुनर्गठन व शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्यात आली. या हंगामामध्ये बाधित तालुक्यातील जे शेतकरी विहित मुदतीत पीक कर्जाची परतफेड करू शकणार नाहीत. अशा शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे (व्याजासह) मध्यम मुदतीच्या कर्जात पाच वर्षांच्या कालावधीसाठी पुनर्गठन करण्याचा निर्णय घेण्यात आला. कर्जाच्या पुनर्गठनाची कार्यवाही ३१ जुलै २०२१ पर्यंत पूर्ण करून पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे सर्व बँकांना शासनाने निर्देश दिले आहेत.

## रब्बी हंगाम पीक कर्ज वाटप

२०२०-२१ या वर्षातील रब्बी हंगामासाठी राज्याचा १६ हजार ६७३ कोटी एवढा लक्ष्यांक निश्चित केला होता. त्यापैकी ३१ डिसेंबर २०२० पर्यंत सुमारे ५ लाख ६५ हजार २६० शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात ५ हजार ८४४.९१ कोटी रुपयांचा पीक कर्ज पुरवठा केला आहे.

## सहकारी संस्थांचे सक्षमीकरण

राज्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांच्या सक्षमीकरणासाठी पीक कर्ज पुरवठ्याच्या प्रमाणात अर्थसाहाय्य करण्याचा निर्णय घेतला. या संस्थांनी प्रत्येक आर्थिक वर्षात केलेल्या कर्ज वाटपाच्या प्रमाणात ०.५ ते १.५ टक्के अर्थसाहाय्य देण्याचे शासनाचे धोरण आहे. २०२०-२१ या वर्षात ६०९.९० लाख निधी यापूर्वी वितरित करण्यात आला होता. उर्वरित १४२३.१० लाख निधी वितरित करून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना

सहकारी कृषी पतसंस्था व बँकांकडून पीककर्ज घेणाऱ्या व त्याची प्रतिवर्षी ३० जूनपर्यंत संपूर्ण परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना १ लाखापर्यंत पीक कर्जांवर वार्षिक ३ टक्के व त्यापुढील ३ लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जावर वार्षिक १ टक्के दराने व्याज सवलत देण्यात येते. २०२०-२१ वर्षात या योजनेंतर्गत १६०५.०० लाख निधी वितरित करण्यात आला असून ३७४५.०० लाख रुपये उर्वरित निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## कापूस खरेदीचे नियोजन

राज्यात ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्या कार्यरत असून या समित्यांतर्गत सुमारे ६५० उपबाजार कार्यरत आहेत. राज्यातील बाजार समित्यांमध्ये शेतमालाची दरवर्षी सुमारे ४० हजार कोटी रुपयांची उलाढाल होते. पणन विभागांतर्गत कृषी उत्पन्न बाजार समित्या व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक संघ, महाराष्ट्र राज्य सहकारी वखार महामंडळ, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आदी संस्था कार्यरत आहेत.

कोरोना संकटकाळात शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी विशेष लक्ष देऊन अन्नपुरवठा साखळी सुरळीत आणि जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत कसा राहील, यासाठी विशेष प्रयत्न केले. कोरोना काळात नियमांचे पालन करत, बाजार समित्यांचे कामकाज सुरू ठेवण्यात आले. लॉकडाऊनच्या काळात नियोजन करून खरेदी केंद्र सुरू ठेवल्यामुळे दहा वर्षातील विक्रमी अशी कापूस खरेदी झाली.

कृषी खात्याच्या अंदाजानुसार अपेक्षित उत्पादनाचा विचार करून भारतीय कपास निगम, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ यांनी कापूस खरेदीचे नियोजन केले.

## हमी भावाने खरेदीचे नियोजन

किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत हमी भावाने सोयाबीन, उडीद, मूग खरेदीचे नियोजन करून लॉकडाऊनच्या काळातही खरेदी केंद्रे सुरू ठेवली. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये, यासाठी खरेदी केंद्रावर होणारी गर्दी टाळण्यासाठी नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांना नोंदणीच्या क्रमवारीनुसार एसएमएसद्वारे संदेश पाठवून खरेदी प्रक्रिया राबवली.

## धान्य चाळण यंत्र

शेतमालाची प्रतवारी कृषी उत्पन्न बाजार समितीतच करता आली तर त्यास योग्य बाजारभाव मिळण्यास मदत होईल. यासाठी बाजार समितीच्या आवारात धान्य चाळण यंत्र येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्याला धान्य प्रतवारीची सुविधा त्याच ठिकाणी उपलब्ध होत आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीपुढील आव्हाने आणि भविष्यात करावयाची वाटचाल यासाठी पणन संचालक यांच्या अध्यक्षतेखाली १५ सदस्यांच्या अभ्यासगटाची निर्मिती करण्यात आली.

## भौगोलिक चिन्हांकन आणि मानांकन

राज्यातील २४ उत्पादनांना भौगोलिक चिन्हांकन, मानांकन प्राप्त झाले आहेत. कृषिमाल उत्पादकांच्या संस्थांकडे शेतकऱ्यांची, निर्यातदारांची, प्रक्रियादारांची नोंदणी करून कृषिमालाची बाजारसाखळी विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत.

भौगोलिक चिन्हांकन, मानांकन प्राप्त कृषी उत्पादनांचे प्रचार व प्रसिद्धीसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करून अनुदान योजनेंतर्गत डाळिंब, अंजीर, तांदूळ इ. उत्पादनाकरिता १३ प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

### शेतकरीहित सर्वतोपरी



कोरोना काळात शेतकऱ्यांचा शेतमाल पडून राहू नये, शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नयेत म्हणून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करून बाजार समित्यांचे कामकाज सुरू ठेवण्यात आले. बाजार समित्यांचे सौदे सलग तीन किंवा त्यापेक्षा जास्त दिवस बंद ठेवता येणार नाहीत अशा सूचना सर्व बाजार समित्यांना दिल्या.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक त्या सर्व उपाययोजना करून अन्नपुरवठा साखळी, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा, खरेदी विक्री यंत्रणा सुरळीत राहील, याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. गेल्या १० वर्षात झाली नाही इतकी विक्रमी कापूस खरेदी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. मधल्या काळात थांबलेल्या शेतकरी कर्जमुक्तीचा लाभ परत देणे सुरू केले. जे शेतकरी राहिले होते त्यांच्यासाठी पुन्हा आर्थिक तरतूद केली. खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या बांधावर खत पुरवठा केला.

शेतकरी बांधवाच्या हितासाठी कोरोनासारख्या महासंकटातसुद्धा सहकार क्षेत्र, कृषी उत्पादन, पणन क्षेत्राला सक्षम करणारे सर्व भागीदार, यावर लक्ष केंद्रित करून शेतकरी हिताचे निर्णय घेतले आहेत.

- **बाळासाहेब पाटील,** सहकार व पणन मंत्री

## कृषिमाल समुद्रामार्गे निर्यातीस चालना

कृषी पणन मंडळामार्फत शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, फर्म, सहकारी संस्था, निर्यातदार यांचा निर्यातीमध्ये थेट सहभाग वाढावा, यासाठी काही ठरावीक देश व उत्पादनांकरिता समुद्रामार्गे निर्यात वाहतूक अर्थसाहाय्य योजना राबवण्यात येत आहे. तसेच आंबा हंगाम २०२१ करिता कृषी पणन मंडळाच्या सर्व संबंधित सुविधा अद्ययावत करण्यात आल्या. पणन मंडळाच्या उत्पादक ते ग्राहक थेट विक्री उपक्रमांतर्गत गूळ, बेदाणा, द्राक्ष व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली. याद्वारे सुमारे ३२ मेट्रिक टन विक्री करण्यात आलेली असून सुमारे २८.१५ लाख रुपयांची उलाढाल झाली आहे. चालू वर्षी फळे व धान्य महोत्सव योजनेंतर्गत पणजी (गोवा) येथे तसेच कोल्हापूर येथे द्राक्ष महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवात ६६ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवून सुमारे ८० टन द्राक्ष व ३.५० टन बेदाण्याची थेट विक्री करण्यात आली. याद्वारे अनुक्रमे ४८.०० लाख व ८.२५ लाख रुपये अशी एकूण ५६.२५ लाखांची उलाढाल झाली.

विभागीय संपर्क अधिकारी

**महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत फार्मर्स फर्स्ट प्रकल्प, कृषी अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प, राहुरी; कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, सोलापूर यांच्यामार्फत 'ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे बनवणारे अवजार' याच्या प्रक्षेत्रीय चाचण्या तसेच वेगवेगळ्या ठिकाणी विविध प्रक्षेत्रीय प्रात्यक्षिके घेण्यात आली. या यंत्राच्या वापराने शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी फायदा झाला. या यंत्राचा शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त उपयोग करणे गरजेचे आहे.**

# जलसंधारणासाठी कृषी अवजार

**डॉ. तुळशीदास बास्टेवाड**

हवामानातील जागतिक बदलांचे तसेच तापमान वाढीचे दुष्परिणाम संपूर्ण जगावर होत आहेत. भारतही त्याला अपवाद नाही. गेल्या काही वर्षापासून पर्जन्यमान ज्या पद्धतीने बदलले आहे, ते पाहता आगामी काळ शेतीसाठी फार महत्त्वाचा राहणार आहे. मात्र सुयोग्य नियोजनाने आपण हे संकट परतवून लावू शकतो. शेती उत्पादनासाठी प्रामुख्याने जमीन, पाणी आणि हवामान या महत्त्वाच्या नैसर्गिक साधनसंपत्तीची अत्यंत आवश्यकता आहे. जमीन ही मूलभूत साधनसंपत्ती असून त्यावर आपली शेती व शेती उत्पादन अवलंबून असल्यामुळे या भूधनाची काळजी व त्याचे व्यवस्थापन योग्य रीतीने करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या भूधनापासून शाश्वत उत्पादन व उत्पन्न मिळवायचे असेल तर जमिनीची धूप थांबवण्याबरोबरच महाराष्ट्रात दर तीन ते चार वर्षांनी येणारी दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतामध्येच पाणी अडवणे व साठवणे हे मोठे आवाहन आहे. पावसाचे पाणी ज्या ठिकाणी पडेल त्याच ठिकाणी ते थांबवले पाहिजे, जिरवले पाहिजे.

## मूलस्थानी जलसंधारण पद्धती

पावसाच्या पडलेल्या प्रत्येक थेंबाची आपणास गरज आहे. या थेंबाचा पीक संगोपन व वाढीकरिता कार्यक्षम उपयोग करून घेतल्यास पीक उत्पादनात निश्चित शाश्वतता आणता येईल. पिकाच्या मूलस्थानी पावसाचे पाणी जेथे पडेल तेथेच अडवून जमिनीत मुरण्यास मदत होते. त्यामुळे एकूणच जलसंधारण जास्त प्रभावीपणे तसेच सर्व क्षेत्रावर समप्रमाणात साधने शक्य होते. जमिनीत ओलावा दीर्घकाळ टिकून पिकाच्या संवेदनशील अवस्थेत उपयोगात येऊन मूलस्थानी जलसंधारण पद्धतीवर घेतलेले उत्पादन २० ते २५ टक्के अधिक मिळते. कोरडवाहू शेती ही नेहमी एकूण पडणाऱ्या पावसावर अवलंबून नसून ती पडणाऱ्या पावसाच्या


ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे बनवणारे अवजार.

पाण्यापैकी जमिनीत मुरणाऱ्या पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते.

पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्याचा सर्वात कार्यक्षम आणि स्वस्त मार्ग म्हणजे मूलस्थानी जलसंधारण. माती आणि जलसंधारणाच्या प्रभावी पद्धतींपैकी एक म्हणजे शेतात बंदिस्त वाफे तयार करणे. उताराला आडवे वाफे व उभे वाफे समांतर अंतराने जोडून तयार झालेले बंदिस्त वाफे पावसाचे पाणी शेतात मुरवण्यास उपयुक्त ठरतात.



ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे बनवणाऱ्या अवजाराने शेतात ६ x २ मीटर अंतराचे बंदिस्त वाफे तयार करताना.

पाणी वाहून जात नाही. तसेच पाण्याची व मातीची धूप रोखते, आर्द्रता वाचते आणि पिकाचे उत्पादन वाढते. जेव्हा पाऊस पडतो तेव्हा शेतजमिनीच्या पृष्ठभागावर पडणारे पावसाचे पाणी वाहून न जाता तयार केलेल्या बंदिस्त वाफ्यामध्ये पाणी अडवले जाते आणि जमिनीत मुरवण्यास मदत होते.

## उपयुक्त व फायदेशीर

बंदिस्त वाफे तयार करण्यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीने विकसित केलेले 'ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे बनवणारे अवजार' अतिशय उपयुक्त व फायदेशीर आहे. या यंत्राची प्रक्षेत्रीय कार्यक्षमता खूप चांगली आहे हे यंत्र ३५ अश्वशक्ती किंवा त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालवले जाऊ शकते. या यंत्राने एका दिवसात ४ ते ४.५ हेक्टर क्षेत्रावर बंदिस्त वाफे तयार करता येतात. या यंत्राच्या वापरामुळे पारंपरिक पद्धतीपेक्षा खर्चामध्ये ३० ते ४० टक्के बचत होते व गरजेनुसार आणि वेळेवर काम करता येते. या यंत्राचा वापर करून तयार केलेल्या बंदिस्त वाफ्यामुळे शेतातील माती पावसाच्या पाण्यासोबत वाहून न जाता शेतातच अडवली जाते व मातीचे नुकसानही टळते. याचा उपयोग पावसावर अवलंबून असणाऱ्या पिकांसाठी जास्त फायदेशीर आहे (उदा. ज्वारी, बाजरी, मका, डाळी आणि तेल बियाणे, काही नगदी पिके जसे कापूस, एरंडेल आणि भुईमूग) आणि परिणामी पिकांचे उत्पादन वाढते. रब्बी ज्वारीसाठी जमिनीत पावसाचे पाणी मुरवण्यासाठी बंदिस्त वाफे तयार करता येतात आणि या पद्धतीमुळे रब्बी ज्वारीचे उत्पादन २ ते ३ क्विंटलपर्यंत वाढले आहे.



ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे बनवणाऱ्या अवजाराने तयार केलेल्या बंदिस्त वाफ्यामध्ये साठलेले पावसाचे पाणी.

## बंदिस्त वाफे बनवणारे यांत्रिक यंत्र

सद्य:स्थितीत शेतामध्ये बंदिस्त वाफे हे पारंपरिक पद्धतीने बनवले जातात आणि त्यासाठी जास्त शेतमजुरांची आवश्यकता असते तसेच जास्त वेळ लागणारे व खर्चीक काम आहे. बहुतेक वेळेस जून ते जुलै यादरम्यान शेतमजुरांची टंचाई भासते. या परिस्थितीत जलद आणि कमी खर्चात शेतामध्ये बंदिस्त वाफे तयार करण्यासाठी यांत्रिक यंत्र असणे सर्वात उपयुक्त ठरते.

ही बाब विचारात घेऊन महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत अखिल भारतीय समन्वयित कृषी अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प, म.फु.कृ.वि., राहुरी यांनी 'ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे बनवणारे अवजार' विकसित केले आहे. या यंत्राने ६ मीटर लांबीचे व २ मीटर रुंदीचे बंदिस्त वाफे तयार करता येतात. वाफ्याच्या वरंब्याची उंची साधारणपणे २० ते २२ सें.मी. राहते. या यंत्राच्या साहाय्याने तयार होण्याऱ्या बंदिस्त वाफ्यामुळे शेतात पडणारे पावसाचे पाणी ज्या ठिकाणी पडते त्याच ठिकाणी मुरवले जाते. त्यामुळे जमिनीमध्ये ५० टक्के जास्त ओल साठवली जाते. बंदिस्त वाफे तयार करणे हे मृद् व जलसंधारण पद्धतींपैकी एक आहे आणि त्यामुळे पावसाचे

(प्रमुख संशोधक, अखिल भारतीय समन्वयित कृषी अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)

**राज्यातील शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसाय आणि नागरिकांना पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी राज्यात कृषी पर्यटन धोरण राबवण्यास सुरुवात करण्यात आली आहे. कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास, शेती उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करणे, कृषिपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देणे, गावातील महिला तरुणांना रोजगाराची संधी देणे, लोककला आणि परंपरांचे दर्शन घडवणे, पर्यटकांना प्रत्यक्ष शेतीतील कामाचा अनुभव देणे, प्रदूषणमुक्त व निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याचा अनुभव देणे असा या धोरणाचा उद्देश आहे. राज्यातील कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र कृषी पर्यटन व ग्रामीण पर्यटन विकास समितीदेखील आहे.**

**प्रा. गणेश चप्पलवार**



# संधी कृषी पर्यटनाची

कृषी पर्यटन म्हणजे आपल्या शेतात शहरी पर्यटकांना बोलवून शेती आणि गावाची संस्कृती प्रत्यक्षात दाखवणे. शिवार फेरीच्या माध्यमातून शेती कशी पिकवली जाते, कशी केली जाते. विविध पिके, फळांची माहिती शहरी पर्यटकांना आपल्या पद्धतीने सांगणे. शेतकरी शेत पिकवण्यासाठी कधी, काय, कसा आणि कोणासाठी मेहनत घेतो. याची प्रत्यक्ष माहिती देऊन दुपारी अस्सल गावारान जेवण त्या गावात, शेतात ज्या काही रानभाज्या किंवा स्थानिक भाज्या असतील त्या पर्यटकांना खायला देणे. संध्याकाळी मुक्कामी पर्यटकाला कृषी पर्यटन केंद्रात स्थानिक व पारंपरिक खेळांची माहिती देणे/खेळणे. आलेल्या पर्यटकांना गाव दर्शन घडवणे. गावातील प्रसिद्ध अशा गोष्टी सांगणे. गावाचा इतिहास, भूगोल, पर्यावरण आणि गावाचे आर्थिक गणित सांगणे. हे सगळे करताना शेतकऱ्यांना पर्यटकांकडून काही तरी मोबदला मिळतो. पर्यटकांना गाव आणि शेती संस्कृतीविषयक माहिती देऊन समृद्ध करणे म्हणजे कृषी पर्यटन होय.

## शेतीपूरक व्यवसाय

'अतिथी देवो भवो' या भारतीय संस्कृतीला धरून कृषी पर्यटन व्यवसाय आहे. कृषी पर्यटन हा इतर शेतीपूरक व्यवसायाप्रमाणे एक पूरक व्यवसाय आहे. अनेक शेतकरी वेगवेगळ्या प्रकारचे शेतीपूरक व्यवसाय करतात. त्यात शेळीपालन, कुक्कुटपालन, गोपालन, दुग्धव्यवसाय, मधमाशी पालन, मत्स्यपालन यांसह अनेक पारंपरिक व्यवसाय शेतकरी करत आहेत. मोठ्या प्रमाणात वाढत असलेल्या शहरीकरणामुळे कृषी पर्यटनाचे महत्त्व वाढत आहे. कृषी पर्यटन हा उत्तम कृषिपूरक व्यवसाय म्हणून शेतकरी आणि पर्यटकांना आकर्षित करत आहे. कृषी पर्यटन हा ग्रामीण व शहरी संस्कृतीचा संगम आहे. आपल्याकडे पर्यटक शनिवार व रविवार अथवा सुट्यांमध्ये येतात. याच काळात त्यांचा पाहुणचार करायचा असतो. बाकीच्या इतर वेळेत आपण आपली शेती करू शकतो. कृषी पर्यटनात विशेष असे काही करायची आवश्यकता नाही. सुरुवातीला डोलणारी शेती, पीक पद्धती, तुमच्याकडे असलेले शेतीचे ज्ञान, पाहुणचार आणि पर्यटकांना सांगण्यासाठी परिसराचा अभ्यास असणे गरजेचे आहे. कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांना पैसा, प्रतिष्ठा, मानसन्मान मिळतो. विचारांची देवाण-घेवाण होते. यातून रोजगार निर्मिती, महिलांना आपली वेगळी ओळख निर्माण करण्याची संधी मिळते, गावाचा विकास होण्यास मदत होते. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण व शेती संस्कृतीचे नव्याने ओळख करून देता येते व ग्रामजीवनाची असलेली ओळख जपता येते. संस्कृतीचे संवर्धन व संरक्षण करता येते. कृषिरंजन व कृषी शिक्षणाचे धडे देण्याचे काम कृषी पर्यटनाच्या माध्यमातून होऊ शकते.

## कृषी पर्यटनातील महत्त्वाचे घटक

कृषी पर्यटन सुरू करायचे असेल तर त्यात अनेक घटक असणे गरजेचे आहेत. त्यात शेती, शेतकरी, गाव आणि पर्यटक ही चार प्रमुख घटक असणे अत्यंत गरजेचे आहेत. शेती हा कृषी पर्यटनाचा आत्मा आहे. शेतीशिवाय कृषी पर्यटन अपुरे आहे. कृषी पर्यटनात शेती ७० ते ८० टक्के असणे आवश्यक आहे. शिवारफेरी, परिसर अभ्यास, परिसराचा फेरफटका शेतीमुळे शक्य आहे. शेतकरी हा

शेती आणि पर्यटकांमधील दुवा असतो. आलेल्या पर्यटकाचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करणे, पाहुणचार करणे. शेती आणि माती संस्कृतीची ओळख करून देण्याचे काम शेतकरी करतो. गाव आणि गावाची संस्कृती, गावाचे जीवनमान, बारा बलुतेदारी व अठरा अलुतेदारी, गावाचे आर्थिक व्यवहार इत्यादी अनुभव शहरातील पर्यटकांना गावाच्या माध्यमातून देऊ शकतो. आपल्या कृषी पर्यटन केंद्रात येणारे पर्यटन हे जास्त करून शहरातले असतात. या पर्यटकांना आपली गरज व आपल्याला त्यांची गरच असते. पर्यटकांना वेगळ्या पर्यटनाचा अनुभव घ्यायला आवडते. संपूर्ण जग निसर्गाकडे ओढले जात आहे. कृषी पर्यटन करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांकडे या चार प्रमुख गोष्टींसह परिसरातील ऐतिहासिक, नैसर्गिक, सांस्कृतिक ठिकाणे, कृषी उत्पादन प्रक्रिया केंद्र, पर्यटनस्थळ इतर गोष्टी असणारा शेतकरी कृषी पर्यटन केंद्र चालवू शकतो. या धोरणामुळे अनेक संधी व फायदे शेतकऱ्यांना होऊ शकतात.

## ग्रामीण संस्कृतीचे संवर्धन

'गाव आणि गावपण' हरवत चालले आहे, असे आपण म्हणतो. गाव तसेच शहरी लोकांच्या मनात ही सल आहे. आजही खेड्याची ओढ असलेले शहरी भागातील काही लोक आपल्या ग्रामीण संस्कृतीशी नाते टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत आणि अशा लोकांना ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देण्याचे काम या आगळ्यावेगळ्या कृषी पर्यटनातून होत आहे. गावातील लोक, आदिवासी, वाड्या-पाड्यांतील लोकांची वेषभूषा, केशभूषा, पारंपरिक पेहराव, राहणीमान, बोलीभाषा, चित्रकला इ. चे जतन आणि संवर्धन करण्याचे काम कृषी पर्यटनाच्या माध्यमातून करू शकतो. अनेक पारंपरिक खेळ, लोककला, आदिवासी संस्कृती ही खरी आपली सांस्कृतिक ओळख होत आहेत. ग्रामीण लोककलांमध्ये भारुड, गोंधळ, जागरण, कीर्तन, वासुदेव, गारुड्याचा खेळ, डोंबाऱ्यांचा खेळ, लेझिम खेळणे इत्यादींचे प्रात्यक्षिक खेळ पर्यटकांना दाखवून आपले अस्सल गावपण जपू शकतो. अनेक पारंपरिक खेळ आहेत. त्यात विट्टी दांडू, गोट्या, चकारी, गोफण, गलोल इ. तसेच ग्रामीण भागातील साहित्य शिकं, (शिंकाळं) उखळ, वरवंटा, खलबत्ता, पाटा, चुलीसह शेतातील अवजारे या कालबाह्य गोष्टींची ओळख करून देऊ शकतो. या सर्व पारंपरिक वस्तूंची जागा आता नवतंत्रज्ञान घेत आहेत. या वस्तूंचे जतन व संवर्धन करण्याचे काम राज्यातील कृषी पर्यटनामुळे होत आहे. शेतमाल विकण्यासाठी, हस्तकला, गायनकला, वाद्यकला, महिला बचतगटाचे साहित्य विक्री या गावाची परंपरा व संस्कृतीसाठीचे उत्तम व्यासपीठ व ठिकाण म्हणजे कृषी पर्यटन होय. या सर्व गोष्टी पर्यटकांना पाहता येतात तसेच प्रत्यक्ष हाताळून अनुभवताही येतात. कृषी पर्यटन केंद्रातून ग्रामीण संस्कृतीचे संरक्षण/संवर्धन चांगल्या पद्धतीने कृषी पर्यटन करत आहे. हे याची देही, याची डोळा अनुभवण्याची संधी कृषी पर्यटनामुळे निर्माण होत आहे.



## येथे करा अर्ज

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने ६ सप्टेंबर २०२० रोजी कृषी पर्यटन धोरणाला मान्यता दिली. देशात सर्वप्रथम महराष्ट्रात कृषी पर्यटनाला व्यावसायिक दर्जा मिळाला. तसेच कृषी पर्यटन धोरण आणणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. राज्यात अंदाजे ८०० कृषी पर्यटन केंद्रे आहेत. या धोरणामुळे स्थानिक पर्यटनाला वाव मिळेल. राज्यातील शेतकऱ्यांसह इतर संस्थाही कृषी पर्यटन केंद्र सुरू करू शकतात. यात शेतकरी, शेतकऱ्यांच्या कृषी सहकारी संस्था, राज्यातील कृषी विज्ञान केंद्र, कृषी महाविद्यालये, कृषी विद्यापीठे, शेतकऱ्यांच्या भागीदारी संस्था, कोणतीही कंपनी, सेंद्रिय शेती करणारा शेतकरी, कोणतेही शेतीपूरक व्यवसाय करणारा कृषी पर्यटन केंद्र उभारू शकतो. शेतकऱ्यांना कृषी पर्यटन सुरू करायचे असेल तर अर्जदाराची जमिनीची कागदपत्रे (७/१२ उतारे, ८-अ), आधार कार्ड, पॅन कार्ड, वीज बिल, नोंदणी शुल्क (२५०० रुपये) ऑनलाइन पद्धतीने (gras.mahakosh.gov.in) भरावे, अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत परवाना (Food License), लोक निवास (Dormitory) असल्यास बांधकाम परवानगी आवश्यक (पाच एकर बंधनकारक) कागदपत्रांसह प्रादेशिक उपसंचालक, पर्यटन विभागाकडे अर्ज (नवी-मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, अमरावती आणि रत्नागिरी) http://www.maharashtratourism.gov.in/ या संकेतस्थळावर अर्ज करू शकता.

## ॲग्रो टुरिझम विश्व

राज्यातील शेतकरी व पर्यटकांमध्ये कृषी पर्यटनाविषयी प्रचार व प्रसार करण्याचे काम ॲग्रो टुरिझम विश्व करत आहे. कृषी पर्यटनासाठी विविध उपक्रम राबवणे, कृषी परिसंवाद घेणे, एम.टी.डी.सी व पर्यटन संचालनालय यांच्या सहकार्याने कृषी पर्यटन कार्यशाळेचे आयोजन करणे. शाळांच्या सहली काढण्याचे काम ॲग्रो टुरिझम विश्व करत असते. शेतकऱ्यांकडे असलेल्या साधनसंपत्तीचा वापर करून, कमी भांडवलात कृषी पर्यटन सुरू करू शकतो. कृषी विभाग व पर्यटन विभागाच्या योजना व उपक्रमांचा योग्य वापर करून छान व सुंदर कृषी पर्यटन केंद्र सुरू करून देण्याचे कार्य करते. आपल्या कृषी पर्यटन केंद्रात पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवून आकर्षिक पॅकेज तयार करून पर्यटकांपर्यंत पोहोचवण्याचे काम ॲग्रो टुरिझम विश्व करत आहे. agrotourismvishwa.com या संकेतस्थळाला भेट देऊन माहिती मिळवू शकता.

सल्लागार, ॲग्रो टुरिझम विश्व

**कृषी क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाते आणि हा कणा ताठ ठेवण्याचे काम राज्याने नेहमीच केले आहे. राज्यातील अनेक प्रयोगशील शेतकऱ्यांनी राज्य शासनाच्या मदतीने आदर्श शेती करून संपन्नता साधली आहे. शासकीय अनुदान, विकेल ते पिकेल, कर्जमाफी आदी योजनांच्या माध्यमातून उत्तम शेती केली आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अलीकडेच खरीप हंगामच्या राज्यस्तरीय नियोजन बैठकीत दर्जेदार पिकांचा महाराष्ट्र ब्रॅण्ड निर्माण करण्याच्या सूचना केल्या. अशा महाराष्ट्र बॅण्डच्या दृष्टीने काम करणाऱ्या प्रयोगशील शेतकऱ्यांच्या यशोगाथा..**

# शेतीचा महाराष्ट्र ब्रॅण्ड

## स्ट्रॉबेरीचा 'हेलो डाब' ब्रँड

**आकांक्षित** जिल्हा नंदुरबारमधील सातपुड्याच्या पर्वतराजित आदिवासी बांधवांनी स्ट्रॉबेरी लागवडीचा यशस्वी प्रयोग केला आहे. कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली युवकही आधुनिक पद्धतीने स्ट्रॉबेरीची लागवड करू लागले आहेत. इथले थंड (आदिवासी भाषेत हेलो) हवामान स्ट्रॉबेरीसाठी पोषक असल्याने दुर्गम डोंगराळ भागात आदिवासी शेतकरी बांधवांना उत्पन्नाचे नवे साधन मिळाले आहे.

### शिक्षण कमी पण जिद्द मोठी

अक्कलकुवा तालुक्यातील डाब गावात धीरसिंग आणि टेड्या पाडवी या दोन तरुण भावंडांनी पारंपरिक पिकांना बाजूला सारून स्ट्रॉबेरी लागवडीकडे लक्ष केंद्रित केले. धीरसिंगला शिक्षण घेता आले नसले तरी शेतात परिश्रम करताना त्यांनी रात्री वाचनाची आवड जोपासली आहे. टेड्या याने बारावीचे शिक्षण पूर्ण केले. शेतात सतत नवे प्रयोग करण्याची या दोघांना आवड आहे.

### नव्या तंत्राने लागवड

डाब येथे २००७ पासून स्ट्रॉबेरी लागवड होत आहे. मात्र शेतकरी पारंपरिक पद्धतीने ही लागवड करीत असल्याने त्यांना पूर्णतः यश आले नाही. कृषी विभागाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आत्मा योजनेंतर्गत २०१८-१९ मध्ये महाबळेश्वर येथे शेती सहलीचे आयोजन केले. या सहलीत धिरसिंग यांनी सहभाग घेतला आणि मिळालेल्या संधीचा पूरेपूर उपयोग करीत आपल्याकडील वडिलोपार्जित जमिनीवर नव्या तंत्राने स्ट्रॉबेरीची लागवड केली.



धिरसिंग आणि टेड्या पाडवी या प्रयोगशील शेतकरी तरुणांचे उत्तम स्ट्रॉबेरी उत्पादनासाठी कौतुक करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे. सोबत कृषिमंत्री दादाजी भुसे, पालकमंत्री ॲड. के.सी. पाडवी आदी.

कृषी विभागाच्या सहकार्याने त्यांनी नाशिक येथून उत्तम प्रतीची स्ट्रॉबेरीची रोपे आणली. स्वत: मल्चिंग पेपर आणि ठिबक सिंचनासाठी खर्च केला. शेती सहलीच्या माध्यमातून महाबळेश्वर येथील तज्ज्ञ शेतकरी व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. धीरसिंग यांनी करार शेतीच्या माध्यमातून स्ट्रॉबेरीचे क्षेत्र वाढवले. त्यांनी इतर स्थानिक शेतकऱ्यांना सोबत घेऊन स्ट्रॉबेरीची लागवड केली आहे. पॅकेजिंगसाठी स्थानिक पातळीवर मिळणाऱ्या खोक्यांचा वापर करून स्ट्रॉबेरीची विक्री करण्यात येत आहे. एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयातर्फे पॅकेजिंगसाठी १२ हजार ५०० रुपयांचे सहकार्य करण्यात आले.

कृषी विभागातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासह शहराच्या ठिकाणी विक्रीसाठी सहकार्य करण्यात आले. कृषी विभागाने नंदुरबारच्या व्यापाऱ्यांशीदेखील सांगड घालून दिली. त्यामुळे ८० रुपये किलो दराने विकली जाणाऱ्या स्ट्रॉबेरीला आता १२० ते १५० रुपये दर मिळतो आहे. पूर्वी एक एकरातून मिळणारे २५ क्विंटल उत्पादन आता ३० क्विंटलपर्यंत पोहोचले आहे. एक एकराला १ लाख ८० हजार खर्च येत असून ३ लाखापेक्षा अधिकचे उत्पन्न मिळते आहे.

स्ट्रॉबेरीचा 'हेलो डाब' ब्रँड बाजारात जम बसवू लागला आहे. आता त्यांना वेध लागले ते स्ट्रॉबेरीचे क्षेत्र वाढवायचे आणि या ब्रँडला मोठ्या शहरापर्यंत पोहोचायचे!

### कौतुक

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मोलगी येथील भेटीदरम्यान स्ट्रॉबेरी उत्पादनासाठी दोन्ही भावंडांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाशिक येथील बैठकीत डाब स्ट्रॉबेरीची चव इतर ठिकाणच्या स्ट्रॉबेरीपेक्षा चांगली असल्याची पावतीदेखील दिली. कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी या भावंडांच्या शेताला भेट देऊन त्यांच्या कामाचे कौतुक केले. दोन्ही भावंडांचे कौतुक करताना पालकमंत्री ॲड. के. सी. पाडवी यांनी डाब परिसरात स्ट्रॉबेरी शेतीला प्रोत्साहन देण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना केल्या.

– **डॉ. किरण मोघे,** जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार

## वाशिममध्ये पिकवली महाबळेश्वरची स्ट्रॉबेरी

**आकांक्षित** जिल्हा म्हणून विदर्भातील वाशिमची ओळख. मुख्य व्यवसाय शेती. सरासरी पर्जन्यमान तसे कमी. त्यामुळे बहुतांश शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेली. परिणामी सोयाबीन आणि तुरीचे उत्पादन घेण्यावरच शेतकऱ्यांचा अधिक भर. याच जिल्ह्यातील शेतकऱ्याच्या शेतात आता महाबळेश्वरची प्रसिद्ध स्ट्रॉबेरी पिकत आहे. मंगरूळपीर तालुक्यातील चहल येथील प्रयोगशील युवा शेतकरी सचिन ठाकरे याने राज्य शासनाच्या 'विकेल ते पिकेल' अभियानामध्ये सहभागी होत आपल्या शेतामध्ये स्ट्रॉबेरीचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली आहे.

सचिन ठाकरे यांची चहल येथे वडिलोपार्जित ३२ एकर शेती आहे. कृषी विभागाने सुरू केलेल्या 'विकेल ते पिकेल' अभियानानुसार बाजारात मागणी असलेल्या पिकाची लागवड करण्याचा निश्चय करून सचिनने दहा गुंठे जमिनीवर सहा हजार स्ट्रॉबेरी रोपट्यांची लागवड केली. ही रोपटी महाबळेश्वर येथून एका शेतकऱ्याकडून ७५ हजार रुपयात खरेदी केले. ऑक्टोबर २०२० मध्ये ही रोपटी मशागत करून मल्चिंगवर लावण्यात आली. एका महिन्याने म्हणजेच नोव्हेंबरपासून उत्पादनाला सुरुवात झाली. सेंद्रिय शेतीत स्ट्रॉबेरीची लागवड केल्यामुळे फळे चवीला चांगली लागतात.



वाशिम येथील शेतकरी सचिन ठाकरे यांची स्ट्रॉबेरीची शेती

### स्ट्रॉबेरीची विक्री

उत्पादन सुरू झाल्यानंतर कृषी विभागाने वाशिम येथे सुरू केलेल्या शेतमाल विक्री केंद्राच्या माध्यमातून स्ट्रॉबेरीची थेट ग्राहकांना विक्री सुरू करण्यात आली. तसेच अकोला, मंगरूळपीर व कारंजा येथेही स्ट्रॉबेरी विक्रीसाठी पाठवण्यात आली. जिल्ह्यातील काही ग्राहक, फळविक्रेते यांनी बांधावर येऊन प्रतिकिलो १५० ते २५० रुपये दराने स्ट्रॉबेरीची खरेदी केली. दहा गुंठ्यांवरील स्ट्रॉबेरीतून लागवड आणि मशागतीसाठी जवळपास सव्वा लाख रुपये खर्च आला. मात्र, स्ट्रॉबेरी विक्रीतून अवघ्या दीड ते दोन महिन्यात १ लाख ७५ हजार रुपयांचा निव्वळ नफा मिळाला, असे सचिनने सांगितले. या विश्वासाच्या बळावर या वर्षीसुद्धा दीड एकर शेतात जवळपास ४० हजार स्ट्रॉबेरी रोपे लावण्याचे नियोजन सचिनने केले आहे.

### विविध प्रयोगातून वाढले उत्पन्न

सचिन सांगतो की, मागील १५ वर्षांपूर्वी ३२ एकर शेतात एका विहिरीच्या माध्यमातून सिंचनाची व्यवस्था होती. बहुतांश शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असायची. कापूस, सोयाबीन, ज्वारी, तूर, उडीद ही पिके पारंपरिक पद्धतीने घेतली जात होती. वडील आणि कृषी साहाय्यक असलेल्या थोरल्या भावाशी चर्चा करून मी पीक पद्धतीत बदल करण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला. पपई, भाजीपाला व टरबूज या पिकाच्या उत्पादनाला सुरुवात केली. यवतमाळ, वाशिम व नागपूर येथे शेतमालाची विक्री होऊ लागली. त्यानंतर आमच्यामध्ये एक विश्वास निर्माण झाला की, आपण आता फळबाग पिकाकडे वळायचे. त्या दृष्टीने शेतात सिंचनाची व्यवस्था म्हणून आणखी दोन नवीन विहिरी तयार केल्या आणि राष्ट्रीय फळबाग योजनेतून ८५ लाख लीटर पाणी साठवण क्षमतेचे सामूहिक शेततळे तयार केले.

२०१३ मध्ये रोजगार हमी योजनेतून तीन एकरवर लिंबू, पाच एकरवर डाळिंब, भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेतून चार एकर पेरूची लागवड केली. २०१४ मध्ये चार एकरवर सिताफळ लावले. आठ एकरवर संत्रा लावला. प्रत्येक पिकात आंतरपीक म्हणून पपईची लागवड केली. २०१७ पासून प्रत्यक्ष उत्पादनाला सुरुवात झाली. पपईच्या उत्पादनातून दीड लाख रुपये मिळण्यास सुरुवात झाली.

### फळांची रेलचेल

भगव्या डाळिंबापासून खर्च वजा जाता सात ते आठ लाख रुपये उत्पन्न झाले. आठ एकर संत्रापासून जवळपास पहिल्या वर्षी साडेसात लाख रुपये, दुसऱ्या वर्षी साडेसतरा लाख रुपये, तिसऱ्या वर्षी आठ लाख रुपये, तर लिंबूपासून वर्षाला सरासरी दोन लाख रुपये उत्पन्न मिळू लागले. सिताफळापासून पहिल्याच वर्षी एक लाखाचे उत्पन्न मिळाले. एकरी एक लाख रुपये सरासरी उत्पन्न सीताफळापासून मिळू लागले. दरवर्षी नोव्हेंबर व डिसेंबरमध्ये सीताफळे विक्रीसाठी तयार होतात. पुणे येथे विक्री होते तर काही व्यापारी शेतातून खरेदी करतात. शेतामध्ये बारमाही आंब्याची २०० झाडे आहेत. या वर्षीपासून आंबे विक्रीला सुरुवात झाली. जवळपास ५० हजाराची आंबे विक्री करण्यात आली. राजस्थानातून आणलेली सफरचंदाची १५० रोपे २०१९ मध्ये, तर २०२० मध्ये पावणेदोन एकरवर ८०० रोपे लावली. या वर्षी जून महिन्यात प्रत्यक्ष उत्पादनाला सुरुवात होणार आहे.

याशिवाय शेतामध्ये आलुबुखार, रामफळ, हनुमानफळ, मोसंबी, अंजीर, चिकू, आवळा, जांभूळ, कवठ, चिंच व जपानी फ्रुट परशीमची काही झाडे लावली आहेत. शेतीला जोडधंदा म्हणून काही कडकनाथ कोंबड्यांचे संगोपन केले जाते. भविष्यात गावरानी कोंबडी संगोपन व शेळीपालन करून ॲग्रो टुरिझम म्हणून शेतीला विकसित करण्याचा विचार असल्याचे सचिनने सांगितले. ठिबक सिंचन, आधुनिक तंत्रज्ञान आणि जैविक कीटकनाशकाचा वापर अशी सांगड घालून सचिन करत असलेली फळबाग शेती अनेकांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

– **विवेक खडसे,** जिल्हा माहिती अधिकारी, वाशिम

## पक्षिपालनातून उत्कर्ष



गजानन डाबेराव

**अकोला** जिल्ह्यातील खडका येथील आदिवासी शेतकऱ्यांनी जोडधंदा म्हणून पक्षिपालन व्यवसायाची कास धरली आहे. सध्या हे शेतकरी केवळ पक्षिपालन करत नसून त्यांनी आता या पक्ष्यांचे अंडी उबवण केंद्र व संगोपन केंद्रही सुरू केले आहे. इतर शेतकऱ्यांना पक्षी पालनासाठी उपलब्ध करून देत स्वतःचा उत्कर्ष साधत आहेत.

खडका येथील हरीओम शेतकरी गटाने कृषी विभागाच्या आत्मा प्रकल्पाच्या साहाय्याने ही किमया साधली. आदिवासी शेतकऱ्यांना आत्मामार्फत बडेर, कोंबडी, बदक या पक्ष्यांच्या पालनाचे प्रशिक्षण दिले जाते. गजानन डाबेराव हे त्यापैकीच एक. गोव्याला झालेल्या या प्रशिक्षणाने आणि गोव्यातील पक्षी संगोपन केंद्र पाहून ते फारच



प्रेरित झाले. येथेच त्यांनी अंडी उबवण यंत्र तयार करणे व त्यात अंड्यांची शास्त्रशुद्ध पद्धतीने उबवण करणे आदी कामे शिकून घेतली. तिकडूनच त्यांनी पालनासाठी पक्ष्यांची पहिली बॅच मागवली. या पक्ष्यांचे पालन करत, संगोपन करत आणि त्यांच्या अंड्यांची उबवण करून पुढच्या पक्ष्यांची बॅच ते स्वतः तयार करू लागले. आता सद्य:स्थितीत त्यांच्याकडे स्वतःचे अंडी उबवण केंद्र व लहान पिलांचे संगोपन केंद्र आहे.

पाच शेतकऱ्यांचा हा गट आहे. आता हे शेतकरी आपल्या उत्पादनाची विक्री करतात, कुणाही शेतकऱ्याला जोडधंदा म्हणून पक्षिपालनाचा व्यवसाय करावयाचा असल्यास त्यांना ते लहान पिल्ले विक्री करतात. अंडी उबवण यंत्रही बनवतात. त्याचीही विक्री करतात. एक परिपूर्ण हॅचरी ते येथे चालवतात. त्यातून ते महिन्याकाठी ३० ते ५० हजार रुपये या प्रमाणे प्रत्येकजण कमाई करतोय. शेतीला जोडधंदा आवश्यक आहेच. त्यात पक्षिपालन हा उत्तम जोडधंदा आहे, असेही डाबेराव यांचे म्हणणे आहे. या व्यवसायामुळे त्यांना राज्यभरात ओळख मिळाली आहे. आता ते इतरांना प्रशिक्षण देतात. त्यांना या कामात त्यांच्या सहचारिणीची मदत होते, असेही त्यांनी सांगितले.

## मत्स्यपालनातून शाश्वत रोजगार

**अकोला** जिल्ह्यातील कुंभारी येथील तलावात मासेमारी करणारे मच्छीमार, त्यातल्या पाच शेतकऱ्यांनी मिळून स्वतःचा गट तयार केला. महात्मा फुले शेतकरी उत्पादक गट असे या गटाचे नाव. या गटामार्फत या शेतकऱ्यांना आत्मामार्फत मत्स्य विक्रीसाठी अत्याधुनिक वाहन देण्यात आले. या वाहनातून हे शेतकरी मासेमारी करून, मत्स्यपदार्थांची विक्री करू लागले. या माध्यमातून या शेतकऱ्यांना जादाचा दर मिळून त्यांना शाश्वत रोजगार उपलब्ध झाला आहे. सध्याच्या लॉकडाऊनच्या काळातही घरपोच पार्सलद्वारे हे शेतकरी मत्स्य खाद्यपदार्थ विक्री करून उत्पन्न घेत आहेत.

या गटाचे अध्यक्ष दिलीप आगळे यांनी माहिती दिली की, ते आधी शेतीसोबत लोणार मच्छीमार सहकारी सोसायटी, कुंभारी येथील सभासद होते. त्यामुळे त्यांना मत्स्यबीजापासून प्रक्रिया करून मत्स्य तयार करणे ते तलावात सोडणे, त्यांची वाढ झाल्यावर पकडून विक्री करणे याबाबतचा अनुभव होता. मात्र या पाच शेतकऱ्यांनी स्वतंत्र शेतकरी गट तयार करून कृषी विभागाच्या आत्मा व मत्स्यव्यवसाय विभागामार्फत फिरते मत्स्यपदार्थ विक्री केंद्राचा प्रस्ताव दिला. त्यानुसार त्यांना १० लाख रुपये किमतीचे शितकरणाची सुविधा असलेले वाहन देण्यात आले. या वाहनांमुळे या शेतकऱ्यांना मासे केवळ विक्री करणे नव्हे, तर प्रक्रिया करून विकणे शक्य झाले. त्यामुळे ते विविध चविष्ट मत्स्यपदार्थ खवय्यांना उपलब्ध करून देऊ शकले. साहजिकच किलोमागे किमान ३० ते ४० टक्के




**फिरते मत्स्य पदार्थ विक्री केंद्रासाठी महात्मा फुले शेतकरी उत्पादक गटाला राज्य शासनातर्फे देण्यात आलेले शीतकरणाची सुविधा असलेले वाहन. सोबत शेतकरी दिलीप आगळे.**

किंमत वाढीव मिळू लागली. शिवाय सोबत दोन-तीन जणांना रोजगारही देता आला. सध्या हे शेतकरी महिन्याला दीड लाख रुपयांपर्यंत उलाढाल करत आहेत. लॉकडाऊनमध्ये घरपोच पार्सल सुविधा पुरवून व्यवसाय करत आहेत.

– **डॉ. मिलिंद दुसाने,** जिल्हा माहिती अधिकारी, अकोला

## ब्रोक्कोलीच्या लागवडीने वाढले उत्पन्न

**पंढरपूर** तालुक्यातील गादेगाव येथील तुकाराम बागल यांनी ब्रोक्कोलीची यशस्वी शेती केली आहे. सध्या ब्रोक्कोलीचे उत्पादन सुरू झाले असून पुणे येथील मार्केटमध्ये त्यांच्या ब्रोक्कोलीला चांगला दर मिळत आहे. श्री. बागल यांची गादेगाव शिवारामध्ये दहा एकर बागायती शेती आहे. यामध्ये सहा एकर ऊस, दोन एकर डाळिंब, दोन एकर खरबूज व एक एकर फ्लॉवरची लागवड केली आहे. उजनी कालव्याचे पाणी व एक विहीर याद्वारे शेतीला पाण्याचे नियोजन करण्यात येते.


तुकाराम बागल

ऊस वगळता खरबूज, डाळिंब, फ्लॉवर पिकाला ठिबक सिंचनाद्वारे पाण्याची सुविधा आहे. उसाला आवश्यकतेप्रमाणे पाटाने पाणी देण्यात येते. याशिवाय शेतीला जोडधंदा म्हणून दहा जर्सी गायी व एक गीर गाय दूग्ध उत्पादनासाठी जोपासली आहे. या गाईंचे दररोज ११० ते १२० लीटर दुधाचे उत्पादन होते.

दरवर्षी ऊस, डाळिंब, मका या पारंपरिक पिकांबरोबरच नियमितपणे ते फ्लॉवरचे उत्पादन घेत असतात. यंदाही उपरी येथील नर्सरीमध्ये फ्लॉवरची रोपे खरेदी करण्यासाठी ते गेले असता तेथे त्यांना ब्रोक्कोलीची रोपे दिसली. या नर्सरीतून ब्रोकोलीचे प्रतिरोप एक रुपयाप्रमाणे दहा हजार रोपे खरेदी केली. अर्धा एकर क्षेत्रावर ठिबक सिंचनाद्वारे ब्रोक्कोलीची लागवड करण्याचे त्यांनी धाडस केले. फेब्रुवारीच्या सुरुवातीला लागवड केलेल्या ब्रोकोलीचे उत्पादन आता सुरू झाले आहे. पारंपरिक शेतीबरोबरच एक वेगळा प्रयोग करावयाचा म्हणून श्री. बागल यांनी ब्रोक्कोलीसाठी घेतलेल्या मेहनतीला चांगले फळ मिळाले आहे. अर्धा एकर क्षेत्रावर लागवड केलेल्या ब्रोक्कोलीचे साधारणपणे पाच टन उत्पादन मिळेल. लागवड खर्च, खते, फवारणी व वाहतूक खर्च वजा जाता अवघ्या दोन महिन्यांमध्ये लाख ते सव्वा लाख रुपये उत्पन्न अपेक्षित असल्याचे श्री. बागल यांनी सांगितले.

ब्रोक्कोलीतील पौष्टिक घटकांचा आरोग्याच्या दृष्टीने विचार केल्यास ब्रोक्कोली ही भाजी प्रोटीन, कॅल्शियम, लोह, व्हिटॅमिन 'ए' व 'सी' यांचा समावेश असलेली आहे. ब्रोक्कोलीचा आहारात समावेश केल्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते.

**– अविनाश गरगडे,** प्रभारी माहिती सहायक, उपमाहिती कार्यालय, पंढरपूर

## शेतकरी बनले उद्योजक

**कधीपर्यंत** दलालाच्या हातात आमच्या आर्थिक नाड्या द्यायच्या, आमची पोरं शिकलीत. आता त्यांनाही कळतंय आमचं नेमकं कुठं जळतंय, आणि आम्ही कुठं विजवत बसलोय. आता आम्हाला पेटलेलं विझवायचं नाही, तर पेटूच नये याचा इलाज करायचा आहे. आता आम्ही बाजाराची गरज ओळखून उत्पादन करू म्हणजे आता आम्ही जे बाजारात विकलं जाइल तेच पिकवू. यापुढे जाऊन आम्ही आता कच्च्या मालावर प्रक्रिया करून बाजाराला आवश्यक असलेला पक्का माल आकर्षक रूपात बाजारात देऊ. आजपर्यंत आम्ही बाजाराचा अभ्यास न करता अनेकदा एका पिकाला भाव येतोय म्हणून मुबलक तेच पिकवलं. आवक वाढली बाजार पडला आणि आम्ही बुडालो. हे नित्याचेच होते आता तसे होणार नाही. आता आम्ही पिकवू, आम्हीच ठरवू काय विकायचे आणि कितीला विकायचे. होय आता शासनही आमच्या पाठीशी आहे. हे सांगतायत रहिमतपूर (ता. कोरेगाव जि. सातारा) येथील वसुंधरा शाश्वत शेती समृद्धी शेतकरी समूहाचे शेतकरी..!!

### कमी वेळात कारखाना उभारला

रहिमतपूर शहरापासून अर्धा किलोमीटरवरून एक फाटा जातो... त्याच रस्त्यावर ऊर्जा कंपनीचा बोर्ड लागतो, बाहेरून बघितलं तर ऊसाचे ढीग आणि चरख्यात घालून रस काढणारी लोकं... प्रथम दर्शनी गुन्हाळ असेल असं दृश्य... पण आत गेल्यास हे गुन्हाळ नव्हे तर योग्य नियोजन करून निर्माण केलेला कारखाना असल्याचे लक्षात येते.. विशेष म्हणजे हा कारखाना लॉकडाऊन काळात कमी वेळात उभा केला गेला आहे. कृषी विभागाचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गुरुदत्त काळे यांच्या सल्ल्यावरून हा कारखाना काढण्याची प्रक्रिया सुरू झाली. प्रा. नितीन बानगुडे-पाटील या शेतकरी संघाचे संचालक आहेत. संचालक बॉडीमध्ये प्रकाश सूर्यवंशी, अनंत माने, प्रशांत भोसले व किरण भोसले आहेत.

### कच्च्या मालावर प्रक्रिया, शासनाची मदत

संचालक बानगुडे-पाटील सांगतात, वसुंधरा शाश्वत कृषी समृद्धी शेतकरी संघाच्या वतीने या संघामार्फत शासनाची जी समूह शेती योजना आहे. त्यामार्फत आम्ही रहिमतपुर येथे हा गूळप्रक्रिया उद्योग उभा केला आहे. खरंतर कुठलाही प्रक्रिया उद्योग उभा करण्यासाठी तीन गोष्टी फार महत्त्वाच्या असतात. एक कच्च्या मालाची उपलब्धता, भांडवली गुंतवणूक आणि त्यानंतरची महत्त्वाची आहे बाजारपेठ.



शेतकरी पीक उत्पादन जरूर करतो. पण, भांडवलाच्या अभावी त्याला त्याच्यावर प्रक्रिया उद्योग उभारता येत नाही. किंबहुना त्याला तशी बाजारपेठ उपलब्ध असत नाही. त्यामुळे वर्षानुवर्षे फक्त शेती आणि शेती करणे एवढचं शेतकऱ्यांचे उद्दिष्ट राहिले आहे. वसुंधरा शेतकरी संघाच्यामार्फत शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला जात आहे.



जेवढ्या अधिक प्रक्रिया होतील तेवढे शेतकऱ्यांचे उत्पन्न अधिकाधिक वाढत जाणार आहे. रहिमतपूरसारख्या भागाचा जर विचार केला, तर इथे ऊसाचे पीक प्रचंड मोठ्या प्रमाणात होते. इतके की, बऱ्याच वेळेला साखर कारखान्याच्या क्षमताच संपतात आणि ऊस शेतात पडून राहतो. किंबहुना तो शेतकऱ्यांना जाळूनच घालवावा लागतो. कच्च्या मालाची उपलब्धता प्रचंड मोठ्या प्रमाणात होते. ही गोष्ट लक्षात घेऊन शेतकऱ्यांचे उत्पादन जर वाढवायचे असेल, तर तसा प्रक्रिया उद्योग येथे असावा या हेतूने हा गूळप्रक्रिया उद्योग उभा केला आहे. शासनाचे त्यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात सहकार्य मिळाले. खरंतर सातारा जिल्हा कृषी कार्यालयाने मोठ्या प्रमाणात सहकार्य केले. त्यामुळे हा उद्योग उभा राहू शकला, असे प्रा. बानगुडे-पाटील सांगतात.

शेतकऱ्यांच्या बाबतीत एखादा प्रक्रिया उद्योग जर उभा करायचा असेल तर सगळ्यात महत्त्वाची गोष्ट असते भांडवली गुंतवणूक आणि तीच शेतकऱ्यांकडे नसते. पण शासनाच्या माध्यमातून हे भांडवल उपलब्ध झाले. हा प्रक्रिया उद्योग उभा करण्यासाठी साधारणपणे १ कोटी ९६ लाखाच्या आसपास खर्च आला. त्यापैकी १ कोटी अनुदान शासनामार्फत या प्रक्रिया उद्योगाला मिळाले. यापैकी ६० लाख रुपये उपलब्ध झाले, तर उरलेली रक्कम शासनाच्या इतर योजनांमधून प्रक्रिया उद्योगासाठी मिळणार असल्याचे प्रा. बानगुडे-पाटील यांनी सांगितले.

सेंद्रिय शेतीसाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त केले जात आहे. या प्रक्रिया उद्योगात जो गुळ तयार होईल, जी पावडर तयार होईल तीसुद्धा सेंद्रिय पद्धतीने बनवलेली असेल, ती विषमुक्त असेल. त्यामुळे एकीकडे शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभे करताना या अन्नदात्यांकडून पिकवलेले अन्न हे सुद्धा विषमुक्त असले पाहिजे, या दृष्टीनेच हा प्रयोग करत असल्याचे प्रा. बानगुडे-पाटील यांनी सांगितले. वसुंधरा शाश्वत शेती समृद्धी शेतकरी समूहाकडून 'ऊर्जा सेंद्रिय गूळ, गूळ पावडर आणि इतर उपपदार्थ' करणारा हा कारखाना यशस्वीरीत्या चालवला जात आहे. शेतकरी आता उद्योजक बनत आहे असे चित्र यातून दिसते.

– **युवराज पाटील,** जिल्हा माहिती अधिकारी, सातारा

## स्वयंसहायता बचतगटाची उन्नती

**हिंगोली** जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील धानोरा येथील शेतकरी दादाराव चंद्रभान राऊत यांनी पुढाकार घेऊन २०१६ मध्ये त्यांच्याच गावातील १७ शेतकऱ्यांचा समूह करून महात्मा जोतिराव फुले स्वयंसहायता बचतगटाची स्थापना केली व आर्थिक उन्नतीची दारे खुली झाली. या बचतगटाचे अध्यक्ष म्हणून स्वतः दादाराव चंद्रभान राऊत काम पाहतात, तर एकनाथ राजाराम राऊत हे सचिव म्हणून कार्यरत आहेत.




'विकेल ते पिकेल' या अभियानांतर्गत महात्मा जोतिराव फुले स्वयं सहायता सेंद्रीय बचतगटाला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी कृषी व आत्मा विभागामार्फत वनामती नागपूर येथे सेंद्रिय शेतीचे प्रशिक्षण, आत्माअंतर्गत भाजीपाला लागवड तंत्रज्ञान या विषयावर शेतीशाळा, पीजीएसअंतर्गत सेंद्रिय प्रमाणीकरण, पीक प्रात्यक्षिक, माती परीक्षणाचा लाभ मिळवून दिला. त्यामुळे कोरोनाच्या आपत्कालीन परिस्थितीत गटातील सर्व सदस्यांनी 'वसुंधरा सेंद्रिय ग्राहक मंडळ' या नावाने व्हॉट्सॲप ग्रुप तयार करून २०० ग्राहकांना दररोज ताजा भाजीपाला, अन्नधान्य व डाळी घरपोच देणे, वसुंधरा ऑर्गेनिक शॉप या नावाने विक्री केंद्रामार्फत विक्री, तसेच ऑनलाइन पद्धतीने १५ टन भाजीपाला, ४ टन फळांची तसेच ११ टन अन्नधान्य, डाळी, हळद पावडरची विक्री करून एका वर्षात १३ लाख रुपयांची उलाढाल केली आहे. यामध्ये त्यांनी निव्वळ ४ लाख रुपये नफा मिळवला आहे.

कृषी विभागाच्या योग्य मार्गदर्शनामुळे बाजारात मागणी असलेल्या पिकांचे उत्पादन घेऊन त्याची थेट व्हॉट्सॲप, विक्री केंद्राद्वारे तसेच ऑनलाइन विक्री केल्यामुळे महात्मा जोतिराव फुले स्वयंसहायता सेंद्रिय बचतगटातील सर्व सदस्यांची आर्थिक उन्नतीकडे वाटचाल होत असल्याने अध्यक्ष श्री. राऊत यांनी समाधान व्यक्त केले.

जिल्हा माहिती कार्यालय, हिंगोली

## भाजीपाल्याची थेट विक्री

**शेतकरी** बांधवांना 'विकेल ते पिकेल' या अभियानामुळे मोठी मदत होत आहे. मालेगाव तालुक्यातील पाटणे (ता. मालेगाव, जि.

नाशिक) गावचे लाभार्थी शेतकरी सावन शांताराम अहिरे रोज सकाळी मुंबई-आग्रा महामार्गावरील पाटणे फाटा येथे स्वत:च्या शेतासह व परिसरातील शेतकऱ्यांकडून शेतमाल घेऊन स्टॉल विक्री सुरू करतात. दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत त्यांच्या स्टॉलवर शेतमालाची विक्री करतात. मुंबई आग्रा महामार्गालगतच्या हॉटेल चालकांबरोबरच पाटणे गावातील गावकऱ्यांना या स्टॉलमुळे मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. भाजीपाला विक्री स्टॉलच्या माध्यमातून त्यांनी आपली आर्थिक उन्नती साधली आहे.



सावन शांताराम अहिरे

श्री. अहिरे हे स्वत: वेल्डिंग कामाचा व्यवसाय करतात. मात्र कोरोनाच्या कालावधीत लॉकडाऊनमुळे वेल्डिंगचा व्यवसाय ठप्प झाला. परंतु ‘कृषी मंत्री दादाजी भुसे यांच्या संकल्पनेतून व कृषी विभागाच्या माध्यमातून मला मोठा दिलासा मिळाला आहे. दुसऱ्यांकडे मोलमजुरी करण्यापेक्षा शेतीला जोडधंदा म्हणून स्वत:चा व्यवसाय या माध्यमातून मी सुरू केला आहे’, असे श्री. अहिरे अभिमानाने सांगतात.

श्री. अहिरे यांच्याकडे ०.६० हेक्टर एवढे शेतीचे क्षेत्र आहे. त्यामध्ये ते कोथिंबीर, भेंडी, गिलके, वांगी, मिरची आदी भाजीपाला घेतात. परिसरातील इतर १० शेतकऱ्यांच्या ४ एकरांवरील वांगी, मिरची, टोमॅटो, भोपळा, शिमला आदी भाजीपाला यांची ते एकत्र विक्री करतात. दिवसाची त्यांची ८०० ते १५०० रुपये एवढी विक्री होते व दिवसाला त्यांना ५०० ते ७०० रुपये एवढा निव्वळ नफा राहतो. वेल्डिंग व्यवसायाला भाजीपाला विक्रीची जोड त्यांनी दिल्याने गेल्या आठ महिन्यांमध्ये त्यांना भाजीपाला विक्रीतून एक लाख रुपये एवढे उत्पन्न मिळाले आहे.

– **मनोहर पाटील,** माहिती सहायक, मालेगाव

## कर्जमुक्तीमुळे शेतात चौफेर पाणी

**निसर्गाच्या** लहरीपणामुळे व मिळणाऱ्या अनिश्चित भावामुळे भागवतराव पाटलांच्या पदरी निराशा येऊन कर्जाचा डोंगर वाढत होता. २०१९ मध्ये राज्य शासनाने राज्यातील शेतकऱ्यांसाठी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली. या योजनेसाठी ते पात्र ठरले आणि या योजनेमुळे त्यांचे भाग्य उजळले. या योजनेंतर्गत घेतलेले कर्ज माफ झाल्याने त्यांनी त्याच रकमेतून शेतात तीन हजार फुटांची नवी पाईपलाईन टाकली. विहिरींवर १० हॉर्स पॉवरची मोटर बसवल्याने शेतात चौफेर पाणी खळाळू लागले, आणि भागवतरावांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले.

### कर्जाची मालिका

जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील पुनखेडे येथील भागवत पाटील हे प्रगतीशील शेतकरी म्हणून ओळखले जातात. त्यांचे सात जणांचे कुटुंब संपूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. त्यांची १३ एकर शेती आहे. यामध्ये ते दरवर्षी केळी, कपाशी, मका, गहू, हरभरा ही पिके घेत असतात. परंतु निसर्गाचा लहरीपणा व शेतमालाला मिळणारा अनिश्चित असा भाव यामुळे शेतीच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करणे अवघड होऊन जायचे. अशा वेळी त्यांना शेतीसाठी कर्ज घेण्याशिवाय गत्यंतर नसायचे. घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी पुन्हा कर्ज घेणे ही मालिका भागवतरावांची गेली अनेक वर्षे सुरू होती.



भागवतराव पाटील

### कर्जमुक्तीचा आनंद

राज्य शासनाने शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली. या योजनेत भागवत पाटील हे पात्र ठरले आणि त्यांनी रावेर तालुक्यातील पुनखेडे विविध कार्यकारी सहकारी सोसायटीकडून घेतलेले १ लाख ४४ हजार १८० रुपयांचे कर्ज माफ झाल्याचे त्यांना कळताच त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

### पैशांचा सदुपयोग

राज्य शासनाने घेतलेल्या या महत्त्वाकांक्षी निर्णयाबद्दल श्री.पाटील यांनी समाधान व्यक्त करत राज्य शासनाचे आभार तर मानलेच आणि मिळालेल्या या कर्जमाफीच्या रकमेचा सदुपयोग करण्याचे ठरवले.

शेतीला मुबलक पाणी मिळाले तर पीकही जोमदार येऊन उत्पन्न वाढेल, या भावनेतून त्यांनी त्यांच्या शेतात पूर्वीची सिमेंटची नादुरुस्त पाईपलाईन बदलून त्याठिकाणी ३ हजार फुटांची नवीन पीव्हीसी पाईपलाईन टाकली. याशिवाय विहिरीवर बसवलेली ५ हॉर्सपॉवरची मोटार बदलून त्याठिकाणी १० हॉर्स पॉवरची मोटर बसवल्याने शेतात चौफेर अधिक वेगाने पाणी खळाळू लागले. त्याचबरोबर पाणी, वेळ, श्रमाची मोठ्या प्रमाणावर बचत झाली. या बचतीमुळे शेतीवरील खर्च कमी झाल्याने शेतातील पिकांपासून मिळणारे उत्पन्नही आपोआप वाढल्याचे ते अभिमानाने सांगतात. ही कर्जमुक्ती योजना माझ्या जीवनाला कलाटणी देणारी असल्याचा विश्वासही भागवतराव पाटील यांनी व्यक्त केला.

– **विलास बोडके,** जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव

## ‘दादर ज्वारी’ खातेय भाव!

**धुळे** जिल्ह्यातून वाहणाऱ्या तापी नदीने शिंदखेडा आणि शिरपूर तालुक्यातील परिसर सुजलाम केला आहे. लोण्यासारखी मऊ आणि काळीभोर जमीन. या जमिनीत पिकणारी दादर अर्थात रब्बी ज्वारीला राज्यभरातून मागणी होत आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या



महत्त्वाकांक्षी ‘विकेल ते पिकेल’ अभियानांतर्गत रब्बी ज्वारी अर्थात दादरचा प्रकल्प राबवण्यात आला. तो केवळ धुळे जिल्ह्यासाठीच नव्हे, तर राज्यासाठी प्रेरणादायी ठरेल असाच आहे.

### शेतकऱ्यांचा सहभाग

‘विकेल ते पिकेल’ या अभियानांतर्गत जिल्हाधिकारी संजय यादव, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक सोनवणे, ‘आत्मा’चे प्रकल्प उपसंचालक शांताराम मालपुरे, तालुका कृषी अधिकारी विनय बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली शिंदखेडा तालुक्यातील नरडाणा मंडळातील तापी नदीच्या काठावरील बेटावद, पढावद, मुडावद, कमखेडा या गावातील ५०० शेतकऱ्यांच्या सहभागाने २०० हेक्टर क्षेत्रात रब्बी ज्वारीचा प्रकल्प राबवण्यात आला. त्यासाठी एकूण चार गट करण्यात आले. यापूर्वी शेतकरी पारंपरिक बियाण्याचा वापर करीत. मात्र, कृषी विभागाने पारंपरिक बियाण्याऐवजी महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या ‘फुले रेवती’ हे वाण उपलब्ध करून दिले. याबाबत शेतकऱ्यांना ‘कोविड-१९’ च्या पार्श्वभूमीवर नियमांचे पालन करत शेतकऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले.

### उत्पादन वाढले

आमच्याकडे कोरडवाहू क्षेत्र आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून रब्बी ज्वारीचे उत्पादन घेण्याचा प्रयत्न करत होतो. यावर्षी दीड हेक्टर क्षेत्रात कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली रब्बी ज्वारीचा पेरा केला होता. हेक्टरी तब्बल ५७ क्विंटल उत्पादन मिळाले. दीड हेक्टर क्षेत्रात ८५ क्विंटलचे उत्पादन मिळाले. याशिवाय चारा मिळाला. शेतीसाठी सेंद्रिय पद्धतीला प्राधान्य दिले होते. तसेच पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया केलेली होती.

**- यज्ञेश्वर देवरे,** शेतकरी, मुडावद

याशिवाय वेळोवेळी कृषी विभागाने मार्गदर्शन केले. उत्पादनासह विक्री व्यवस्थापनाचे मार्गदर्शन करण्यात आले.

### प्रति हेक्टरी ३५ क्विंटल ज्वारी

या प्रकल्पातून शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी सरासरी ३५ क्विंटल ज्वारीचे उत्पादन मिळाले. सर्वाधिक उत्पादन हेक्टरी ५७ क्विंटल एवढे मिळाले. ‘आत्मा’ योजनेंतर्गत शेतकऱ्यांना प्रतवारी, साफसफाई, ग्रेडिंग, पॅकिंग, लेबलिंग आदींबाबत शास्त्रोक्त प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमातून ७०० टन रब्बी ज्वारीचे उत्पादन झाले. या ज्वारीच्या नमुन्यांची गुणवत्ता तपासणी करण्यात आली. या ज्वारीच्या सेवनामुळे आम्लपित्तापासून मुक्तता, रक्तपुरवठा नियमित होण्यास मदत, मधुमेह, हृदयविकाराच्या रुग्णांसाठी लाभदायक आणि पचनास हलकी असल्याने ‘कोविड-१९’ च्या काळात रब्बी ज्वारीला ग्राहकांकडून मागणी वाढली आहे. या ज्वारीची ३० ते ३५ रुपये किलो दराने विक्री होत आहे. त्यासाठी शेतकरी आणि खरेदीदारांचा संवाद घडवून आणला गेला. या प्रकल्पाच्या यशस्वितेसाठी कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न करत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली आहे.

**– गोपाल साळुंखे,** माहिती सहायक, धुळे

## कृषी विभागामुळे मिळाली तिप्पट किंमत

**आजच्या** परिस्थितीत पारंपरिक शेती परवडत नाही. परिस्थितीनुरूप शेतीला वेगवेगळ्या कृषिपुरक व्यवसायाची जोड दिल्यास शेती नक्कीच फायद्याची होते. काळाची गरज हेरून व्यवसायाची निवड करायला हवी. एरंडोल शहरापासून नजीक असलेल्या उमरे (ता. एरंडोल) येथील भाऊसाहेब भिका पाटील या ४६ वर्षीय जिद्दी तरुणाची गोष्ट अशीच प्रेरणादायी आहे.



भाऊसाहेब भिका पाटील

श्री. पाटील यांची परिस्थिती अत्यंत हालाखीची. त्यातच शिक्षणही फक्त सातवीपर्यंतच झालेले. वडील हाडाचे शेतकरी. कोरडवाहू चार एकर व बागायती ५ एकर शेतीवर त्यांचा उदरनिर्वाह चालायचा. गावाजवळची शेती एवढाच काय तो आशेचा किरण. फारसे शिक्षण झाले नसले तरी शेतीत काहीतरी वेगळे घडवेल, अशी वडिलांना आशा होती.

भाऊसाहेब वडिलांसोबत एरंडोल येथे कृषी सेवा केंद्रात जात तेथे बियाणे पाहायचे, बियाणे कसे तयार करतात याबाबत जाणून घेण्याची त्यांची सततची इच्छा होती. हे बघितल्यावर आपणही अशाच प्रकारे बियाणे तयार करावे असे त्यांना सतत वाटत राहायचे. परंतु ते तयार कसे करायचे हे विचारायला कमीपणा वाटायचा. त्याचे

कारण त्यांचे कमी असलेले शिक्षण हे होते. परंतु एकदा निश्चय करून तालुका कृषी अधिकारी शरद बोरसे व कृषी सहायक श्री. सावंत यांचेकडे बियाणे तयार कसे करतात याबाबत विचारणा केलीच आणि अधिकाऱ्यांनी त्यांना तिळाबाबत सांगितले. त्यांना जे पाहिजे होते ते मिळाल्यामुळे त्यांनी जास्त विचार न करता अधिकारी सांगतील तसे करायचे ठरवले आणि उत्साहाने कामाला लागले.

पाहता पाहता त्यांना तिळाचे एकरी ४.५ क्विंटल प्रतिएकर याप्रमाणे एकूण १८ क्विंटल इतके उत्पादन मिळाले. ऐन उन्हाळ्यात पर्यायी पीक मिळाले तेही तब्बल १८ क्विंटल. त्यामुळे त्यांना आनंद झाला. जळगाव येथे तीळ विक्रीला घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. अधिकाऱ्यांनी विक्री न करण्याचा सल्ला दिला व तीळ बियाण्यांसाठी साठवणूक कशी करतात त्याबाबत सखोल मार्गदर्शन केले. अधिकाऱ्यांचा सल्ला पटल्याने त्यांनी १ वर्ष तीळ साठवून ठेवले. त्यानंतर अमोल सोनवणे यांनी आत्मा अंतर्गत बियाणे पॅकिंगबाबत सविस्तर माहिती दिली. प्रथम महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथून बियाणे उगवण क्षमता चाचणी करून प्रमाणपत्र मिळवून दिले. १ किलोची पॅकिंग करण्यास मदत करून सर्व बियाणे पॅकिंग करून घेतले.

भाऊसाहेब ही तिळाची बियाणे मे-जूनमध्ये बाजारात ६०-६५ रुपये किलोने विक्री करणार होते. परंतु कृषी विभाग व आत्माच्या मार्गदर्शन व सहकार्यामुळे या तिळाच्या बियाणाची २०० रुपये किलोने १० क्विंटल याप्रमाणे पूर्ण महाराष्ट्रभर 'विकेल ते पिकेल' योजनेंतर्गत विक्री झाली व उरलेल्या तिळाचे ३० किलोचे पॅकिंग करून त्याची १७० रुपये किलोने विक्री केली. उत्पादीत तीळ बाजारात ७ हजार रुपये क्विंटलप्रमाणे विकला असता तर १ लाख २६ हजार रुपये मिळाले असते. परंतु कृषी विभाग व आत्माच्या सहकार्याने बियाणे म्हणून १० क्विंटल २०० रुपये किलोप्रमाणे २ लाख रुपये व उर्वरित ८ क्विंटल १७० रुपये किलोप्रमाणे १ लाख ३६ हजार असे एकूण ३ लाख ३६ हजार रुपये मिळाले. अधिकाऱ्यांचा सल्ला व मार्गदर्शनाने मला तिप्पट नफा मिळाला. याचे सारे श्रेय भाऊसाहेब कृषी विभागास देतात. अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि त्यांच्यावर मी दाखवलेल्या विश्वासामुळेच माझ्या जीवनात परिवर्तन घडले, असे भाऊसाहेब पाटील आनंदाने सांगतात.

– **विलास बोडके,** जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव

## आदिवासींच्या उत्पादनाला 'वनराज'चा आधार

नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, दिंडोरी, कळवण या भागात तांदुळ, नागली, वरई, कुळीद, उडीद या पिकांचे उत्पादन अधिक प्रमाणात होते. आदिवासी बांधवांनी पिकवलेल्या उत्पादनाला सर्वत्र चांगली मागणी आहे.

कृषी विभागाच्या आत्मा प्रकल्पाच्या मार्गदर्शनाखाली पेठ तालुक्यातील गावंधपाडा येथील यशवंत गावंडे हे आपल्या आदिवासी शेतकरी बांधवांना शेतीमध्ये कशा पद्धतीने अधिक उत्पादन मिळून फायदा होईल. तसेच आदिवासी भागातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती भक्कम होण्यासाठी गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून प्रयत्नशील



आहेत. याच सामाजिक व आर्थिक उन्नतीच्या भावनेतून श्री. गावंडे यांनी २०१२-१३ मध्ये श्रीमंत शेतकरी गटाची स्थापना केली. त्यानंतर सेंद्रिय उत्पादनाला असलेली बाजारातील मागणी लक्षात घेता श्रीमंत आदिवासी सेंद्रीय शेतकरी गट व कृषिरत्न सेंद्रिय शेतकरी गटाची स्थापना केली आहे. या तिन्ही शेतकरी गटांतील १४० शेतकरी सभासदांच्या माध्यमातून साधारण १०० एकर क्षेत्र सेंद्रिय शेतीसाठी उपलब्ध करून दिले आहे.

शासनाच्या शेतकरी उत्पादक कंपन्यांची संकल्पनेतून आपल्या आदिवासी शेतकरी बांधवांना एकत्र आणून साधारण ३१० शेतकरी सभासद असलेली 'वनराज फार्मर प्रोड्युसर कंपनी' फेब्रुवारी, २०१९ मध्ये स्थापन केली. वनराज कंपनीच्या माध्यमातून आदिवासी शेतकरी बांधवांनी पिकवलेला इंद्रायणी, कोळपी तांदूळ सर्वत्र प्रसिद्ध आहे. लॉकडाऊनच्या काळात वनराज फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातून येथील शेतकऱ्यांनी पिकवलेला दीडशे टन तांदूळ सह्याद्री फार्मला बाहेरील बाजारभावापेक्षा अधिक किंमतीत विकण्यात आल्यामुळे वनराज कंपनीच्या सभासद असलेल्या शेतकऱ्यांना चांगलाच फायदा झाला आहे.

सध्या डायबेटीस, हृदय विकार, कर्करोग अशा विविध आजारांवर आरोग्यवर्धक असणाऱ्या ब्लॅक व रेड राईसची बाजारात जास्त मागणी आहे. त्यामुळे वनराज कंपनीच्या माध्यमातून ब्लॅक व रेड राईस या वाणांची बियाणे तयार करून उत्पादन घेण्याचे नियोजन सुरू असून येत्या हंगामात या दोन वाणांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होणार आहे. त्याचसोबत भाताचे तणस, तूस यांच्या पुनर्वापराचा विचार करून आत्मा प्रकल्प व मुक्त विद्यापीठ यांच्यामार्फत वनराज कंपनीच्या शेतकऱ्यांना मशरूम उत्पादनाचे प्रशिक्षण देण्यात आले असून सध्या मशरूमचे उत्पादनदेखील आदिवासी भागात घेण्यात येत आहे. बाजारातील मागणीनुसार शेतीला जोडव्यवसाय म्हणून सुरू केलेले मधु मका (स्वीट कॉर्न), मशरूम तसेच आंब्याचे केशर, हापूस, राजापुरी, लंगडा या विविध प्रकारांचे उत्पन्न या आदिवासी भागातील शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात घेत आहेत. या उत्पादनांमुळे 'विकेल ते पिकेल' या अभियानाच्या दृष्टीनेदेखील आदिवासी शेतकरी बांधव यशस्वी होत आहेत.

– **अर्चना देशमुख,** माहिती अधिकारी, नाशिक



राज्य शासनाच्या 'शिवभोजन थाळी' या महत्त्वपूर्ण योजनेच्या माध्यमातून कोरोना काळात राज्यातील कष्टकरी, शेतकरी, कामगार व गोरगरीबांना पोटभर अन्न मिळत आहे. २६ जानेवारी २०२० पासून १० रुपयांना शिवभोजन थाळी उपलब्ध करून देण्यात आली. मार्च २०२० पासून ती केवळ ५ रुपयांत देण्याचा निर्णय घेतला गेला. दरम्यान मार्च २०२१ नंतर 'ब्रेक दि चेन'अंतर्गत लागू करण्यात आलेल्या कडक निर्बंधांच्या काळात ही थाळी मोफत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतला. यामुळे गोरगरिबांना व वसतिगृहातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. 'शिवभोजन थाळी' यशस्वितेच्या काही निवडक यशकथा..

# समाधानाचे शिवभोजन

## निराश्रितांना 'शिवभोजन' केंद्राची संजीवनी

'ब्रेक दि चेन' या मोहिमेंतर्गत कोरोना प्रतिबंधासाठी राज्यात लॉकडाऊन जाहीर करण्यात आला. मात्र ज्यांच्याकडे स्वयंपाकघरच नाही, कुठेतरी निवारा शोधून आयुष्य काढणे अशीच ज्या निराश्रितांची परिस्थिती आहे. अशा सर्व निराश्रित, रोजच्या जेवणाची भ्रांत निर्माण झालेल्यांवर राज्याने उपासमारीची वेळ येऊ दिली नाही. अशा परिस्थितीत या काळात शिवभोजन केंद्रावरील शिवथाळीने अनेकांच्या जगण्याची उमेद जागवली. या केंद्रांवर गेल्या महिन्याभरापासून ज्यांचे आयुष्य उभे आहे. त्यापैकी अनेकांना बोलणेसुद्धा येत नाही. काही विमनस्क, दिव्यांग आहेत. मात्र या केंद्राकडे हात दाखवून ते हात जोडतात. राज्य शासनाने ही योजना सुरू करून ज्यांचे कोणीच नाही, अशांना उपासमारी पासून वाचवले आहे.

नागपूर शहरात जानेवारी २०२० ते मार्च २०२१ या काळामध्ये कार्यरत एकूण दहा केंद्रांच्या माध्यमातून ६ लाख ४८ हजार शिवभोजन थाळींचे वितरण करण्यात आले. दररोज दीड हजार लोकांना या केंद्रावरून जेवण दिले जाते. एका केंद्रावरून १५० थाळी वितरित होतात. नागपुरात गेल्या आठवड्याभरापूर्वी पूर्वीच्या १० केंद्रात आणखी ५ केंद्रांची भर पडली आहे. १५ केंद्रे सध्या सुरू आहेत. आता ही सर्व केंद्रे निराश्रितांसाठी संजीवन केंद्रे बनले आहेत.

– **प्रवीण टाके,** जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर

## अन्नदानाचे पुण्याचे काम

अहमदनगर जिल्ह्यात कोरोना काळात भुकेलेल्या गरजूंसाठी शिवभोजन केंद्रे अन्नपूर्णेचा प्रसाद ठरत आहेत. अहमदनगर जिल्ह्यात १५ एप्रिलपासून ते १४ जूनपर्यंत शिवभोजन थाळी लाभार्थ्यांना नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात येत आहे. जिल्ह्यातील एकूण ३३ शिवभोजन केंद्रांमार्फत गरजूंना जेवण उपलब्ध करून दिले जात आहे. दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असणाऱ्या चेहऱ्यांवर शिवभोजन थाळी मिळाल्यानंतरचे समाधान खूप काही सांगून जाणारे आहे. नातेवाईक आजारी आहेत म्हणून शहरात आलेल्या, तसेच ज्याचे कुणी नातेवाईक, सगेसोयरे नाहीत, रस्त्यावरचे जगणे आणि गरिबी वाटेला आलेल्यांनासुद्धा हा अन्नपूर्णेचा प्रसाद म्हणजे त्यांची जगण्याची उभारी वाढवणारा ठरत आहे.



अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात १२ आणि तालुकास्तरावर २१ असे ३३ शिवभोजन केंद्रे आजअखेर जिल्ह्यात सुरू आहेत. जिल्ह्यासाठी दैनंदिन शिवभोजन थाळी इष्टांक ४ हजार इतका ठरवून देण्यात आला आहे. मात्र कोविड काळात तो ६ हजार इतका वाढवून देण्यात आला आहे. जिल्ह्यात दररोज सरासरी साडेपाच हजार ते पाच हजार सहाशे गरीब गरजूंच्या पोटाची भूक भागवण्याचे काम हे शिवभोजन केंद्रे करत आहेत.

राज्य शासन आणि जिल्हा प्रशासन शिवभोजन केंद्राच्या माध्यमातून सामाजिक दायित्व निभावत आहे. जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांनीही या सामाजिक दायित्वाकडे अधिक लक्ष दिले आहे. शिवभोजन केंद्रांवर येणाऱ्या नागरिकांच्या प्रतिक्रियाही पुरेशा बोलक्या आहेत. राज्य शासनाने केलेली ही व्यवस्था जणू त्यांच्या जगण्यासाठीचा आधार ठरत आहे. त्याची कृतज्ञता त्यांच्या बोलण्यात पदोपदी जाणवते. अहमदनगर शहरातील राधाकिसन खामट. वय वर्ष ७०. कामधंदा नसल्याने उत्पन्नाचा आधार उरला नव्हता. अशा वेळी शिवभोजन योजनेमुळे पोटभर जेवण मिळते. गोरगरिबांसाठी ही

योजना चांगली असल्याची भावना ते व्यक्त करतात. दिनेश धाकतोडे, हे ४५ वर्षे वयाचे गृहस्थ. कुटुंबात कोणीही नसल्याने जेवणाचे हाल व्हायचे. त्यामुळे पोटापाण्याची सोय खऱ्या अर्थाने शिवभोजन केंद्रामुळे झाल्याचे ते सांगतात. शंकर साठे. घरोघरी जाऊन भाजीपाला विक्री करण्याचे काम करायचे. लॉकडाऊन काळात सार्वजनिक ठिकाणी प्रतिबंध लागल्याने जेवणाची भ्रांत लागायची. अशा वेळी शिवभोजनाने आधार दिला, अशा शब्दात त्यांनी भावना व्यक्त केल्या.

**– दीपक चव्हाण,** जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर

## शिवभोजन थाळी ठरली तारणहार

ईश्वर सुकलाल जोगी..! वय-६५. व्यवसाय - मोलमजुरी. रा. शिवाजीनगर, जळगाव. परिस्थिती अत्यंत हलाखीची. खान्देश मील बंद पडल्याने पडेल ते काम करून त्यांची उपजीविका सुरू होती. त्यात २००७ मध्ये एकमेव आधार असलेल्या पत्नीचे निधन झाले. मूलबाळ नसलेले ईश्वर जोगी जगण्याशी संघर्ष करत जीवन जगू लागले. अशा परिस्थितीत राज्य शासनाची शिवभोजन थाळी त्यांचा जगण्याचा आधार बनली. कोरोना काळात शासनाकडून मोफत मिळणाऱ्या या शिवभोजन थाळीने ईश्वर जोगींच्या डोळ्यात जगण्याचा दुर्दम्य आशावाद डोकावतो. जीवनात नियतीसमोर हरलेले असे अनेक ईश्वर जोगी या शिवभोजन थाळीमुळे आपल्याला आधार मिळाल्याचे कृतज्ञतापूर्वक सांगतात.

जळगाव जिल्ह्यातील ५ हजार १२५ कष्टकरी गरीब आणि गरजू दररोज या मोफत शिवभोजन थाळीचा लाभ घेत आहेत. शिवभोजन केंद्रावर प्रत्येक लाभार्थ्याचा फोटो व लाभार्थ्याचे पूर्ण नाव याची नोंद घेण्यात येत असून लाभार्थ्यांना वरण, भात, एक भाजी आणि दोन चपाती एका थाळीमध्ये (सध्या पार्सल स्वरूपात) देण्यात येत आहे.

जळगाव जिल्ह्यामध्ये सद्य:स्थितीत एकूण ३८ शिवभोजन केंद्रे कार्यरत आहेत. त्यापैकी शहरी भागात १६ व ग्रामीण भागात २२ केंद्रे आहेत. 'ब्रेक दि चेन'अंतर्गत जिल्ह्याचा हा इष्टांक दीडपटीने वाढवून दिला असल्याने जिल्ह्यात दररोज ५ हजार १२५ गोरगरिबांसाठी ही शिवभोजन थाळी आधाराबरोबरच तारणहार बनली आहे.

**– विलास बोडके,** जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव

## गडचिरोलीत गरजूंना शिवभोजनाचा लाभ

कोविड संसर्गाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यासह गडचिरोली जिल्ह्यातही १६ एप्रिल २०२१ पासून मोफत शिवभोजन योजनेची अंमलबजावणी सुरू झाली आहे. आतापर्यंत मोफत स्वरूपात जिल्ह्यातील १४ शिवभोजन केंद्रांवर दरदिवशी १५०५ प्रमाणे ४९,८०२ थाळींचे मोफत वाटप २३ मे पर्यंत करण्यात आले आहे. ही योजना सर्व केंद्रांवर यशस्वीरीत्या सुरू आहे. १६ एप्रिलपासून अनेक लाभार्थींनी शिवभोजन थाळीचा लाभ घेतला आहे. जिल्ह्यातील दैनंदिन थाळ्यांचा इष्टांक १०२० एवढा आहे. परंतु 'ब्रेक दि चेन'अंतर्गत हा



इष्टांक आणखी ४८५ थाळ्यांनी वाढवण्यात आल्या. आता १५०५ प्रमाणे दररोज गरजूंना मोफत स्वरूपात शिवभोजन दिले जात आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, गडचिरोली**

## पोटाची चिंता मिटवणारी योजना

हाताला काम नसलेले गरजू कुटुंब, सरकारी रुग्णालयात रुग्णांसोबत येणारे नातेवाईक, गोरगरीब यांच्यासह शिक्षणासाठी शहरांमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांच्याही पोटाची चिंता शिवभोजन योजनेने मिटवली असल्याची प्रतिक्रिया बदनापुर तालुक्यातील कुंभारी या गावातील विद्यार्थी अनिल सुखदेव ढवळे याने दिली.

जीवनामध्ये काहीतरी करून दाखवण्याच्या उद्देशाने जालना येथे मी शिक्षणासाठी आलो. जालना येथील मत्स्योदरी महाविद्यालयातून एम. कॉमचा अभ्यासक्रम पूर्ण करून एमपीएससीची तयारी करत आहे. घरामध्ये आम्ही तिघे भाऊ व दोन बहिणी. बहिणींची लग्ने झाली असून माझा एक भाऊ औरंगाबाद येथे शिक्षण घेत आहे, तर दुसरा भाऊ मजुरी करतो. आमचा घराचा चरितार्थ केवळ गावी असलेल्या दोन एकर शेतीमध्ये होणाऱ्या उत्पन्नावर चालत असल्याने शिक्षण घेण्यासाठी मोठी अडचण होते. जालन्यामध्ये चार मित्रांमध्ये भाड्याने रूम घेऊन राहत आहे. रोजच्या जेवणाचीही मोठी पंचाईत होत असे, परंतु शासनाने समाजातील गोरगरिबांसाठी सुरू केलेली शिवभोजन योजना ही वरदान ठरत असल्याचे अनिलने सांगितले. शिवभोजन थाळीत पौष्टिक आहार देण्यात येतो. लॉकडाऊनच्या काळामध्ये केवळ शिवभोजन योजनेमुळेच माझ्या दोन वेळच्या जेवणाची चिंता मिटली असून गोरगरिबांची भूक मिटवणाऱ्या या उपक्रमाबद्दल अनिल ढवळे याने शासनाचे आभार व्यक्त केले.

जालना जिल्ह्यात शिवभोजन योजनेच्या मंजूर थाळ्यांच्या संख्येमध्ये दीडपट वाढ करत जालना जिल्ह्यामध्ये १५ ठिकाणी या योजनेच्या माध्यमातून दरदिवशी २ हजार २५० गोरगरिबांना स्वच्छतेचे सर्व नियम पाळून, सामाजिक अंतराचे पालन करत शिवभोजन उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**– अमोल महाजन,** जिल्हा माहिती कार्यालय, जालना

**राज्यात दरवर्षी शेती व शेतीपूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे शेतकरी व संस्थेस राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत विविध पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. शेती क्षेत्रातील सर्वोच्च अशा डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार २०१८ करिता सांगली जिल्ह्यातील आष्टा येथील संजीव गणपतराव माने, तर २०१९ करिता बारामती तालुक्यातील पिंपळी येथील राजेंद्र दिनकरराव पवार व २०२० चा नागपूर जिल्ह्यातील सोनेगाव येथील सुनंदा संतोषराव सालोटकर (जाधव) यांना जाहीर झाला आहे. या पुरस्कार विजेत्यांच्या कार्याची ओळख..**

कृषी विभागाच्या वतीने पुढील वर्षापासून 'युवा शेतकरी', कृषी शास्त्रज्ञांसाठी 'कृषी संशोधक' पुरस्कार नव्याने सुरू करण्यात येत आहेत. तसेच पुरस्कारांची संख्या ६३ ऐवजी ९९ इतकी केली असून पुरस्कारांच्या निकषांमध्ये बदल करण्यात आले आहेत.

## ऊस उत्पादनातील आदर्श

पश्चिम महाराष्ट्र हा ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा पट्टा म्हणून ओळखला जातो. येथील शेतकरी नेहमीच प्रयोगशील राहिला आहे. याच परंपरेशी नाते सांगणारे सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील आष्टा येथील डॉ. संजीव गणपतराव माने यांना एकरी १०० टन, १५१ टन, २०० टन ऊस उत्पादन चळवळीचे जनक म्हणून ओळखले जाते. राज्य आणि राष्ट्रीयस्तरावरच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरूनही त्यांच्या प्रयोगशील कार्याची दखल घेण्यात आली आहे. डॉ. माने यांना आजपर्यंत ५७ हून अधिक विविध नामांकित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनानेही त्यांच्या कार्याची दखल घेऊन वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कारांने सन्मानित केले आहे. तसेच २०१८ चा डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार त्यांना जाहीर झाला आहे.

डॉ. माने यांनी १९८८ पासून ऊस शेतीला सुरुवात केली. पहिले दोन-तीन वर्षे लागणीपासून २० ते २२ टन, तर खोडव्यापासून १० टनांपर्यंत उत्पन्न निघत होते. पुढील जवळपास २० वर्षे ऊसाचे उत्पादन जास्तीत जास्त कसे घेता येईल, याबद्दल ते प्रयोग करत राहिले. सुरुवातीच्या काळात कृषिभूषण कै.बाबुराव फाळके यांनी ऊस उत्पादनाचे धडे दिले. हळूहळू एकरी २० टनावरून ४५ टनापर्यंत उत्पादन वाढले. पुढच्या दोन वर्षात शास्त्रोक्त माहिती घेऊन त्यांनी को-८०११ ऊसाचे बेणे वापरून एकरी ४५ टनावरून ८६ टनापर्यंत ऊस उत्पादन घेतले. तंत्रज्ञानातील बदल व शास्त्रोक्त पद्धतीचा वापर या जोरावर त्यांनी हे यश गाठले. एवढ्यावरच समाधानी न राहता त्यांनी एकरी १०० टन उत्पादन घेण्याचा विचार पक्का केला आणि १९९६-९७ पासून एकरी १०० टन ऊस उत्पादनाची सुरुवात झाली. त्याच वर्षी संशोधन करण्यात आलेल्या को-८६०३२ निरा या वाणाचा वापर करून, ठिबक सिंचन आणि पट्टा पद्धतीचा अवलंब आणि या सर्वांसाठी मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र पाडेगाव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, व्हीएसआय

# कृषिरत्न



संजीव गणपतराव माने

मांजरी पुणे येथील विविध संशोधक तसेच डॉ. महिपतराव जाधव यांच्या मार्गदर्शनाच्या आधारे प्रयोग यशस्वी ठरला व एकरी ९८.५ टनापर्यंत उत्पादन निघाले. याच प्रयोगापासून पुढे महाराष्ट्रात एकरी १०० टनाची सुरुवात सुरू झाली.

१९९६ साली स्वतःच्या शेतात १०० टन ऊस उत्पादन निघाल्यानंतर आपले हे यश केवळ स्वत: पुरते मर्यादीत न ठेवता डॉ. माने यांनी राज्यातील व राज्याबाहेरील विविध ठिकाणच्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करायला सुरुवात केली. एकरी १०० टन, १५० टन, २०० टन ऊस उत्पादन चळवळीचे ते जनक बनले. देशभरातील हजारो शेतकऱ्यांना ऊस उत्पादनवाढीसाठी त्यांनी चार महत्त्वाचे मुद्दे सांगितले. त्यामध्ये जमीनीची सुपीकता, ऊस लागणीची योग्य पद्धत, रासायनिक खतांची योग्य मात्रा, पीक संरक्षण व पाणी व्यवस्थापन यावर त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

डॉ. माने यांनी ऊस संजीवनी ग्रुप स्थापन केला असून, यामध्ये राज्यातील व राज्याबाहेरील जवळपास २३ हजारांहून अधिक सक्रिय शेतकरी सहभागी आहेत. १९९६ पासून आज अखेर पाच लाखांहून अधिक शेतकरी, शास्त्रज्ञ, पदाधिकारी यांनी डॉ. माने यांच्या शेतीस प्रत्यक्ष भेट देऊन माहिती घेतली. २०११ साली अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष बराक ओबामा भारत भेटीवर आले असता मुंबई येथे त्यांच्याशी अधिक ऊस उत्पादन व ठिबक सिंचन या विषयावर डॉ. माने यांनी प्रत्यक्ष चर्चा केली. डॉ. माने यांच्या मार्गदर्शनाखाली लागण ऊस पिकाचे प्रतिएकर १६७ टनाहून अधिक तर खोडवा ऊस पिकाचे प्रतिएकर १२३ टन इतके विक्रमी उत्पादन घेण्यात यश आले आहे. गुजरातमधील चार, तर महाराष्ट्रातील दोन साखर कारखान्यांचे ते अधिकृत सल्लागारही आहेत. अमेरिका हार्वर्ड युनिव्हर्सिटी बोस्टन येथे आयोजित जागतिक कृषी परिषदेस भारतातील यशस्वी शेतकरी म्हणून त्यांना निमंत्रित करण्यात आले होते. या ठिकाणी त्यांनी अधिक ऊस उत्पादन वाढीचे सादरीकरण करून मार्गदर्शन केले आहे. २०२१ साली कॉमवेल्थ होकेशनल युनिव्हर्सिटीकडून डॉक्टरेट पदवी देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या साखर दर नियंत्रण समितीसह १७ हून अधिक नामांकित संस्थांचे ते सदस्य आणि सल्लागार आहेत.

दरवर्षी डॉ. माने आपल्या शेतातील ऊसापासून दर्जेदार ऊस रोपांची निर्मिती करून राज्यात आणि राज्याबाहेर सुमारे ६० ते ७० लाख रोपांची निर्यात करतात. यामध्ये फक्त विद्यापीठ मान्यताप्राप्त अधिकृत वाणांचाच समावेश असतो. शेतकऱ्यांकडून या रोपांना मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाचा अधिकाधिक लाभ घेऊन कमी क्षेत्रात जास्तीत जास्त उत्पादन घेण्याचे तंत्र आत्मसात केल्यास शेती अडचणीची न ठरता ती निश्चितपणे फायद्याची ठरेल, असे डॉ. माने सांगतात.

– **वर्षा पाटोळे,** जिल्हा माहिती अधिकारी, सांगली

## नव्याचा ध्यास, कृषी प्रगतीची आस..!

शेतकऱ्यांसाठी दिशादर्शक काम राज्यात गेली अनेक वर्षे 'बारामती ॲग्रो'चे 'कृषी विकास प्रतिष्ठान' करत आहे. या प्रतिष्ठानच्या कार्याची दखल राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली आहे. या गोष्टीची जाणीव ठेवून राज्य शासनाने प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष राजेंद्र (दादा) अप्पासाहेब पवार यांना २०१९ चा 'डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार' या वर्षी जाहीर केला.

श्री. पवार आपल्या वडिलांच्या पद्मश्री (स्व.) डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या पावलावर पाऊल ठेऊन त्यांचा वसा समर्थपणे पुढे चालवत आहेत. आदरणीय (स्व.) अप्पासाहेब पवार व माजी केंद्रीय



राजेंद्र अप्पासाहेब पवार

मंत्री शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शेतीच्या तंत्रज्ञानाचे धडे गिरवले. फळबाग असो अथवा इतर पिके त्यामध्ये त्यांनी मूलभूत संशोधन केले आहे. फळे आणि इतर पिकांवर पडणारे नैसर्गिक रोग वेगवेगळ्या तंत्रज्ञानाने कमी करून उत्तम उत्पादन घेण्यावर त्यांनी नेहमीच भर दिला. त्यासाठी बारामती 'ॲग्रो डेव्हलपमेंट ट्रस्ट'च्या माध्यमातून ते गेली ४० वर्षे शेती क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत. शेतीचे विविध प्रयोग व त्याची माहिती शेतकऱ्यांना देण्यासाठी ते नेहमीच सहली व इतर कार्यक्रमांचे आयोजन करतात. कष्ट केल्याशिवाय, पिकांबरोबर राहिल्याशिवाय पिके बोलणार नाहीत. जो शेतकरी शेतीवर प्रेम करतो, कष्ट करतो, तो यशस्वी होतो. शेतीमध्ये रोज नवीन काहीतरी घडत असते. रोज नवीन तंत्रज्ञान येत आहे. शेतीतील विविध प्रयोग पाहण्यासाठी त्यांनी इस्राईल, इजिप्त, बेंगलोर व उत्तरेकडील काही राज्यात शेती अभ्यास दौरे केले आहेत.

### नवे संशोधन, प्रयोग आणि पीक पद्धती

नवे संशोधन, नवा प्रयोग आणि नवी पीक पद्धती उभी करण्याचे धाडस शेतकऱ्यांनी दाखवले पाहिजे. त्याचबरोबर दुष्काळी व

अवर्षण प्रवण भागातील हलक्या, मुरमाड व माळरानाच्या जमिनीवर अत्यंत कमी पाण्यात फळबागा फुलवून किंवा पॉलिहाऊस, शेडनेटमध्ये भाजीपाला, फुले यांचे अत्यंत चांगल्या प्रतीचे उत्पादन घेऊन काही शेतकऱ्यांनी स्वकष्टाने समृद्धीचा महामार्ग दाखवला आहे. त्याचा बोध घेऊन आपण काय करू शकतो, याचा विचार प्रत्येक शेतकऱ्याने करणे गरजेचे आहे. त्याला अभ्यासपूर्ण प्रयत्नांची जोड आवश्यक आहे, हे आवर्जून श्री.पवार सांगतात.

### पाणी व खर्चाचे नियोजन

शेतीत पाणी व्यवस्थापनाला खूप महत्त्व आहे. पाण्याचे व्यवस्थापन योग्य प्रकारे केल्यास पाण्याची बचतही होऊ शकते. जुने लोक म्हणायचे दुपारी बाराच्या वेळी रानात जा म्हणजे रान पाण्याला आले की नाही ते कळेल. आजकाल बरेच शेतकरी ठिबक संचाने पाणी देतात पण पाणी किती दिले ते मोजत नाहीत. इस्राईलसारखे भारतात कुणी पाणी मोजत नाही. फळबागेत ८० टक्के खेळ पाणी व्यवस्थापनाचा असतो. पाण्याचा गैरवापर टाळणे आणि योग्य प्रकारे उपयोग होणे अत्यंत आवश्यक असल्याचे श्री. पवार सांगतात. शेतकऱ्यांनी जमिनीची उत्पादन क्षमता लक्षात घेऊन तिच्यावर किती खर्च करायचा हे ठरवले पाहिजे. शेती ग्लोबल झाली आहे.

माती, पाणी, मुळे, रोग, वनस्पतिशास्त्र व कीडशास्त्र, बाजारपेठ, विक्रीव्यवस्था, उत्पादनोत्तर तंत्रज्ञान, अर्थशास्त्र आणि ग्राहकांची मानसिकता या सगळ्या बाबी शेतकऱ्यांना लक्षात आल्या पाहिजेत. जमीन जिवंत असते. सगळा खेळ हा सूक्ष्मजीवशास्त्राचा आहे. शेतकऱ्यांनी स्पर्धेत टिकणे आवश्यक बनले आहे. आता ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे जागतिक तापमान वाढ आणि बदलते हवामान व नैसर्गिक संकटे (उदा. अवेळी पाऊस, अतिवृष्टी, गारपीट, ढगाळ हवामान व धुके पडणे वगैरे) लक्षात घेता उघड्या रानात पिके घेण्याचे नियोजन न करता बंदिस्त वातावरणात पुढील काळात पिके घ्यावी लागतील. त्या दृष्टीने शेडनेट, पॉलिहाऊस, ग्रीनहाऊस, नेटहाऊस, ग्लासहाऊस यामध्ये कोणती पिके कमी खर्चात चांगली येऊ शकतात, यावर शेतकऱ्यांनी अभ्यास केला पाहिजे. स्वतः छोटे-छोटे निरनिराळ्या पिकांचे प्रयोग केले पाहिजेत हे शेतकऱ्यांना उद्देशून त्यांनी सांगितले.

कृषी विज्ञान केंद्र, बारामती या ठिकाणी दरवर्षी कृषी प्रदर्शन भरवले जाते. कृषी प्रदर्शनातून शेतकऱ्यांना खूप काही शिकण्यासारखे आहे. त्या संधीचा फायदा सर्व शेतकऱ्यांनी करून घेतला पाहिजे, असे श्री. पवार यांनी सांगितले.

जिल्हा माहिती अधिकारी, पुणे

## गोष्ट एका जिद्दी कृषिकन्येची

शेतीचा शोध स्त्रियांनी लावला असे अनेक दाखले आहेत. अनेक व्यवसायात स्त्रिया आपली गुणवत्ता सिद्ध करत असताना शेतीतही नवे प्रयोग करायला त्यांनी सुरुवात केली आहे. अशीच एक प्रयोगशील कृषिकन्या म्हणजे सुनंदा सालोटकर. श्रीमती सालोटकर या नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यातील सोनेगाव येथील. आई वडिलांचे छत्र हरवलेल्या व प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत ही जिद्दी मुलगी शेतात नवनवे प्रयोग करत गेली. स्वप्न पाहण्याच्या वयात प्रतिकूलतेमुळे वयाच्या १६व्या वर्षापासून तिने शेतीला जवळ केले.

केवळ पावणेसहा एकर शेतीचा तुकडा असताना त्यात तिने पिकांमध्ये वैविध्य आणले. तिच्या शेतात चिकू, पपई, संत्रा, केळी अशी फळांनी लगडलेली झाडे दिसतील आणि कापूस, सोयाबीन, गहू, चणा, अशी पिकेही दिसतील. एक पीक पद्धती निसर्गाच्या कोपामुळे कधीही दगा देऊ शकते हे लक्षात आल्यावर नियोजनपूर्वक अभ्यास करून व अनुभव आल्यावर ती पिकांसोबत भाजीपालाही पिकवू लागली.



सुनंदा सालोटकर

तिच्या पावणेसहा एकराच्या शेतात ती १५ एकराचे उत्पादन घेते, ही गोष्ट अचंबित करणारी आहे. मात्र त्यामागे अनेक व मिश्र पीक पद्धती, सेंद्रिय शेतीवर भर, खते व रासायनिकांचा अगदी गरजेपुरता वापर व जोडीला अफाट मेहनत. जशी नोकरी करावी लागते त्या पद्धतीने ती रोज शेती करते. निसर्गचक्रानुसार आवश्यक तेवढे शेणखत, गोमूत्रांचा वापर ती करते. नियोजनपूर्वक शेती करण्यावर तिचा भर असतो. आवश्यक तिथे तंत्रज्ञानाचाही आसरा शेती करण्यासाठी ती घेते. मात्र उत्पादन खर्च कमी करून शेणखत, निंबोळी अर्काची फवारणी यावर भर देते. सुरुवातीला ३-४ वर्षे शेती करण्याचा अनुभव नसतांना त्रास झाला; मात्र अनुभवातून शिकतच तिला शेतीतंत्र अवगत झाले. असा एकाएका उत्पादनावर प्रयोग होत गेला आणि त्या प्रयोगाला यश येत गेले.

शेतीसोबतच तिने जोडव्यवसाय केला. त्यामध्ये छोटा गोटफार्म, पोल्ट्रीफार्म तिने शेतातच टाकला आहे. उत्पादनासोबतच विक्रीतंत्र ही आवश्यक असल्याचे ती सांगते. यात तिला तिच्या जोडीदाराची समर्थ साथ आहे. दोन बहिणींची लग्न करून सुनंदाने तिची कौटुंबिक जबाबदारीदेखील पार पाडली. जिद्दीच्या बळावर शेती पिकवली आणि २००९ मध्ये राज्य सरकारने तिच्या कार्याची दखल घेतली. जिजामाता कृषिभूषण पुरस्कार देऊन तिच्या कार्याला कौतुकाची थाप दिली. त्यानंतर आता कृषिरत्न पुरस्कार यासह अनेक छोट्यामोठ्या पुरस्कारांची मोहोर तिच्या नावावर उमटली आहे. तिच्या यशस्वी शेतीला भेट देण्यासाठी आजूबाजूचे शेतकरीही येत असतात.

शेती करताना नियोजनपूर्वक करा, सेंद्रिय पद्धतीने शेती करा व ते करताना मेहनत व जिद्द कायम ठेवा, असा यशस्वी शेतीचा मंत्र सुनंदा सांगते.

**– शैलजा वाघ,** माहिती अधिकारी, नागपूर

**गहू म्हटले की, लाल तांबूस आकाराचे धान्य आपल्या डोळ्यासमोर दिसते पण मी म्हटले, आहो... गहू काळा पण असतो बरं! तर क्षणभर तुमचा विश्वास बसणार नाही... मात्र राज्यात महाबळेश्वरच्या लाल मातीत या काळ्या गव्हाची किमया साधली गेली आहे. या गव्हाचा वाण काळा असला तरी तो लाख गुणी आहे. हा गहू सामान्य गव्हापेक्षा अधिक पौष्टिक आहे बरं का! त्याच काळ्या गव्हाची ही गोष्ट..**



# वाण काळा, पण लाख गुणी!

**युवराज पाटील**

जगभर आरोग्याच्या बाबतीत खूप मोठी क्रांती होताना दिसत आहे. कार्बनयुक्त, प्रोटीनयुक्त आहारामुळे जगभर लठ्ठपणा (ओबीसीटी) ही एक मोठी समस्या होऊन बसली आहे. यावर मात करण्यासाठी वेगवेगळ्या पातळीवर संशोधन होत आहे. तुम्हाला माहिती आहे का? तुम्ही मी खात असलेला गहू मुळात मध्यपूर्वेतील लेबान्त क्षेत्रातील म्हणजे आजचे सिरिया, लेबनान, जॉर्डन, सायप्रस, फिलिस्तान या देशातील गवत होते. त्याच्यातल्या सत्त्वाने ते जगभर खाण्याचे धान्य म्हणून लोकप्रिय झाले. आज जगभर मक्याच्या पिकाखालोखाल गव्हाचे उत्पादन घेतले जाते. गव्हात कोणते प्रथिने आहेत माहिती व्हावे म्हणून सांगतो, कार्बन ७२ टक्के, कॅलरीज ३४ टक्के, बाकी घटकात पाणी, प्रोटीन, शुगर, फायबर आणि फॅट असते. त्यामुळे हे खूप पौष्टिक अन्न म्हणून जगभर वापरले जाते. यातील कार्बनच्या अधिकच्या मात्रेमुळे वजन वाढत असल्याचे लक्षात आल्यानंतर जगभर संशोधन सुरू झाले, त्यात आपल्या देशातही संशोधन सुरू झाले.

### काळ्या गव्हाच्या वाणाची निर्मिती

नॅशनल ॲग्री फूड बायोटेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट, मोहाली, पंजाब येथील प्रयोग शाळेत डॉ. मोनिका गर्ग यांनी काळ्या गव्हाच्या वाणावर संशोधन केले. या काळ्या गव्हात कोणते घटक आहेत, तर यात झिन्क, मॅग्नेशियम, लोह, याचे प्रमाण सामान्य गव्हापेक्षा अधिक असल्यामुळे तसेच ॲंथोसायनिन या घटकाचे प्रमाण या गव्हामध्ये १०० ते २०० पीपीएम आहे. त्यामुळे शरीराची होणारी झीज लवकर भरून निघते. या गव्हात शर्करेचे प्रमाण अत्यंत कमी असल्यामुळे मधुमेहासारख्या आजारासाठी फायदाच होईल, तसेच काळ्या गव्हाला पाणी कमी लागते, तांबोरा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला

नाही आणि फुटव्याची संख्या अधिक असल्यामुळे बियाणे कमी लागते. ही माहिती देत होते महाबळेश्वर तालुका कृषी सहायक दीपक बोर्डे आणि मी माझ्या पोटावर हात ठेवून ऐकत होतो. कारण शेकडो लोक पोट खूप वाढले यार कमी कसं करू, याची सगळीकडे खूप चौकशी करतात. त्यांना काय माहिती त्यांच्या इन्टेकमध्येच गोंधळ आहे. अशा या बहुगुणी गव्हावर अभ्यास केल्यानंतर दीपक बोर्डे यांनी काही शेतकऱ्यांना पटवून दोन क्विंटल बियाणे मोहालीवरून मागवले.

## काळ्या गव्हाच्या शेतात

काळ्या गव्हाचा प्रयोग ऐकल्यानंतर कधी एकदा जाऊन हा प्रयोग पाहू असे झाले होते. कारण आता शेतकरी विषमुक्त शेतीत

तिथे मनोहर भिलारे आणि विजयराव भिलारे यांच्या शेतात गेलो. त्यांनी दाखवले हाच तो काळा गहू.. उंच आणि मोठमोठ्या ओंब्या असल्याने मी तर म्हटले याचं काड पांढरं, ओंब्या पण पांढऱ्या, गहू कसा काय काळा. मनोहर भिलारे यांनी गव्हाची ओंबी चुरगाळून आतला गहू काढला तर तो चक्क काळा होता. म्हटले वाण काळा गुण मात्र पांढऱ्याला लाजवणारा!!

## पर्यटकांना चाखवणार चव

महाबळेश्वरला दरवर्षी दहा ते बारा लाख पर्यटक देशाच्या कानाकोपऱ्यांतून येतात. त्यांना असे त्यांच्याकडे नसलेले आरोग्यदायी देण्यात आम्हालाही आनंद वाटेल, अशी माहिती शेतकरी विजयराव भिलारे यांनी दिली. त्यांचे स्वतःचे हॉटेल आणि रिसॉर्ट असल्यामुळे



प्रयोगशील शेतकरी मनोहर भिलारे



प्रयोगशील शेतकरी पंढरीनाथ लांगी सोबत कृषी सहायक दीपक बोर्डे



प्रयोगशील शेतकरी विजयकुमार भिलारे

अधिक प्रयोगशील होतो आहे, फक्त त्याला योग्य माहिती व्हायला हवी म्हणून महाबळेश्वर येथील काळ्या गव्हाच्या शेतात जायचे निश्चित केले. वाईचा पसरणी घाट ओलांडून पुढे पाचगणी, नंतर भिलार फाटा त्यापुढे आपण महाबळेश्वरला ज्या केट किंवा विल्सन पॉइंटला जातो.. त्याच्या अलीकडच्या बाजूने दोनएक किलोमीटरवर अवकाळी गाव सह्याद्रीच्या कुशीत लपून बसावे तसे वसलेले आहे.

### महाबळेश्वरच्या लाल मातीत काळा गहू

गणेश जांभळे, पंढरीनाथ लांगी (क्षेत्र महाबळेश्वर), मनोहर भिलारे, विजयराव भिलारे (माजी सभापती), अवकाळी (ता. महाबळेश्वर), जयवंत भिलारे, भिलार (ता. महाबळेश्वर) आणि युवराज माने क्षेत्र माहुली (ता. सातारा) या लोकांनी या काळ्या गव्हाच्या वाणाची पेरणी केली. हा प्रयोग कमालीचा यशस्वी झाला. जवळपास सर्वांनी सेंद्रिय पद्धतीने या गव्हाची वाढ केली आहे. कमी पाण्यात एक बियाण्याला सात ते दहा फुटवे येऊन आपल्या साध्या गव्हापेक्षा चांगला आला आहे. सर्वसामान्यपणे आपला लोकवन किंवा इतर गहू कमरेपर्यंत येतात, पण याची उंची कमरेपेक्षा अधिक असून ओंबीचा आकार मोठा आहे.

त्यांचा गहू थेट त्यांच्या या किचनमध्ये जाईल पण पुढच्या वर्षी त्यांना या गव्हाची अधिक पेरणी करण्याचा मानस आहे. श्रीक्षेत्र महाबळेश्वर येथील पंढरीनाथ लांगी म्हणाले, मी प्रत्येक वर्षी गहू पेरतो पण एवढा जोरात कधीच आला नव्हता, आता मी या गव्हाचे बियाणे म्हणून वापरेन. हे सांगताना त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसांडून वाहत होता.

## प्रयोगशील अधिकारी

महाबळेश्वर तालुका कृषी सहायक दीपक बोर्डे हे कमालीचे प्रयोगशील अधिकारी आहेत. ते तेथील शेतकऱ्यांना काही तरी नवीन करण्याचे प्रोत्साहन देत राहतात. जिल्हा कृषी अधीक्षक गुरुदत्त काळे, उपसंचालक विजयकुमार राऊत, उपविभागीय कृषी अधिकारी चंद्रकांत गोरड, तालुका कृषी अधिकारी सुनील साळुंखे यांच्या सहकार्याने नेहमी अग्रेसर असणारे बोर्डे यांच्यासारखे अधिकारी निर्माण व्हावेत. आळस झटकून शिवारे आणि शेतकऱ्यांचे खिसे आणि जनतेचे आरोग्य श्रीमंत होईल, यात शंका नाही.

जिल्हा माहिती अधिकारी, सातारा

**जागतिक महामारी असलेल्या कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा सामना करत असताना मे महिन्याच्या अखेरीस रुग्णसंख्या काहीशी स्थिरावली आहे. त्यामुळे दिलासादायक वातावरण दिसत आहे. मात्र कोरोनातून रुग्ण बरे होत असतानाच म्युकरमायकोसिस (काळी बुरशी) या आजाराचे संकट राज्यासमोर उभे राहिले आहे. त्याला रोखण्यासाठी राज्य शासनामार्फत प्रयत्न केले जात आहेत. एके काळी सात लाखांहून अधिक सक्रिय रुग्ण असताना त्यात घट होऊन ही संख्या मे अखेरीस दोन लाखांवर आली आहे.**

**अजय जाधव**




# साथ आटोक्यात, तरी काळजी हवीच

मुंबईसारख्या महानगरातही रुग्णसंख्या कमी आढळतेय ही काहीशी समाधानाची बाब आहे. काही जिल्ह्यांमध्ये रुग्णसंख्या कमी होताना दिसतेय, तर काही ठिकाणी वाढताना. त्यामुळे जागरूक राहून कोरोनाविरुद्धचे युद्ध सुरू ठेवावे लागणार आहे.

## मिशन ऑक्सिजन स्वावलंबन

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत रुग्णसंख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने रुग्णांसाठी वैद्यकीय ऑक्सिजनच्या वापरात आणि मागणीत मोठी वाढ झाली. राज्याला ऑक्सिजन उत्पादनात स्वयंपूर्ण बनवण्यासाठी मिशन ऑक्सिजनची अंमलबजावणी सुरू आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यामधील चोराखळी येथील धाराशिव साखर कारखान्यातील ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. साखर उद्योगाने ऑक्सिजन निर्मितीच्या क्षेत्रात पुढाकार घेण्याचे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले आहे.

## मुख्य सचिवांकडून संनियंत्रण

राज्यात स्थापन करण्यात आलेल्या ऑक्सिजन टास्क फोर्समधील अधिकाऱ्यांशी मुख्य सचिव दररोज रात्री दहा वाजता ऑनलाइन बैठका घेतात. धोरणात्मक निर्णय त्यात घेतले जातात. ऑक्सिजनबाबतची परिस्थिती हाताळण्यासाठी राज्य, विभागीय आणि जिल्हा या तीन स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापित करण्यात आले आहेत. त्याद्वारे राज्यातील पाच हजारपेक्षा जास्त कोविड रुग्णालयांच्या मागणीसंबंधी आकडेवारी जमा करणे आणि ऑक्सिजन पुरवठा करणे ही कामे सुरू आहेत. विभागीय आणि जिल्हास्तरावरील अधिकारी नोडल अधिकाऱ्यांच्या मदतीने आतापर्यंत यशस्वीपणे मागणी आणि पुरवठा यांच्यात समन्वय साधून उत्कृष्ट कार्य करत आहेत.

## म्युकरमायकोसिसचे संकट

कोरोनातून बरे झालेल्या मात्र ज्यांची प्रतिकारक्षमता कमी आहे. ज्यांचा मधुमेह नियंत्रित नाही, दुर्धर आजार असलेल्या रुग्णांना म्युकरमायकोसिस (काळी बुरशी) आजाराने ग्रासले आहे. राज्यात सध्या ३००० च्या आसपास या आजाराचे रुग्ण आहेत. या आजारावर प्रभावी असलेले 'म्फोटेरिसीन-बी' इंजेक्शन उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. त्याचबरोबर या आजाराच्या रुग्णांवर महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेतून मोफत उपचार करण्याचा निर्णयदेखील राज्य शासनाने घेतला आहे.

## संभाव्य तिसऱ्या लाटेला रोखण्यासाठी

दुसऱ्या लाटेला तोंड देत असताना तज्ज्ञांनी तिसऱ्या लाटेची शक्यता वर्तवली आहे. ही संभाव्य लाट रोखण्यासाठी राज्य शासनाने कडक पावले उचलली आहेत. उपचारांसाठी सुविधांची संख्या वाढवतानाच लहान मुलांमध्ये कोरोनाचा धोका ओळखून राज्य बालरोग तज्ज्ञांचा टास्क फोर्स स्थापन करण्यात आला आहे. १४ सदस्यांचा हा टास्क फोर्स लहान मुलांना कोरोनापासून बचावासाठी उपचाराविषयी मार्गदर्शन करत आहे. मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी

राज्यभरातील बालरोग तज्ज्ञांशी संवाद साधत लहान मुलांमधील संसर्ग रोखण्याचे आवाहन केले.

महाराष्ट्रात गेल्या सहा महिन्यात आढळलेल्या कोरोना रुग्णांच्या आकडेवारीचे विश्लेषण केले असता, लहान मुलांमध्ये कोरोनाचा संसर्ग होण्याच्या प्रमाणात फारसा बदल आढळून आला नाही, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. कोरोनाला बळी पडलेल्या १८ वर्षांखालील मुलांचे प्रमाण मे २०२१ मध्ये सुमारे ०.०७ टक्के इतके आहे. यावरून लहान मुलांमध्ये या आजाराचे प्रमाण कमी असल्याचे निदर्शनास आले आहे.

### सर्वसामान्यांना दिलासा

खासगी रुग्णालयांमध्ये कोरोना उपचारांसाठी येणाऱ्या अव्वाच्या सव्वा खर्चातून सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी खासगी रुग्णालयांच्या उपचाराचे दर निश्चित करण्यात आले आहेत. या संदर्भात आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सादर केलेल्या अधिसूचनेच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंजुरी दिली आहे. यानुसार आता शहरांचे वर्गीकरण करून दर निश्चित केले आहेत. निश्चित केलेल्या दरांशिवाय अधिक दर आकारता येणार नाहीत.

### जाणीवजागृती मोहीम

कोरोनाचा प्रतिबंध करण्यासाठी सातत्याने शासनाकडून जाणीवजागृती केली जात आहे. मात्र नागरिकांनी त्याला सकारात्मक प्रतिसाद देणे आवश्यक आहे. वैयक्तिक काळजीतूनच आपण समूहाची काळजी घेऊ शकतो. त्यामुळे मास्क वापरणे, गर्दी न करणे, हात धुणे, सुरक्षित अंतर राखणे, याविषयी वारंवार आवाहन केले जात आहे. त्यासोबतच कोरोनाची लक्षणे दिसल्यास काय करावे, कोठे उपचार घ्यावे, घरच्या घरी ऑक्सिजन पातळी मोजण्यासाठी सहा मिनिटे चाचण्याची चाचणी करावी, या माध्यमातून नागरिकांचे प्रबोधन केले जात आहे. रुग्णसंख्या कमी होण्यासाठी संसर्गाची साखळी तोडणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्य शासनाने सर्व घटकांचा सखोल विचार करून निर्बंध लावले आहेत. संसर्ग रोखतानाच अर्थचक्र सुरळीत ठेवण्याचेही प्रयत्न शासनाला करावे लागतात, मात्र सर्वप्रथम प्राधान्य नागरिकांच्या आरोग्याला आहे, हे महत्त्वाचे आहे.

खासगी रुग्णालयात कोरोना रुग्णांवर उपचारासाठी ८० टक्के खाटांसाठी शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार व उर्वरित २० टक्के खाटांसाठी खासगी रुग्णालयांनी निश्चित केलेल्या दरानुसार दर आकारणी करण्याबाबतची अधिसूचनेची मुदत संपली होती. त्यास मुदतवाढ देताना शहरांच्या वर्गीकरणानुसार सुधारणा करण्यात आली आहे.

यापूर्वीच्या अधिसूचनेत उपचारांचे दर हे मोठ्या शहरातील रुग्णालये व अतिदुर्गम भागातील रुग्णालये यासाठी एकच होते. शहरांच्या वर्गीकरणामुळे उपचारांच्या खर्चात मोठा दिलासा मिळणार आहे. विमा कंपन्या आणि विविध प्रकारचे भत्ते देताना ज्याप्रमाणे शहरांचे वर्गीकरण केले जाते. त्याच निकषावर वर्गीकरण आणि संबंधित उपचारांचे दर निश्चित केल्याने, विशेषतः ग्रामीण भागातील रुग्णांवरील उपचारांचा खर्च तुलनेने कमी होणार आहे.

दरांसाठी शहरांच्या दर्जानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. अ, ब, क अशा गटात शहरे व भागांची विभागणी केली आहे. त्यामुळे आता शहरी व ग्रामीण भाग यामध्ये उपचारांचा दर वेगवेगळा असेल व पर्यायाने ग्रामीण भागात तुलनेने कमी खर्चात उपचार शक्य होतील. रुग्णाला संबंधित रुग्णालयाने पूर्वलेखापरीक्षित देयक देणे बंधनकारक करण्यात आले आहेत. याशिवाय जास्त दर आकारणाऱ्या रुग्णालयांवर भरारी पथकांमार्फत पुन्हा तपासणी करण्याची आणि त्यावर कारवाई करण्याची तरतूदही या अधिसूचनेत कायम ठेवण्यात आली आहे.

### आरोग्य सुविधांवर भर



वाढत्या रुग्णसंख्येमुळे उपचाराच्या सुविधेत मोठी वाढ करण्यात आली आहे. राज्यात सध्या ६६३१ कोरोना उपचार केंद्रे आहेत. त्यामध्ये केंद्र शासनाच्या निर्देशानुसार त्रिस्तरीय वर्गवारी करण्यात आली आहे. त्यात ४ लाख ७३ हजार ७१० रुग्णशय्या असून ऑक्सिजन रुग्ण शय्यांची संख्या १ लाख ६ हजार आहेत. ३२ हजाराच्या आसपास अतिदक्षता विभागातील खाटा आहेत. १२ हजार ६१६ व्हेंटिलेटर्स आहेत. राज्य शासनाने या व्यापक सुविधा करून ठेवल्या आहेत.

### लसीकरणात अग्रेसर

राज्यात संसर्गाचे प्रमाण कमी होत असतानाच्या काळात १६ जानेवारी २०२१ पासून कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरणाला सुरुवात झाली. सुरुवातीला प्राधान्य गटातील कर्मचाऱ्यांच्या लसीकरणाला सुरुवात झाली. त्यानंतर ४५ वर्षांवरील सर्वांना आणि आता १ मे पासून १८ वर्षांवरील सर्वांचे लसीकरण केले जात आहे. महाराष्ट्र राज्य सुरुवातीपासून कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरणात आघाडीवर आहे.

देशपातळीवर आजही महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. मे अखेरीस २ कोटी २२ लाख जणांना लसीकरण करण्यात आले आहे. लसीकरण हे कोरोनाविरुद्धच्या लढाईतील महत्त्वाचे साधन असल्याने त्यावर भर देण्यात येत आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**पावसाळा चालू होत आहे, पावसाळ्यापूर्वी असणारी सर्व कामे पूर्ण करण्याचा व त्या कामांचा आढावा घेण्याचे काम राज्य मंत्रिमंडळातील सर्व सदस्य करत आहेत. कोरोनाच्या परिस्थितीवर मात करण्याचे कसोशीने प्रयत्न होत आहेत. या प्रयत्नांना यश मिळत आहे. कोरोनाविरुद्धच्या लढाईत राज्य शासन करत असलेल्या प्रयत्नाबद्दलची थोडक्यात माहिती...**

# पाऊल पडते पुढे



**उद्धव बाळासाहेब ठाकरे**
मुख्यमंत्री

## नागरिकांना वेळीच योग्य माहिती द्या

येणाऱ्या पावसाळ्यात नैसर्गिक आपत्तींचा अंदाज घेऊन सर्व यंत्रणांनी समन्वयाने व काळजीपूर्वक काम करावे तसेच नागरिकांना वेळीच सूचना मिळतील याची काळजी घ्यावी, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोकण विभागातील सर्व जिल्ह्यांचा पावसाळ्यापूर्वीच्या तयारीचा आढावा दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतला, त्यावेळी ते बोलत होते. या वेळी कोकणातील जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, तटरक्षक दल, मत्स्यव्यवसाय विभाग, हवामान विभाग, नौदल यांनी बैठकीत आपापल्या तयारीची माहिती दिली.

## मोहफुलांच्या माध्यमातून आदिवासींचे सक्षमीकरण

मोहफुलांच्या माध्यमातून आदिवासींचे सक्षमीकरण करणे शक्य होणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी खारगे समितीच्या शिफारशी स्वीकारल्यामुळे व्यक्त केला आहे. वनविभागाचे तत्कालीन प्रधान सचिव विकास खारगे यांच्या समितीच्या शिफारशी मान्य करून मोहफुलांवरील निर्बंध हटवण्याबाबत गृह विभागाने तसा शासन निर्णय काढला आहे. राज्य उत्पादन शुल्क कायद्यातील बदलाबाबत वन विभाग, आदिवासी विकास आणि राज्य उत्पादन शुल्क या तीनही विभागांच्या अधिकाऱ्यांनी मुख्य सचिवांकडे एकत्रित बसून कायद्यात नेमके कोणते बदल करायचे याबाबत निर्णय घ्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले होते. विधानसभेचे तत्कालीन अध्यक्ष नाना पटोले यांनी सातत्याने यासाठी पाठपुरावा केला होता. तत्कालीन राज्य उत्पादन शुल्क मंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्यासमवेतदेखील मुख्यमंत्र्यांकडे बैठक झाली होती.

## माझा डॉक्टर्स

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेतील एका वैशिष्ट्यपूर्ण दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्य टास्क फोर्समधील तज्ज्ञ डॉक्टर्सनी मुंबईतील सुमारे ७०० खासगी डॉक्टरांनी कोरोनाबाबतीत वैद्यकीय उपचारांबाबत निश्चित कार्य पद्धती अवलंबवावी याविषयी एकाच वेळी मार्गदर्शन केले आणि त्यांच्या अनेक शंकांचे निरसन केले. विशेष म्हणजे अशाच पद्धतीने मुंबईतील सुमारे ३०० डॉक्टरांशी संवाद साधण्यात आला होता. दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित या दोन्ही सभांमध्ये मिळून मुंबईतील सुमारे एक हजार डॉक्टरांनी सहभाग घेतला. कोरोना काळात फॅमिली डॉक्टरची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे कारण कोणत्याही लहान मोठ्या आजारात रुग्ण पहिल्यांदा आपल्या जवळच्या, परिवाराच्या डॉक्टरशी संपर्क साधतो. त्यामुळे त्यांची जबाबदारी खूप महत्त्वाची आहे. सर्वसामान्यांना आपण माझा डॉक्टर बनून त्यांना मार्गदर्शन केल्यास रोगाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच तो रोखण्यात मोठी मदत होणार आहे असे श्री.ठाकरे यांनी सांगितले.

## साखर उद्योगाचे ऑक्सिजन उत्पादन

राज्याला ऑक्सिजन उत्पादनात स्वयंपूर्ण बनवण्यासाठी मिशन ऑक्सिजनची अंमलबजावणी सुरू असून साखर उद्योगाने ऑक्सिजन निर्मितीच्या क्षेत्रात पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले.

उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील चोराखळी येथील धाराशिव साखर कारखान्यातील ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन केले. त्या वेळी त्यांनी हे आवाहन केले. या कार्यक्रमास केंद्रीय रस्ते विकास आणि भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री जयंत पाटील, आरोग्यमंत्री राजेश टोपे, उस्मानाबादचे पालकमंत्री शंकरराव गडाख-पाटील दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले. या वेळी कारखाना स्थळावर खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार सुभाष देशमुख, आमदार कैलास पाटील, कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील आदी उपस्थित होते.

उस्मानाबाद जिल्ह्यातील धाराशिव साखर कारखान्यातील इथेनॉल प्रकल्पात बदल करून ऑक्सिजन प्रकल्पात रूपांतर करण्यात आले आहे. ऑक्सिजन निर्मिती करणारा हा पहिला साखर कारखाना ठरला आहे, दररोज सहा टन ऑक्सिजनची निर्मिती होणार असून ऑक्सिजनची शुद्धता ९६ टक्के आहे.

## प्राथमिक आरोग्य केंद्रातून कोरोनावर उपचार

राज्यातील सर्व डॉक्टरांना कोरोनाविरुद्धच्या लढ्यात सहभागी करणाऱ्या माझा डॉक्टर या मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अभिनव संकल्पनेस झपाट्याने प्रतिसाद मिळत असून राज्यभरातील अगदी गावपातळीवरील सुमारे १७ हजार ५०० फॅमिली फिजीशियन्स, वैद्यकीय चिकित्सक यांच्याशी राज्याच्या टास्क फोर्समधील तज्ज्ञ

डॉक्टरांनी सुमारे दोन तास संवाद साधून कोविडवरील वैद्यकीय उपचाराबाबत मार्गदर्शन केले आणि त्यांच्या शंकांचे समाधान केले. महाराष्ट्रातील चांद्यापासून बांद्यापर्यंतच्या फॅमिली डॉक्टरांनी शासनासोबत या लढाईत उतरावे, घरीच राहून उपचार घेत असलेल्या कोविड रुग्णांच्या योग्य उपचाराचे शिवधनुष्य सर्व माझा डॉक्टरांनी उचलावे, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या उद्‌घाटनपर प्रास्ताविकात केले.

प्राथमिक आरोग्य केंद्रातून कोरोनावर उपचार या विषयावर वनएमडी या ऑनलाइन प्लॅटफॉर्मने ही परिषद आयोजित केली होती. राज्य टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक, सदस्य डॉ. शशांक जोशी, डॉ. राहुल पंडित यांच्यासह डॉ. तात्याराव लहाने, डॉ. आशिष भूमकर यांनी या वेळी मार्गदर्शन केले.

## प्रधानमंत्र्यांनी केले कौतुक

कोरोनाविरुद्ध लढाईत महाराष्ट्र करत असलेल्या प्रयत्नाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडून दूरध्वनीद्वारे माहिती घेतली. तसेच दुसऱ्या लाटेशी मुकाबला करताना महाराष्ट्र चांगली लढाई लढतो आहे असे सांगितले. या वेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीदेखील विशेषत: महाराष्ट्राला ऑक्सिजनच्या बाबतीत अधिक बळ मिळावे अशी विनंती केली व विविध उपाययोजनांची माहिती दिली. तिसऱ्या लाटेला तोंड देण्यासाठी कसे नियोजन करत आहोत त्याविषयीही मुख्यमंत्री बोलले. प्रधानमंत्री आणि केंद्र सरकार हे कोरोना लढ्यात महाराष्ट्राला प्रथमपासून मार्गदर्शन करत असून त्याचा चांगला उपयोग राज्य सरकारला होतो आहे, महाराष्ट्राच्या काही सूचना केंद्राने मान्यही केल्या याविषयीही मुख्यमंत्र्यांनी प्रधानमंत्र्यांचे आभार मानले.

## प्रधानमंत्र्यांनी घेतली दखल!

हिवरे बाजारने गावात आरोग्य व स्वयंसेवकांची चार पथके स्थापन करून गावातील प्रत्येक घराचे सर्वेक्षण केले. कोरोना लक्षण आढळणाऱ्या प्रत्येक रुग्णाच्या घराची आणि कुटुंबाची जबाबदारी या पथकांनी घेऊन रुग्णांना विलगीकरण कक्षात दाखल होण्यास प्रोत्साहित केले त्यामुळे रुग्णांची आता आपल्या घराचे आणि कुटुंबाचे काय होणार, शेतीभाती आणि दूधदुभत्याच्या कामाचे काय होणार ही काळजी मिटली. ज्यांचा सुरुवातीला विलगीकरणात जाऊन उपचाराला विरोध होता ते या प्रयत्नामुळे विलगीकरणात राहून उपचार घेण्यास तयार झाले. यातूनच कोरोनामुक्त हिवरे बाजारची वाटचाल सोपी होऊन गाव काही कालावधीतच कोरोनामुक्त झाल्याची माहिती अहमदनगरचे जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना दिली व हिवरे बाजारचा हा कोरोनामुक्तीचा पॅटर्न पद्मश्री पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील १३१६ ग्रामपंचायतींमध्ये राबवला जात असल्याचे सांगितले.

## प्रधानमंत्र्यांनी जाणून घेतल्या यशकथा

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ११ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत या राज्यातील ६० जिल्हाधिकाऱ्यांशी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला. ज्या जिल्ह्यांनी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत जिल्ह्यातील कोरोना रुग्णवाढीवर नियंत्रण मिळवले, त्या काही जिल्ह्यांच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती प्रधानमंत्र्यांनी समजून घेतली. तसेच स्थानिक पातळीवर प्रत्यक्ष फिल्डवर काम करणाऱ्या या सर्व अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांची आणि अनुभवाची ही शिदोरी पुढील कित्येक पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याने याच्या व्यवस्थित नोंदी ठेवल्या जाव्यात, जिल्ह्याच्या ज्या गावात कोरोनाचा प्रादुर्भाव झाला नाही तिथे तो होणार नाही आणि जिथे झाला आहे तिथे कडक उपाययोजनांद्वारे तो नियंत्रित करून जिल्ह्यातील गावे कोरोनामुक्त होतील या दृष्टीने प्रयत्न करावेत, अशा सूचनाही श्री. मोदी यांनी या वेळी केल्या.

या दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित संवादामध्ये संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आरोग्यमंत्री राजेश टोपे, मुख्य सचिव सीताराम कुंटे यांच्यासह केंद्र आणि राज्य शासनाचे अधिकारी सहभागी झाले होते. या साठ जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

## मुख्यमंत्र्यांचा कोकण दौरा

रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीबाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या जिल्ह्यांचा पाहणी दौरा केला. या वेळी रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. अनिल परब, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री व सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, खासदार विनायक राऊत, आमदार भास्कर जाधव, आमदार राजन साळवी, माजी आमदार हुस्नबानु खलिफे आदी उपस्थित होते.

तौक्ते वादळामुळे फळबागा, झाडे, महावितरण आणि घरांच्या नुकसानीचे पंचनामे करून तत्काळ अहवाल सादर करावा अशी सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. वादळात झालेल्या नुकसानाबरोबरच भूमिगत विद्युत वाहिनी, धूप प्रतिबंधक बंधारे, चिपी विमानतळ याबाबतही आढावा घेण्यात आला. मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी मालवण येथे ज्यांच्या घरांची पडझड झाली त्याविषयी माहिती घेतली व काही ठिकाणी झालेल्या नुकसानीची पाहणी करून त्यांना दिलासा दिला.

## ऑनलाइन वैद्यकीय परिषद

कोविडविरुद्धच्या लढ्यात डॉक्टरांना मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेण्याच्या मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेस वाढता प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील ६,३०० बालरोग तज्ज्ञांना राज्य शासनाच्या कोविडविषयक बालरोग तज्ज्ञ टास्क फोर्सने वैद्यकीय उपचाराबाबत व्यवस्थित मार्गदर्शन

केले. मुलांमध्ये कोविड आणि कोविडशी संबंधित मानसिक व भावनिक आरोग्याकडे लक्ष देण्यावर देखील चर्चा झाली. लहान मुलांमधील संसर्गाबाबत बेसावध राहू नका, वेळीच डॉक्टरला दाखवा, कोविडविरुद्धची आपली एकजुटीची साखळी मजबूत ठेवून या विषाणूला पराभूत करू असे, या वेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

विशेष म्हणजे हा कार्यक्रम बालरोग तज्ज्ञांव्यतिरिक्त इतर संस्था व संघटनांमधील सुमारे ५२ हजार डॉक्टर्स आणि हजारो सर्वसामान्य दर्शकांनी विविध माध्यमातून पाहिला. राज्य शासनाने बाल रोग तज्ज्ञांच्या टास्क फोर्सची स्थापना केली आहे. डॉ. सुहास प्रभू हे अध्यक्ष असून डॉ. विजय येवले, डॉ. परमानंद आंदणकर हे सदस्य आहेत.

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची कार्यशाळा

पावसाळ्यात काही रोग व साथी उद्भवतात, त्यांची काही लक्षणे आणि कोविडची लक्षणे एकसारखी असतात. त्यामुळे डॉक्टर्सनी त्यांच्याकडे येणाऱ्या रुग्णांमधील कोविडची लक्षणे वेळीच ओळखावीत. तसेच, गृह विलगीकरणातील रुग्णांवर व्यवस्थित उपचार होताहेत किंवा नाही ते बारकाईने पाहावे अशी सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. ते महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल)ने आयोजित केलेल्या कोरोना संदर्भातील दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन करताना बोलत होते. कोविडच्या लढाईत आता डॉक्टर्सदेखील मोठ्या प्रमाणावर मैदानात उतरले आहेत त्यासाठी मुख्यमंत्र्यांनी प्रथम त्यांचे आभारही मानले. या वेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख उपस्थित होते. या ऑनलाइन परिषदेसाठी २१,५०० डॉक्टर्सनी नोंदणी केली होती.

## उपचारासाठी निधी कमी पडू देणार नाही

राज्यातील कोरोना संसर्गाची साखळी तोडण्यासाठी कोरोनाबाधित रुग्णांच्या गृहविलगीकरणाऐवजी संस्थात्मक विलगीकरणावर भर देताना कोरोनाबाधितांच्या संपर्कात असणाऱ्या हाय-रिस्क, लो-रिस्क व्यक्तींच्या कोरोना चाचणीवर भर द्यावा. महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत म्युकरमायकोसिस आजारावर मोफत उपचार करणाऱ्या १३१ रुग्णालयांची यादी प्रसिद्ध करावी. कोरोना लढ्याला बळ देण्यासाठी १५व्या वित्त आयोगातील २५ टक्के निधी तसेच गौण खनिज निधीतील रक्कम आरोग्यावरील खर्चासाठी मंजुरी देत राज्यातील रुग्णालयांचे ऑक्सिजन, इलेक्ट्रिक, फायर ऑडिट तातडीने करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.



**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली कोरोनासह म्युकरमायकोसिसच्या राज्यातील परिस्थितीसह उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी आरोग्यमंत्री राजेश टोपे, अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, मुख्य सचिव सीताराम कुंटे उपस्थित होते.

## दरडग्रस्त गावांचे होणार पुनर्वसन

राज्यातील कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यांना चक्रीवादळासह नैसर्गिक आपत्तीचा वारंवार सामना करावा लागतो. या आपत्तीत कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यात जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी आवश्यक ठिकाणी बहुउद्देशीय निवारा केंद्रे, भूमिगत वीज वाहिन्या, धूपप्रतिबंधक बंधारे, लाईटनिंग अरेस्टर उभारण्यात येणार आहेत. यासाठी कोकण किनारपट्टीवरील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबतचे परिपूर्ण प्रस्ताव तातडीने सादर करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. तसेच या भागातील दरडग्रस्त गावांच्या पुनर्वसनांची कामे मार्गी लावण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती सभागृहात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली कोकण किनाऱ्यावर आदळणाऱ्या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबतच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते.

## कोरोना रोखण्यासाठी सामूहिक प्रयत्न हवेत

राज्यातील कोरोना रुग्णवाढ लवकरात लवकर आटोक्यात आणण्यासाठी उपाययोजनांची कठोर अंमलबजावणी तसेच सामूहिक प्रयत्न करण्याची गरज असल्याचे मत महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले. टाळेबंदी असूनही राज्यातील १५ जिल्ह्यांमध्ये कोरोनाची साथ आटोक्यात येत नसल्याच्या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री श्री. थोरात यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे ही बैठक झाली. या वेळी त्यांनी राज्यातील कोरोनास्थितीचा आढावा घेतला. बैठकीस आरोग्यमंत्री राजेश टोपे, वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री अमित देशमुख आदी या वेळी उपस्थित होते.



**बाळासाहेब थोरात**
महसूल मंत्री

राज्यातील बुलडाणा, कोल्हापूर, रत्नागिरी, सांगली, यवतमाळ, अमरावती, सिंधुदुर्ग, सोलापूर, अकोला, सातारा, वाशिम, बीड, गडचिरोली, अहमदनगर, उस्मानाबाद या १५ जिल्ह्यांमध्ये अजूनही मृत्युदर अधिक असून तो कसा कमी करता येईल, याबाबत तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना या वेळी देण्यात आले.

## लेंडी प्रकल्पग्रस्तांचे होणार स्वेच्छा पुनर्वसन!

लेंडी प्रकल्पग्रस्तांच्या स्वेच्छा पुनर्वसनाच्या प्रमुख मागणीला मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी तत्त्वतः मान्यता दिली आहे. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अशोक चव्हाण यांनी या संदर्भात आयोजित केलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे मागील दहा वर्षांपासून रखडलेला मराठवाड्यातील महत्त्वपूर्ण आंतरराज्यीय लेंडी प्रकल्पाला पुन्हा चालना मिळणार आहे.



**अशोक चव्हाण**
सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

बैठकीअंती मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी समितीच्या महत्त्वपूर्ण स्वेच्छा पुनर्वसनाच्या मागणीला तत्त्वतः मान्यता दिली. या निर्णयानुसार स्वेच्छा पुनर्वसनामध्ये शेतकरी कुटुंब, बिगर शेतकरी कुटुंबांसह वाढीव कुटुंबांचाही समावेश केला जाईल. या स्वेच्छा पुनर्वसनासाठी अंदाजित खर्च सुमारे १६९.७७ कोटी रुपये आहे. ज्या दिवशी याबाबत शासनाचा आदेश जारी होईल, त्या तारखेपर्यंतच्या वाढीव कुटुंबांना स्वेच्छा पुनर्वसनासाठी पात्र धरण्याची मागणी अशोक चव्हाण यांनी या प्रसंगी केली व विजय वडेट्टीवार यांनी ही मागणीसुद्धा मान्य केली आहे.

## कायदेतज्ज्ञांची समिती

सामाजिक व शैक्षणिक मागास (एसईबीसी) प्रवर्गाच्या प्रलंबित नोकर भरती प्रक्रियेचा मुख्य सचिव संबंधित विभागाच्या सचिवांकडून आढावा घेणार असून, मराठा आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची समीक्षा करण्यासाठी सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी जाहीर केले आहे. सह्याद्री अतिथिगृहात झालेल्या मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली.

## मंत्रिमंडळ उपसमितीने घेतला आढावा

राज्य शासनाने मराठा समाजासाठी घेतलेल्या विविध निर्णयांच्या अंमलबजावणीचा मराठा आरक्षणविषयक उपसमितीने आढावा घेतला. सर्वोच्च न्यायालयातील खटल्याच्या पार्श्वभूमीवर शासकीय नोकर भरतीमध्ये प्रभावित झालेल्या उमेदवारांना न्याय मिळावा, यासाठी तातडीने मंत्रिमंडळ बैठकीसमोर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्य सचिवांना दिल्याचे उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी सांगितले.

मराठा आरक्षण विषयक उपसमितीची सह्याद्री अतिथिगृहात आढावा बैठक श्री. चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी समितीचे सदस्य तथा गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे, बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार, मुख्य सचिव सीताराम कुंटे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

या वेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता, मराठा आरक्षण आंदोलनात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत तसेच त्यांच्या वारसांना नोकरी देणे, आंदोलकावरील गुन्हे मागे घेणे, मराठा आरक्षणामुळे रखडलेल्या नोकर भरती प्रक्रियेतील उमेदवारांना न्याय देणे आदी विषयांवर चर्चा झाली.

## नागपूर हज हाऊसमध्ये कोविड सेंटर

राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य हज समितीच्या अखत्यारीत असलेल्या नागपूर येथील हज हाऊसच्या इमारतीमध्ये कोविड सेंटर सुरू करण्यात येत असल्याची माहिती अल्पसंख्याक विकास मंत्री नवाब मलिक यांनी दिली. यासाठी नागपूर हज हाऊसचा ताबा तेथील जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवण्यासंदर्भात सूचना निर्गमित करण्यात आल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास प्रशिक्षण

साथीच्या रोगाशी संबंधित उद्‌भवलेल्या परिस्थितीत आरोग्य व वैद्यकीय क्षेत्राला कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी राज्यातील आरोग्य क्षेत्रात काम करण्यास इच्छुक असलेल्या युवक-युवतींना हेल्थकेअर, मेडिकल, नर्सिंग व डोमेस्टिक हेल्थकेअर वर्कर क्षेत्रामध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत 'मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम' राबवण्यात येणार असून, यामधून २० हजार युवक-युवतींना प्रशिक्षण दिले जाईल, अशी माहिती कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मंत्री नवाब मलिक यांनी दिली. या संदर्भातील सविस्तर शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.



**नवाब मलिक**
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री

## अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये विनाशुल्क प्रवेश

अल्पसंख्याक मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन, जैन, शीख, पारसी व ज्यू समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींना वसतिगृहामध्ये विनाशुल्क प्रवेश घेण्यासाठी आता या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा आठ लाख रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती अल्पसंख्याक विकास मंत्री नवाब मलिक यांनी दिली. या विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये पुरवण्यात येणाऱ्या खोलीभाडे, पाणी, वीज इत्यादी सुविधांचे शुल्क पूर्णपणे माफ असेल, असे त्यांनी सांगितले.

या संदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. राज्याच्या विविध भागात अल्पसंख्याक विकास विभागाची सध्या मुलींची २३ वसतिगृहे आहेत. मुलांची काही वसतिगृहे सुरू होत आहेत. या वसतिगृहांची माहिती अल्पसंख्याक विकास विभागाच्या https://mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## पदभरतीला मान्यता

कोरोना रुग्णांची वाढती संख्या आणि त्यामुळे आरोग्य यंत्रणेवर पडणारा ताण लक्षात घेऊन आरोग्य विभागातील १०० टक्के पदभरतीला मान्यता मिळाल्याचे सांगतानाच विविध संवर्गातील १६ हजार पदे तातडीने भरण्यात येतील, असे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री राजेश टोपे यांनी सांगितले.

या संदर्भात माहिती देताना आरोग्यमंत्री श्री. टोपे म्हणाले, राज्यात दिवसेंदिवस कोरोना रुग्णांची संख्या वाढत आहे. त्याचबरोबर तिसऱ्या लाटेबाबत वर्तवलेल्या अंदाजामुळे रुग्णसेवेसाठी अधिक मनुष्यबळाची गरज आहे. सध्या रुग्णसेवेशी निगडित ५० टक्के पदभरतीला मान्यता होती. मात्र वाढत असलेले कोरोनाचे रुग्ण पाहता १०० टक्के पदभरतीला मान्यता देण्याबाबत आग्रहपूर्वक मागणी मंत्रिमंडळाच्या बैठकीत करण्यात आली. त्याला मान्यता देतानाच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि आरोग्यमंत्री यांच्या स्तरावर पदभरतीचा निर्णय घेण्याला मंजुरी देण्यात आल्याचे श्री. टोपे यांनी सांगितले.



**राजेश टोपे**
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

## हवेतून ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प

ऑक्सिजनच्या तुटवड्यावर मात करण्यासाठी राज्य शासनामार्फत प्रयत्न केले जात आहेत. राज्यात जिल्हा रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, खासगी रुग्णालये या ठिकाणी हवेतून ऑक्सिजन शोषून तो रुग्णांना देणारी प्रणाली (पीएसए) बसवण्यात येत आहे. आतापर्यंत सुमारे ३८ पीएसए प्लान्ट कार्यान्वित झाले असून त्याद्वारे दिवसाला सुमारे ५३ मेट्रिक टन ऑक्सिजन निर्मिती होत आहे, अशी माहिती आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली.

राज्यात कार्यान्वित झालेले हे ३८ पीएसए प्रकल्प बुलडाणा, वाशिम, बीड, लोखंडी सावरगाव, हिंगोली, जालना, नांदेड, उस्मानाबाद, सिंधुदुर्ग, मुंबई, अलिबाग, रत्नागिरी, गोंदिया, अहमदनगर, शिरपूर, भुसावळ, नंदूरबार, शहादा, सातारा, पुणे, बुलडाणा-चिखली, खामगाव येथील जिल्हा रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय, खासगी रुग्णालय या ठिकाणी उभारण्यात आले आहेत.

## महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेत म्युकरमायकोसिसवरील उपचाराचा समावेश

राज्यात म्युकरमायकोसिस या आजाराची तीव्रता वाढत असून त्यासाठी बहुआयामी विशेषज्ञ सेवांची गरज भासत आहे. त्यासाठी लागणारा खर्च जास्त असून सामान्य रुग्णांवर त्याचा भार पडून नये, यासाठी महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत राज्यातील सर्व पात्र नागरिकांवर अंगीकृत रुग्णालयांमध्ये म्युकरमायकोसिस आजारावर उपचार करण्यात येतील. या संदर्भात शासन निर्णय जाहीर करण्यात आल्याची माहिती आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली. ही योजना ३० सप्टेंबर २०२१ पर्यंत अमलात राहील. त्यानंतर आढावा घेऊन मुदतवाढीचा निर्णय घेण्यात येईल, असेही आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.

## नोंदणीकृत बांधकाम कामगारांना अर्थसाहाय्य

राज्यात कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी लावण्यात आलेल्या कडक निर्बंधाच्या पार्श्वभूमीवर या काळात महाराष्ट्रातील बांधकाम कामगारांना आर्थिक साहाय्य देण्याचा निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतला आहे. या निर्णयानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदीत सक्रिय १३ लाख बांधकाम कामगारांना दीड हजार रुपयांचे अर्थसहाय्य त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट हस्तांतरण पद्धतीने (डीबीटी) जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यानुसार २ मे २०२१ पर्यंत ११ लाख १० हजार ९२९ नोंदणीकृत बांधकाम कामगारांना अर्थसाहाय्य करण्यात आले आहे. अशी माहिती कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली आहे.



**हसन मुश्रीफ**
ग्रामविकास, कामगार मंत्री

## घरेलू कामगारांना अर्थसाहाय्य

महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाकडे नोंदणी व नूतनीकरण झालेल्या घरेलू कामगारांसाठी पहिल्या टप्प्यात सक्रिय व जीवित नोंदणीकृत एकूण १ लाख ५ हजार ५०० घरेलू कामगारांना प्रत्येकी दीड हजार रुपयांप्रमाणे एकूण १५ कोटी ८२ लाख ५० हजार रुपये इतका निधी वितरित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे, अशी माहिती कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

या निर्णयानुसार महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाकडे नोंदणी व नूतनीकरण झालेल्या १ लाख ५ हजार ५०० घरेलू कामगारांच्या बँक खात्यामध्ये थेट हस्तांतरण (डीबीटी)द्वारे प्रत्येकी दीड हजार रुपये वितरित करण्याची कार्यवाही विकास आयुक्त (असंघटित कामगार) यांच्या स्तरावरून लवकरच करण्यात येत आहे. घरेलू कामगारांच्या थेट खात्यात शासनातर्फे मिळणारा हा निधी जमा होणार असल्याने घरेलू कामगारांना मोठा दिलासा मिळणार असल्याचेही कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

## कृषिपंप जोडणीसाठी धोरणामध्ये बदल करणार

वीज पुरवठा करणाऱ्या रोहित्र वा अन्य केंद्रांपासून ६०० मीटरपेक्षा दूर असलेल्या कृषी ग्राहकांनाही नवीन कृषिपंप वीज जोडणी धोरणातील तरतुदी, कुसुम योजना आणि वीज कायदा २००३ मधील तरतुदी लक्षात घेऊन वीज जोडणी देण्यासाठी धोरणात्मक बदल करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी सांगितले. कृषिपंप धोरणाच्या अंमलबजावणीचा त्यांनी मंत्रालयातील एका बैठकीत आढावा घेतला. त्या वेळी ते बोलत होते.



**डॉ. नितीन राऊत**
ऊर्जा मंत्री

विद्यमान कृषी धोरणात ६०० मीटरपर्यंतच्या कृषी ग्राहकांना कृषिपंप जोडणी देण्याची तरतूद आहे. मात्र त्यापेक्षाही दूर अंतरावर असलेल्या ग्राहकांना अन्य योजनांमधून वीजजोडणी देणे शक्य असेल तर त्या ग्राहकांना कृषिपंप जोडणी दिल्यास राज्य सरकारवर जोडणीच्या खर्चाचा भार पडणार नाही, असे मतही त्यांनी नोंदवले.

## अंतर्गत मूल्यमापनातून दहावीचे विद्यार्थी होणार उत्तीर्ण

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये दहावी परीक्षेसाठी प्रविष्ट असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे सरसकट उत्तीर्ण करण्यात येणार आहे. दहावीचा निकाल जून अखेरीस लावण्याचे नियोजन असून अकरावी प्रवेशासाठी वैकल्पिक सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) घेण्यात येईल, ही प्रवेश परीक्षा राज्य मंडळाच्या दहावीच्या अभ्यासक्रमावर आधारित असेल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी दिली आहे.



**प्रा. वर्षा गायकवाड**
शालेय शिक्षण मंत्री

मंडळामार्फत जून २०२१ अखेर निकाल घोषित करण्याचे नियोजन आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांची मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वेळापत्रक मंडळामार्फत लवकरच जाहीर करण्यात येईल. सर्व शाळांनी या वेळापत्रकाचे तंतोतंत पालन करावे. असे आवाहन प्रा. गायकवाड यांनी केले आहे.

यासंदर्भात माहिती देताना मंत्री प्रा. गायकवाड म्हणाल्या, कोरोनामुळे उद्भवलेल्या असामान्य परिस्थितीत सर्वसमावेशक असे धोरण तयार करताना विभागातील तज्ज्ञ, मुख्याध्यापक, शिक्षक, लोकप्रतिनिधी, पालक संघटना, तंत्रज्ञान कंपन्या यांच्याशी सुमारे २४ बैठकांद्वारे चर्चा केली आहे. सर्व घटकांशी सखोल चर्चा करून इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना गुणदान करण्याबाबतचे धोरण निश्चित केले आहे. सदर मूल्यमापन धोरणानुसार विद्यार्थ्यांचे प्रत्येक विषयाचे १०० गुणांचे मूल्यमापन करण्यात येईल.

## म्हाडाच्या सदनिका हस्तांतरित

मानवतेच्या दृष्टिकोनातून मुंबई शहरात कर्करोगग्रस्त रुग्णांच्या नातेवाईकांची व काळजीवाहू व्यक्तींच्या निवासाची सोय व्हावी, या उद्देशाने महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (म्हाडा) उपलब्ध करून दिलेल्या १०० सदनिकांच्या चाव्या ज्येष्ठ नेते व खासदार शरद पवार यांच्या हस्ते टाटा मेमोरियल रूग्णालयाला सुपुर्द करण्यात आल्या.



**जितेंद्र आव्हाड**
गृहनिर्माण मंत्री

खा. शरद पवार यांच्या निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमाला गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव एस. व्ही. आर. श्रीनिवास, 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल डिग्गीकर, टाटा मेमोरिअल सेंटरचे संचालक डॉ. राजेंद्र बडवे, टाटा मेमोरियल रुग्णालयाचे उपसंचालक डॉ. शैलेश श्रीखंडे आदी उपस्थित होते.

## खेलो इंडिया सेंटर स्थापन करणार

राज्यात ३६ जिल्ह्यांमध्ये खेलो इंडिया सेंटर (केआयसी) सुरू करण्यात येणार असल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांनी दिली. नुकतेच श्री.केदार यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय क्रीडा मंत्री किरेन रिजिजू यांची भेटू घेऊन महाराष्ट्रातील क्रीडा धोरण व आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाबाबत चर्चा केली होती.



**सुनील केदार**
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री

देशभरात तळागाळांतील क्रीडा पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी राज्य सरकारच्या सहकार्याने क्रीडा मंत्रालयामार्फत खेलो इंडिया सेंटर्स सुरू करण्यात येत आहेत, त्यानुसार देशातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक खेलो इंडिया सेंटर मान्य करण्यात येणार आहे, सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये १००० खेलो इंडिया सेंटर उघडण्याच्या क्रीडा मंत्रालयाच्या या मोठ्या योजनेत महाराष्ट्रामध्ये सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये खेलो इंडिया सेंटर स्थापित करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी केंद्र शासनाकडून ३.६० कोटी रुपये इतके अर्थसाहाय्य प्राप्त होणार आहे, अशी माहिती श्री. केदार यांनी दिली.

## उपाययोजनांसाठी निधी

कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांसाठी विभागीय आयुक्तांना १४१ कोटी ६४ लाख २१ हजार रुपये निधी वितरित करण्यात आला असल्याची माहिती मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली.

कोविड १९ प्रादुर्भाव रोखण्यासाठी विभागीय आयुक्त कोकण, पुणे, नाशिक व औरंगाबाद यांनी ३१ मार्च २०२१ पूर्वी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीची मानके व बाबीनुसार केलेला खर्च भागवण्यासाठी विभागीय आयुक्त कोकण, पुणे, नाशिक व औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त झालेल्या शिफारशी व राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या बाबीविचारात घेऊन राज्य कार्यकारी समितीने २७ एप्रिल २०२१ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विभागीय आयुक्तांना १४१,६४,२१,०००/- रुपये (रुपये एकशे एकेचाळीस कोटी चौसष्ट लाख एकवीस हजार रुपये) इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामध्ये विभागीय आयुक्त कोकणसाठी ७३१९.९७ लाख रुपये, विभागीय आयुक्त पुणेसाठी ५५७३.८५ लाख रुपये, विभागीय आयुक्त नाशिकसाठी २४५.२० लाख रुपये आणि विभागीय आयुक्त औरंगाबादसाठी १०२५.१९ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत, अशी माहिती श्री. वडेट्टीवार यांनी दिली.



**विजय वडेट्टीवार**
आपत्ती व्यवस्थापन,
मदत व पुनर्वसन मंत्री

## कलाकारांना शासनाकडून सर्वतोपरी मदत

कोरोना काळात आर्थिक संकटात सापडलेल्या राज्यातील कलावंतांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे असून, कलाकारांना शासनाकडून सर्वतोपरी मदत करण्यात येईल. त्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाने ताबडतोब प्रस्ताव सादर करावेत, अशा सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी दिल्या. सांस्कृतिक कार्य विभागातील अधिकाऱ्यांच्या, दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित बैठकीत ते बोलत होते.



**अमित देशमुख**
वैद्यकीय शिक्षण,
सांस्कृतिक कार्य मंत्री

## शासकीय परिचर्या महाविद्यालय

परिचारिकांची वाढती आवश्यकता लक्षात घेता राज्य शासनाने नांदेड येथे शासकीय परिचर्या महाविद्यालय अर्थात 'नर्सिंग कॉलेज' मंजूर केले आहे. येत्या शैक्षणिक वर्षांपासून हे महाविद्यालय सुरू करण्याबाबतची तयारी करण्यात यावी, असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी दिले.

डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय आणि शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयात संदर्भातील बैठक ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात आली होती.

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयात ५० प्रवेश क्षमतेचा बीएससी परिचर्या अभ्यासक्रम सुरू होणार असून संबंधित अधिष्ठाता यांनी याबाबतची कार्यवाही पूर्ण करावी. या महाविद्यालयास आवश्यक प्राचार्य आणि व्याख्याते यांच्यासह आवश्यक मनुष्यबळ देण्यात यावे, असे श्री. देशमुख यांनी सांगितले.

## लहान मुलांसाठी विशेष कक्ष

कोविड -१९ संसर्गाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेत लहान मुलांमध्ये कोविड प्रादुर्भाव होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. त्यामुळेच खबरदारी म्हणून राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील बालरोगशास्त्र विभागाने कोविड उपचारांकरिता लहान मुलांसाठी विशेष कक्ष तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या सोयी-सुविधा निर्माण करण्याबाबतची माहिती त्वरित पाठवावी, असे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी दिले.

मंत्री श्री. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली कोविड-१९ च्या संभाव्य तिसऱ्या लाटेबाबत अनुषंगिक उपाययोजना करण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील बालरोग शास्त्र विभागातील प्राध्यापक व विभागप्रमुख यांच्यासमवेत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ऑनलाइन बैठक आयोजित करण्यात आली होती.

## अभय योजना

स्थानिक स्वराज्य संस्थांकडील थकबाकी वसुलीसाठी पाणीपट्टीवरील विलंब आकार, कर्जावरील दंडनीय व्याज तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ग्राहकांकरिता व्याज माफीच्या सवलतीची अभय योजना राबवण्यास पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४८ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली.



**गुलाबराव पाटील**
पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नागरी, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, डोंगराळ/पर्यटन क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना व पेरी अर्बन योजनांमधून होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या दराचा आढावा या बैठकीत घेण्यात आला तसेच सुधारित दरांना मंजुरी देण्यात आली.

## स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजना

उन्हाळ्यातील ३ ते ४ महिने आणि अन्य कारणांमुळे काही विशिष्ट कालावधीत पाण्याचे दुर्भिक्ष जाणवणाऱ्या राज्यातील गावे/वाड्या-वस्त्या यांच्यासाठी पाण्याची साठवणूक करून पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या कालावधीमध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी 'स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजना' या नावाने सर्वसमावेशक योजना राबवण्यात येणार आहे अशी माहिती, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली.

## भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या स्थापनेला १६ जुलै २०२१ रोजी ५० वर्षे पूर्ण होत असून या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली.

## 'मोहफूल – आदिवासी उपजीविकेचे एक साधन' प्रकल्प

गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबाचे राहणीमान व जीवनमान उंचावण्यासाठी मानव विकास कार्यक्रमांतर्गत 'मोहफूल - आदिवासी उपजीविकेचे एक साधन' हा प्रकल्प राबवण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील वन धन केंद्रामार्फत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ हा प्रकल्प राबवणार आहे. आदिवासी कुटुंबाचे सशक्तीकरण व्हावे आणि ते आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे यासाठी हा प्रकल्प राबवण्यासाठी आदिवासी विकास मंत्री ॲड. के.सी. पाडवी यांनी पाठपुरावा केला होता.



**ॲड. के. सी. पाडवी**
आदिवासी विकास मंत्री

## अनाथ झालेल्या बालकांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न

कोरोना कालावधीत माता-पिता बळी पडल्यामुळे अनाथ झालेल्या बालकांच्या पुनर्वसनासाठीचे प्रयत्न गतिमान करावेत, यासाठी अशा संकटग्रस्त बालकांपर्यंत पोहोचण्याची यंत्रणा प्रभावी करावी; घरगुती हिंसाचार आणि कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या महिलांना न्याय मिळवून देणे तसेच अशा घटनांना प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना कराव्यात; संकटग्रस्त महिला व बालकांना समुपदेशन उपलब्ध करून द्यावे, आदी निर्देश महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिले. राज्यातील सर्व महसुली विभागांची विभागनिहाय आढावा बैठक मंत्री ॲड. ठाकूर यांनी दुरदृश्य प्रणालीद्वारे घेतली.



**ॲड. यशोमती ठाकूर**
महिला व बालविकास मंत्री

## दिव्यांग व्यक्तींसाठी दिलासादायक निर्णय

दिव्यांग व्यक्तींना कोरोना तपासणी, लसीकरण तसेच आवश्यक असल्यास उपचार यासाठी तिष्ठत उभे राहावे लागू नये; तसेच कोरोनाचा संभाव्य धोका कमी व्हावा, यासाठी या सर्व ठिकाणी त्यांना रांगेत उभे न राहता प्राधान्य दिले जावे, असा निर्णय सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांच्या निर्देशानुसार घेण्यात आला आहे.



**धनंजय मुंडे**
सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री

राज्य शासनाच्या सेवेतील दिव्यांग अधिकारी-कर्मचाऱ्यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट देण्याचा तसेच 'वर्क फ्रॉम होम'ची मुभा देण्याचा निर्णयही श्री. मुंडे यांच्या निर्देशानुसार घेण्यात आला आहे.

## पर्जन्य जलसंकलनाच्या कामाची पाहणी

छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे सुरू असलेल्या पर्जन्य जलसंकलनाच्या (रेनवॉटर हार्वेस्टिंग) कामाची पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी पाहणी केली.

येथे ३५ भूमिगत विहिरी तयार करण्याचे आणि पाईपलाईनचे काम सुरू आहे. त्यामुळे पावसाळ्यात फारसे पाणी साचणार नाही. तसेच मैदानाच्या देखभालीसाठी लागणारी पाण्याची गरज भागेल व धूळ कमी होऊन मैदान परिसर हिरवागार राखण्यासाठीही याचा फायदा होणार आहे. तसेच चैत्यभूमीजवळ पावसाळी पाण्यासाठी असलेल्या आऊटफॉल पॉईंटच्या जागेला अर्बन स्पेसमध्ये रूपांतरित करण्याचे काम सुरू आहे. या कामाचीही मंत्री श्री. ठाकरे यांनी पाहणी केली.



**आदित्य ठाकरे**
पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री

दरवर्षी लाखो नागरिक या स्थळाला भेट देतात. त्यांना सुंदर जागा उपलब्ध व्हावी असा प्रयत्न आहे, असे मंत्री श्री. ठाकरे यांनी सांगितले.

**टीम लोकराज्य**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील महत्त्वपूर्ण निर्णयांचा आढावा..

# मंत्रिमंडळात ठरले !

## तौक्ते चक्रीवादळग्रस्तांना मदत



राज्यामध्ये तौक्ते चक्रीवादळामुळे बाधित झालेल्या आपदग्रस्तांना वाढीव दराने मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्र शासनाने विहित केलेल्या दरापेक्षा अधिक दराने मदत देण्यात येणार असल्यामुळे वाढीव दरामुळे पडणारा आर्थिक भार राज्य शासनाच्या निधीमधून करण्यास मान्यता देण्यात आली. ही मदत खालीलप्रमाणे देण्यात येईल.

नैसर्गिक आपत्तीमध्ये घरे पूर्णतः क्षतिग्रस्त झाले असल्यास किंवा अंशतः पडझड झालेल्या (किमान १५% नुकसान) कच्च्या व पक्क्या घरांपैकी ज्या घरांचे छत क्षतिग्रस्त झाल्याने अथवा पत्रे/कौले/छत उडून गेल्याने घरातील कपडे व घरगुती भाड्यांचे/वस्तुंचे नुकसान झाले आहे, अशा प्रकरणी कपडे तसेच घरगुती भांडी/वस्तूंकरिता अर्थसाहाय्य प्रतिकुटुंब ५००० रुपये, कपड्यांच्या नुकसानीसाठी आणि प्रतिकुटुंब ५००० रुपये घरगुती भांडी/वस्तू नुकसानीसाठी. पूर्णतः नष्ट झालेल्या झालेल्या पक्क्या व कच्च्या घरांसाठी मदत १,५०,००० रुपये प्रति घर आणि अंशतः पडझड झालेल्या (किमान १५ टक्के) पक्क्या/कच्च्या घरांसाठी मदत १५,००० रुपये प्रतिघर तसेच अंशतः पडझड झालेल्या (किमान २५ टक्के) पक्क्या/कच्च्या घरांसाठी मदत २५,००० रुपये प्रतिघर आणि अंशतः पडझड झालेल्या (किमान ५० टक्के) पक्क्या/कच्च्या घरांसाठी मदत ५०,००० रुपये प्रतिघर. नष्ट झालेल्या झोपडीपैकी झोपडपट्टी पुनर्वसनासाठी पात्र असलेल्या झोपड्यांना मदत १५,००० रुपये प्रतिझोपडी अशी मदत देण्यात येईल.

**बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी मदत -** बहुवार्षिक पिके- ५०,००० रुपये प्रतिहेक्टर. नारळ झाडासाठी - २५० रुपये प्रतिझाड, सुपारी झाडासाठी - ५० रुपये प्रतिझाड, २ हेक्टरच्या मर्यादेत.

**दुकानदार व टपरीधारक -** जे स्थानिक रहिवाशी आहेत, ज्यांचे नाव स्थानिक मतदार यादीत आहे व जे रेशनकार्डधारक आहेत त्यांना पंचनाम्याच्या आधारे प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त १०,००० रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्यात येईल.

**मत्स्यव्यावसायिकांचे नुकसान -** बोटींची अंशतः दुरुस्ती १०,००० रुपये, पूर्णतः नष्ट झालेल्या बोटींसाठी २५,००० रुपये, अंशतः बाधित झालेल्या जाळ्यांच्या दुरुस्तीसाठी



५००० रुपये, पूर्णतः नष्ट झालेल्या जाळ्यांसाठी ५००० रुपये. आपत्तिप्रसंगी शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली अनुदान/मदत घेतली असल्यास वरील मदत अनुज्ञेय असणार नाही.

पूर्वी रोजगार हमी योजनेखाली जशी फळबाग योजना लागू होती त्याच धर्तीवर सचिव, जलसंधारण व रोजगार हमी योजना यांनी योजना कार्यान्वित करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. नुकसान झालेल्या कुक्कुटपालन शेडसाठी प्रत्यक्ष नुकसानीची रक्कम किंवा जास्तीत जास्त ५००० रुपये इतकी मदत देण्यात येईल. चक्रीवादळामुळे बाधित झालेल्या कुटुंबांना २६ ऑगस्ट २०२० च्या शासन निर्णयान्वये मोफत अन्नधान्य व केरोसीन वाटप करण्यास मान्यता देण्यात आली. तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या मृत्यूसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून ४ लक्ष रुपये इतक्या रकमेसोबतच मुख्यमंत्री साहाय्यता निधीमधून अतिरिक्त १ लक्ष रुपये इतकी मदत देण्यात येईल.

## दारूबंदी उठवण्याचा निर्णय

चंद्रपूर जिल्ह्यातील दारूबंदी उठवण्याचा निर्णय घेण्यात आला. १ एप्रिल २०१५ पासून दारूबंदी लागू केल्यानंतर मोठ्या प्रमाणावर जिल्ह्यात वाढलेले अवैध दारुचे प्रमाण, वाढलेली गुन्हेगारी याचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला. शासनाने १ एप्रिल २०१५ पासून संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात दारू विक्रीचे आणि दारू पिण्याचे परवाने रद्द करून संपूर्ण जिल्ह्यात दारूबंदी लागू केली होती. या दारूबंदीच्या अनुषंगाने जुलै २०१८ मध्ये विधानसभेमध्ये झालेल्या चर्चेच्या वेळी तत्कालिन राज्य उत्पादन शुल्कमंत्र्यांनी समिती नेमण्याबाबत आश्वासन दिले होते. त्या अनुषंगाने सेवानिवृत्त माजी प्रधान सचिव रमानाथ झा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून तिचा अहवाल ९ मार्च २०२१ रोजी शासनास सादर करण्यात आला.

## दारूबंदी उठवण्यामागील प्रमुख कारणे

झा समितीने काढलेल्या निष्कर्षाप्रमाणे दारूबंदीची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणावर अपयशी ठरली असून, जिल्ह्यात अवैध हातभट्टी दारू आणि बनावट दारू काळ्या बाजारात उपलब्ध होत आहे. ही दारू अतिशय घातक आहे. यातून दारूचा काळाबाजारदेखील वाढला आहे. शासनाचे वैध दारू विक्रीमधून मिळणाऱ्या महसूलाचे मोठे नुकसान झाले आहे व गुन्हेगारी क्षेत्रातील खासगी व्यक्तींचा प्रचंड आर्थिक फायदा झाला आहे. बेकायदेशीर दारू व्यापारात

### ऑक्सिजन उत्पादनाचे उद्दिष्ट

राज्यात ३ हजार मेट्रिक टन ऑक्सिजन उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, महाराष्ट्र मिशन ऑक्सिजन स्वावलंबनअंतर्गत उद्योग घटकांना विशेष प्रोत्साहन मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सद्य:स्थितीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारत देश कोरोना-१९ महामारीच्या दुसऱ्या लाटेचा सामना करत आहे. त्यातच आगामी चार-पाच महिन्यात कोरोना -१९ विषाणू प्रादुर्भावाची तिसरी लाट येणार असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. वाढत्या कोरोना रुग्ण संख्येमुळे राज्यात मोठ्या प्रमाणात प्राणवायूचा (Liquid Medical Oxygen) (LMO) तुटवडा निर्माण



झाला आहे. राज्याची प्राणवायू निर्मितीची क्षमता सद्य:स्थितीत १३०० मे.टन/प्रतिदिन असताना १८०० मे.टन एवढ्या प्राणवायूची मागणी आहे. कोरोना-१९ प्रादुर्भावाच्या तिसऱ्या लाटेच्या शक्यतेमुळे ही मागणी २३०० मे.टन इतकी वाढण्याची शक्यता आहे.

याकरिता राज्यातील आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्याच्या अनुषंगाने तातडीने ऑक्सिजन निर्मिती व साठा वाढवणे, क्रिटिकल गॅप शोधून कार्यवाही करणे, लॉजिस्टिक ट्रान्सपोर्टवर उपाययोजना करणे, इत्यादी उपाययोजना करून राज्य ऑक्सिजन निर्मिती क्षेत्रात स्वावलंबी होण्यासाठी व आवश्यक ऑक्सिजन निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता, राज्यामध्ये मिशन ऑक्सिजन स्वावलंबनांतर्गत उद्योग घटकांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्याचा व याअनुषंगाने इतर उपाययोजना राज्यामध्ये निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

स्त्रिया आणि मुले यांच्या वाढत्या सहभागामुळे चिंता निर्माण करण्यासारखी परिस्थिती झाली आहे. तसेच, दारूबंदीच्या बाबतीत बहुसंख्य संघटना, नागरिक व रहिवाशांनी दारूबंदी मागे घेण्याच्या बाजूने कौल दिला आहे. या कारणांमुळे झा समितीने दारूबंदी उठवण्याबाबत निष्कर्ष काढला आहे.

### कायम प्रवास भत्ता

जिल्हा परिषदेतील ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांच्या कायम प्रवास भत्त्यात वाढ करून तो १५०० रुपये इतका करण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रामपंचायत स्तरावरील मूलभूत गरजा पुरवण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची असून त्यात महत्त्वाची भुमिका ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकाऱ्यांची आहे. त्यामुळे पंचायत समितीस्तरावर, जिल्हा परिषदस्तरावर, महसूल विभागात जिल्हाधिकारी कार्यालयात, विभागीय आयुक्त कार्यालयात ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांना बैठकांना हजर राहावे लागते. तसेच, ग्रामीणस्तरावर दिवाबत्ती, पाणीपुरवठा साहित्य, आरोग्य संबंधित साहित्य, वेगवेगळ्या योजनांचे बांधकाम साहित्य तसेच कर वसूली भरण्याकरिता तालूका स्तरावर जावे लागते.

बचतगटांच्या कर्जमंजुरीसाठी तालुका पातळीवर बँकांना भेटी द्याव्या लागतात. प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना घर बांधणीचे सामान उपलब्ध करून देण्यासाठी त्यांच्यासोबत फिरावे लागते. ग्रामपंचायत हद्दीत ग्रामपंचायतीमार्फत केल्या जाणाऱ्या कामाच्या पूर्ततेसाठी ग्रामसेवकांना फिरती करावी लागते. या सर्व मुद्द्यांचा विचार करता ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांना ठोक स्वरूपात दरमहा देण्यात येणाऱ्या ११०० रुपये या कायम प्रवास भत्त्याच्या रकमेत सुधारणा करणे गरजेचे होते.

### दिवा रेल्वे क्रॉसिंगवर पूल बांधण्यास मान्यता

ठाणे महानगरपालिका हद्दीतील दिवा रेल्वे स्टेशन परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात विकास झालेला असून या ठिकाणी रेल्वे क्रॉसिंगवर पूल बांधणे आवश्यक असल्याने पूल बांधकामासाठी मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या मंजूर फेरबदल प्रस्तावानुसार खेळाच्या मैदानाचे आरक्षण वगळून



त्यामधील काही क्षेत्र महापालिका प्राथमिक शाळा विस्ताराच्या आरक्षणात, भागशः क्षेत्र २० मीटर रुंद रस्ता व भागशः क्षेत्र पार्किंग या आरक्षणात समाविष्ट करण्यात आलेले आहे. खेळाच्या वगळण्यात आलेल्या क्षेत्राइतके आरक्षण त्याच प्रभागामध्ये इतरत्र देण्यासाठी ठाणे महानगरपालिकेस निर्देश देण्यात आले आहेत.

### अधिनियमात सुधारणा

नवीन अविभाज्य शर्तीने दिलेल्या इनाम व वतन (महार वतन व

देवस्थान जमीन वगळून) जमिनी ज्या भोगवटादार वर्ग-२ च्या आहेत त्यांच्यावरील अकृषिक बांधकामे गुंठेवारी कायद्यांतर्गत नियमित करण्यासाठी अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ या कायद्यांतर्गत इनाम व वतन जमिनींवरील विकास नियमित करताना प्रशमन शुल्क व विकास आकार या रक्कमेंबरोबरच सबंधित जमिनींच्या प्रचलित बाजार मूल्याच्या ७५ टक्के रक्कम शासनाकडे भरणा करावी लागत होती. अशा प्रकरणी जनतेला सवलत देण्याच्या दृष्टिकोनातून, प्रचलित बाजारमुल्याच्या ७५ टक्क्यांऐवजी २५ टक्के रक्कम आकारून व नियमित प्रशमन शुल्क आणि विकास आकार वसूल करून अशा जमिनीवरील गुंठेवारी विकासाला नियमित मंजुरी देण्यात आली आहे. त्याबाबतचा अध्यादेश लवकरच काढण्यात येईल.

## राष्ट्रीय औषधी वनस्पती संस्थेसाठी जमीन

आयुष मंत्रालयांतर्गत नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ मेडिसिनल प्लांट्स ही संस्था सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील मौ. अडाळी येथे स्थापन करण्याच्या केंद्र शासनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून, यासाठी ५० एकर जागा देण्यात येईल. या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. मौ.अडाळी येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची ५० एकर जागा ही संस्था स्थापन करण्यासाठी विनामूल्य नियमित अटी शर्तींवर कब्जा हक्काने केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालय, नवी दिल्ली यांना हस्तांतरित करण्यात येईल.



राज्यात राष्ट्रीय औषधी वनस्पती संस्थेच्या स्थापनेमुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि ही संस्था राज्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या फायदेशीर ठरेल. औषधी वनस्पतींशी संबंधित सर्व बाबींसाठी राष्ट्रीय औषधी वनस्पती संस्था एक स्टॉप सेंटर म्हणून विकसित केली जाईल आणि ते केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने/समन्वयाने कार्य करतील.

## अधिमूल्य वसूल करणार

नागरी जमीन कमाल धारणा व विनियमन निरसन अधिनियमाच्या पार्श्वभूमीवर एकरकमी दंडात्मक रक्कम तसेच अधिमूल्य रक्कम आकारण्याबाबत निर्णय घेण्यात आला. १ ऑगस्ट २०१९ शासन निर्णयाप्रमाणे निश्चित केलेल्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टिकोनातून योजनाधारकांकडून, कलम २० च्या आदेशामध्ये नमूद एकूण क्षेत्रासाठी प्रचिलित वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यामधील दराच्या ३ टक्के दराने येणारे अधिमूल्य दंडात्मक मुदतवाढीची रक्कम म्हणून एकरकमी आकारण्यास मान्यता देण्यात आली आहे.

वाणिज्य प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या जमिनीवरील इमारतीचा पुनर्विकासासाठी प्रचलित वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यामधील दराच्या ५ टक्के दराने अधिमूल्य तर जर सदर क्षेत्राचा वापर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार अन्य प्रयोजनार्थ करण्यात येणार असल्यास २० टक्के दराने येणारे अधिमूल्य एकरकमी आकारण्यात येणार आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील औद्योगिक घटकांना भाडेपट्ट्याने दिलेल्या व २० टक्के अन्वये औद्योगिक प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या जमिनींचा वापर केवळ औद्योगिक प्रयोजनासाठी हस्तांतरित केल्या जाणार असतील तर महामंडळाचे हस्तांतरण शुल्क आकारण्यात येईल. तथापि, शर्थीनुसार अन्य प्रयोजनार्थ वापर/हस्तांतरण होणार असेल, तर १५ टक्के अधिमूल्य वसूल करण्यात येईल.

शासनाच्या ५ टक्के स्वेच्छाधिकार कोट्यातून प्राप्त झालेल्या सदनिकांची मागणी शासकीय कार्यालयाकडून न झाल्यास अशा सदनिका जाहिरातीद्वारे वाटप करण्यासाठी म्हाडाकडे हस्तांतरित करण्यात येणार आहेत. तसेच नाजकधा कलम २० खालील योजना पूर्ण केलेले काही योजनाधारक ५ टक्के सदनिका हस्तांतरित न करता १० टक्के अधिमूल्याची रक्कम जमा करून घेण्याची मागणी करत असल्यास शासन निर्णय १ ऑगस्ट २०१९ मधील तरतुदीनुसार निश्चित होणारे अधिमूल्य किंवा ५ टक्के कोट्यातील शासनास हस्तांतरित करावयाच्या सदनिकांची चालू बाजारभावाने होणारी किंमत यापैकी महत्तम रक्कम अधिमूल्य म्हणून वसूल करण्यात येईल.

## मेट्रो प्रकल्पाच्या जागेसंदर्भातील अटी शिथिल

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो प्रकल्पासाठी प्रदान केलेल्या मौजे बालेवाडी येथील जागेसंदर्भातील शासन ज्ञापनातील अटी शिथिल करण्यास मान्यता देण्यात आली. हा मेट्रो प्रकल्प सार्वजनिक-खासगी सहभागाने संकल्पन करा, बांधा, आर्थिक पुरवठा करा, वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर विकसित करण्यात येत आहे. निविदेतील अटी/शर्तीनुसार सदर जमीन सवलतदारास सवलत कालावधीकरिता व्यावसायिक वापरांतर्गत त्रयस्थ हितसंबंध निर्माण करण्यास तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी प्रदान केलेल्या जागेचा वापर तीन वर्षाच्या आत सुरू करण्याबाबतची अटही शिथिल करण्यास मान्यता देण्यात आली.

## सुधारित खरेदी दरास मान्यता

जिल्हास्तरावरून राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांमध्ये बदल करून आता शेळी आणि मेंढी यांच्या सुधारित खरेदी दरास मान्यता देण्यात आली. यापूर्वीचे शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येऊन या योजना नवीन स्वरूपात राबवण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सद्य:स्थितीतील योजनांमधील शेळी/मेंढी वाडा, खाद्याची व पाण्याची भांडी, आरोग्य सुविधा आणि औषधोपचार या उपघटकांना वगळण्यास मान्यता देण्यात आली.



शेळी - उस्मानाबादी / संगमनेरी ८,००० रुपये, शेळी- बेरारी, कोकणकन्या व स्थानिक जाती ६,००० रुपये, बोकड- उस्मानाबादी / संगमनेरी १०,००० रुपये, बोकड- बेरारी, कोकणकन्या व स्थानिक जाती ८,००० रुपये, मेंढी- माडग्याळ १०,००० रुपये, मेंढी- दख्खनी व स्थानिक जाती ८,००० रुपये, नर मेंढा-माडग्याळ १२,००० रुपये, नर मेंढा-दख्खनी व स्थानिक जाती १०,००० रुपये असे शेळीमेंढ्यांचे सुधारित दर राहतील.

## विशेष अनुदान मंजूर

कोरोना महामारीची स्थिती लक्षात घेऊन तसेच अवकाळी पावसामुळे धानाची नासाडी होऊ नये म्हणून एकवेळची विशेष बाब म्हणून धानाच्या भरडाईकरिता अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. एकूण २४४ कोटी रुपये इतक्या रकमेच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

## अधिनियमात सुधारणा

कोविड परिस्थितीमुळे सहकारी संस्थांचे सदस्य मतदानाच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित राहू नये म्हणून अधिनियमात सुधारणा करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. ३१ मार्च २०२२ पर्यंत घेण्यात येणाऱ्या कोणत्याही निवडणुकीत विद्यमान सदस्य हे मतदान करण्यासाठी पात्र ठरतील.

## पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण बरखास्त

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण विसर्जित करून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात विलीनीकरण करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये विलीनीकरणाशी निगडित पुढील कार्यवाही करणेसाठी महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ नियोजन विभागाकडे

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ हे नियोजन विभागाकडे हस्तांतरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. या महामंडळाची ध्येय व उद्दिष्टे विचारात घेऊन हा विषय कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाकडून वगळून, हा विषय नियोजन विभागाकडे सोपवण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

## कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठ स्थापणार

सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ हे समूह विद्यापीठ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने, समूह विद्यापीठ निर्माण करणे शक्य व्हावे, यासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, राज्यभरातील उच्च शैक्षणिक संस्था अंतरनिहाय विखुरण्यामधील मोठी तफावत दूर करण्याकरिता समूह विद्यापीठे स्थापन करण्याची तरतूद केलेली आहे.

ज्या महाविद्यालयांकडे पुरेशा शैक्षणिक, भौतिक व तांत्रिक पायाभूत सोयीसुविधा आहेत अशा ३ ते ५ विद्यमान महाविद्यालयांची संसाधने एकत्रित करून, ही विद्यापीठे निर्माण करण्याकरिता तसेच विद्यापीठाचे विविध दर्जात्मक मापदंड मोठ्या प्रमाणात दर्शवून गुणवत्तेचा दर्जा राखण्यात समर्थ असलेल्या महाविद्यालयांचा समावेश करण्यात येईल.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, सातारा (स्वायत्त) हे मुख्य महाविद्यालय व धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा (स्वायत्त) आणि छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा (स्वायत्त) ही दोन सहभागी महाविद्यालये या तीन अनुदानित महाविद्यालयांचा समावेश असलेले कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा हे समूह विद्यापीठ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

## आपत्कालीन वैद्यकीय सेवा योजना

महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा योजना राज्यात राबवण्यासाठी सेवा पुरवठादाराबरोबर केलेल्या करारास मुदतवाढ देण्याबाबत मान्यता देण्यात आली. समितीच्या शिफारशीनुसार तसेच राज्यपाल महोदयांनी दिलेल्या मान्यतेनुसार पुढील पाच वर्षाकरिता म्हणजेच १ फेब्रुवारी २०१९ ते ३१ जानेवारी २०२४ पर्यंत या कालावधीकरिता जुन्या सेवापुरवठादारास मुदतवाढ देण्यात येत आहे.

**टीम लोकराज्य**



# कपाशीवरील गुलाबी (शेंदरी) बोंडअळी

## एकात्मिक व्यवस्थापन

महाराष्ट्र शासन

**कृषी विभाग**

**किडीची ओळख:** पूर्ण वाढ झालेली अळी सुमारे ११ ते १३ मि.मी. लांबट असून प्रत्येक वलयावर गुलाबी पट्टा असतो. तो नंतर शरीरावर पसरतो त्याने अळीचे शरीर गुलाबी दिसते. कोषावस्था लालसर तपकिरी रंगाची तर पतंग करड्या रंगाचे असतात.

**नुकसानीचा प्रकार:** सुरुवातीला अळ्या पाते, कळ्या, फुलांवर उपजिवीका करतात. प्रादुर्भावग्रस्त फुले अर्धवट उमललेल्या गुलाबाच्या कळीसारखी दिसतात त्यांना डोमकळ्या म्हणतात. प्रादुर्भावग्रस्त पाते, बोंडे गळून पडतात किंवा परिपक्व न होताच फुटतात. अळी बोंडातील बिया खाते. त्याचबरोबर अळीने रुई कातरून नुकसान केल्याने रुईची प्रत खालावते तसेच, सरकीतील तेलाचे प्रमाण कमी होते.



बोंडावरील प्रादुर्भाव फुलावरील प्रादुर्भाव डोमकळी

**आर्थिक नुकसानीची पातळी :** १ जिवंत अळी प्रति १० हिरवी बोंडे किंवा प्रतिफेरोमन सापळ्यात ८ पतंग सलग ३ रात्रीमध्ये आढळल्यास नमूद कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी.

## गुलाबी बोंडअळीचे एकात्मिक व्यवस्थापन

- मागील हंगामातील कपाशी पिकाचे अवशेष नष्ट करून जमिनीची खोल नांगरणी करा.
- खात्रीलायक बियाणे वापरुन योग्य अंतरावर आणि योग्य वेळी कपाशीची लागवड करा.
- कपाशीच्या पिकाची तृणधान्य, कडधान्य किंवा गळीतधान्य पिकांबरोबर फेरपालट करा.
- काळ्या, मध्यम आणि भारी जमिनीत एकाच वेळी वेचणीसाठी येणाऱ्या १८० दिवसापेक्षा कमी कालावधीच्या रस शोषक किडींना सहनशील संकरित बी.टी.वाणांची लागवड करा.
- बोंडअळी ग्रस्त डोमकळ्या अळीसह नष्ट करा.
- कपाशीच्या शेतात हेक्टरी किमान १० पक्षिथांबे लावा.
- पीक उगवल्यानंतर ६० ते ९० दिवसांच्या कालावधीत एक आठवड्याच्या अंतराने ट्रायकोग्रॅमा बॅक्ट्री या परोपजीवी कीटकाची हेक्टरी १.५ लाख अंडी प्रसारित करा.
- बोंडअळीचा प्रादुर्भाव दिसून येताच ५ टक्के निंबोळी अर्क अथवा ॲझाडिरेक्टीन १०००० पीपीएम १ मिली प्रतिलीटर किंवा १५०० पीपीएम २.५ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा. तसेच मोठ्या प्रमाणावर पतंग पकडण्यासाठी हेक्टरी २० फेरोमन सापळे लावून त्यात अडकलेले पतंग नष्ट करा.
- कपाशी वेचणीचा हंगाम संपताच पऱ्हाट्या इतर पालापाचोळा याचे शेताबाहेर कम्पोस्ट करा.
- डिसेंबर–जानेवारीनंतर पीक पुर्णपणे काढून टाका त्यापुढे फरदड/खोडवा घेऊ नका.

| कीटकनाशक | प्रमाण/लि. पाणी | कीटकनाशक | प्रमाण/लि. पाणी |
|---|---|---|---|
| क्विनॉलफॉस २० एएफ | २.५ मिली | थायोडीकार्ब ७५ डब्लुपी | २ ग्रॅम |
| क्लोरपायरीफॉस २० ईसी | २.५ मिली | इंडोक्साकार्ब १४.५ एससी | ०.५ मिली |
| प्रोफेनोफॉस ५० ईसी | ३ मिली | लॅमडा साहॅलोथ्रीन ५ ईसी | १ मिली |
| इमामेक्टीन बेंझोएट ५ एसजी | ०.५ ग्रॅम | सायपरमेथ्रीन १० ईसी | १ मिली |

**वरील मात्रा साध्या पंपासाठी असून पेट्रोल पंपासाठी हे प्रमाण तीनपट वापरावे.**

अधिक माहितीसाठी वरील QR कोड स्कॅन करा

**कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / **TO**

**O.I.G.S.** भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य **LOKRAJYA**

***If undelivered, please return to:***

प्रेषक / **From**

**अनिल आलूरकर**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., ई-१, जय जलाराम इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१ ३११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: डॉ. दिलीप पांढरपट्टे